# मनातले जनांत

स्त्री विषयक लेखसंग्रह

डॉ. तारा भवाळकर



# मनातले जनांत

स्त्री विषयक
लेखसंग्रह

# मनातले जनात

स्त्री विषयक
लेखसंग्रह

डॉ. तारा भवाळकर

अक्षता प्रकाशन

**मनातले जनात** । स्त्री विषयक लेखसंग्रह
डॉ. तारा भवाळकर

**प्रकाशक ।**
अक्षता प्रकाशन
'श्रीपाल प्लाझा', बी १९,
३३५ शनिवार पेठ, पुणे ३०
दूरध्वनी : ९८५०८ १७६८५

© डॉ. तारा भवाळकर

**मुद्रक ।**
एस्. प्रिन्टर्स
१४९६ सदाशिव पेठ, पुणे

**मुखपृष्ठ, आतील सजावट ।**
ल.म.कडू

**अक्षरजुळणी ।**
शुभम टाइपसेटर्स

**प्रथमावृत्ती ।**
९ जुलै २०१०

**मूल्य ।** १६० रुपये

या लेखनातील अनुभवांना
प्रत्यक्षाप्रत्यक्ष निमित्त झालेल्या
सर्वजणींना...

## कृतज्ञता

श्री. अनंत दीक्षित, पुणे

श्री. किरण ठाकूर, बेळगाव

डॉ. अनिल मडके, सांगली

श्री. अशोक याळगी, बेळगाव

श्री. रा. अ. कुंभोजकर, बेळगाव

डॉ. अशोक केळकर, पुणे

प्रा. कमल देसाई, पुणे

# मनोगत

समाज कितीही उदार झाला म्हटले तरी अखेर 'समाजपुरूष' ही प्राचीनांनी दिलेली संज्ञा त्या उदारपणातही जाणवते. विशेषत: बाईला ती नुसती जाणवतच नाही, तर अनुभवावीही लागते. मनातल्या मनात ठेचा खात खात चेहऱ्यावर हसू वागवीत ती सगळे जगणे साजरे करीत असते. मग ते जगणे जुन्या काळातल्या बाईचे असो की नव्या काळातल्या बाईचे! शिक्षित स्त्रीचे असो की अशिक्षित स्त्रीचे आणि प्रौढेचे असो की नव्हाळीतल्या युवतीचे असो. म्हणून मग काळानुसार तपशील बदलले, पोषाख बदलले तरी मनाला बोचणारे सल काही मखमलीचे होत नाहीत. फक्त कोणी बोलून दाखवते तर कोणी मनात ठेवून कुढते.

बाई अनेक परीने आपले मन जनात व्यक्त करण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून करीत आली आहे. कधी ती जात्यावरच्या ओवीतून व्यक्त होत आली. कधी कथा-कहाण्यांतून व्यक्त होत आली तर कधी 'लेकी बोले, सुने लागे,' अशा तिरकस चालींच्या म्हणी उखाण्यांतून व्यक्त होत आली आहे. अभिव्यक्तीची माध्यमे बदलली असतील, शैली बदलली असेल, पण गरज बदलली नाही. उलट ती वाढतेच आहे असे वाटते.

जगण्याच्या वाटा खाचखळग्यांच्या, काटेरी असल्या तरी त्या सुखद, सुंदर करीत राहणे हा एकूणच माणसाच्या जातीचा गुण आहे. स्त्रियांचा तर आहेच आहे. असे कितीतरी प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुभव मलाही येत राहिले. केवळ व्यक्ती म्हणून नव्हे, तर

माझ्या भोवतीच्या अनेकींचे अनुभव संवेदनशीलतेने टिपणारी एक व्यक्ती म्हणून! प्रसंगपरत्त्वे ते कागदावर उतरवले गेले. त्यातल्या काही निवडक टिपणांचा हा संग्रह!

ही टिपणे प्रामुख्याने नियतकालिकांच्या सदरांच्या गरजेतून लिहिली गेली आहेत. त्यामुळे त्यांच्या विस्ताराची मर्यादा होतीच. बाईच्या संदर्भातले अनेक मुद्दे स्थलकालातीत आहेत. जास्तीत जास्त स्थल–कालव्याप्ती असलेली टिपणे संग्रहित करण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनात येणाऱ्या अनेक विचारांना, भावनांना अक्षरबद्ध करण्यासाठी ज्यांनी आवर्जून अवकाश प्राप्त करून दिला त्या प्रामुख्याने 'जनस्वास्थ' (सांगली), सकाळ–सप्तरंग पुरवणी, तरूणभारत–अक्षरयात्रा पुरवणी (बेळगाव) व अन्य नियतकालिकांना या संग्रहाचे श्रेय आहे. त्या सर्व संपादकांची मी आभारी आहे.

'अक्षता' प्रकाशनाचे श्री. निलंगे यांनी या संग्रहाच्या निमित्ताने 'मनातले जनात' आणण्यासाठी आत्मीय तत्परता दाखविली आणि ती अंमलात आणली याबद्दल त्यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मी आभारी आहे.

**डॉ. तारा भवाळकर**

३, स्नेहदीप, आंबेडकर रोड,

सांगली– ४१६४१६

# अनुक्रम

तुझे आहे तुजपाशी । ९
का मरायचं मी आत्ताच? । १४
एका शापाची कहाणी । १९
सुंदर मी होणार ! । २४
खरंच आमचा कळवळा आहे? । ३२
रॅगिंग । ३६
एक कहाणी ! तशी पुराणी(च) । ४२
घर असावे घरासारखे । ४६
चाहूल.... बाळजन्माची! । ५०
अडगुलंऽऽऽऽ मडगुलंऽऽऽऽ । ५४
स्वातंत्र्याची षष्ट्यब्दी । ६१
रडू .... हसव रे जरा....! । ६७
लेकुरे उदंड झाली । ७२

उपरकी टीमटाम । ७८
सासू–सून आणि सासराजावई । ८१
श्यामची आई.... आजही आदर्श...? । ९१
आपली वाट आपणच शोधू । ९६
माती आणि पाणी । १००
जात्यातल्या आणि सुपातल्या । १०६
धर्म आणि संस्कृती । ११०
रिकामा वेळ । ११४
वाटणी कामांची । ११८
मातृत्त्वाच्या बलिवेदीवर पातिव्रत्य?।१२४
एका लोककथेचे तात्पर्य! । १२८
चौथा कमरा । १३२
या उत्सवांचा अर्थ तरी काय? । १३७
मानवी नातेसंबंध आणि विज्ञान ! ।१४२
जागतिकीकरण आणि स्त्रिया । १४७

# तुझे आहे तुजपाशी...

कोणत्याही खेड्यातले एक चंद्रमौळी घर! जुन्या कौलारातून कधी ऊन, कधी पाऊस तर कधी थंडीचे झोंबरे वारे, घरात सुखाने बागडणारे आणि घरातल्या माणसांना साक्षात् पंचमहाभूतांच्या संगतीत नांदण्याचा अनुभव देणारे! धनधान्याची, पैशा अडक्याची उणीव घराला नवीन नव्हती. भरीस भर गावात पाण्याचा दुष्काळ!घरात चार पाच कच्ची बच्ची, घराचा मालक कुठंतरी कारकुनी करणारा, स्वभावाने अगदी गरीब मवाळ. बढती मिळवण्यासाठी लागणाऱ्या 'दुसऱ्या' युक्त्या बिचाऱ्याला माहीतच नव्हत्या.

अशा घराला शोभेल अशीच गृहिणीही तिथे नांदत होती. रात्री अपरात्री उठून दूरवरून पाण्याच्या खेपा वाहताना आणि घरातली सगळी कष्टाची ओझी वाहताना टेकीला आलेली. शरीराने आणि मनानेही पार चिपाड झालेली. कुठून म्हणून आशेचा किरण नाही. उण्याला भर म्हणून की काय, आणखी एका बाळजीवाच्या येण्याची चाहूल लागलेली म्हणून आणखीनच धास्तावलेली. सगळीकडून निराशेने घेरलेली.

आणि अशातच आणखी एक संकट येऊन ठेपले. पहाटेच्या वेळी पाण्याच्या खेपा नेता आणताना दाराच्या वळचणीतून 'हे ऽऽ थोरलं जनावर लोंबताना' दिसायचे. पहिल्यांदा दिसले. तेव्हा ती किंचाळली. पण घरात इतर कुणालाच 'ते' दिसलं नाही. 'इकडे तिकडे गेले असेल', म्हणून शोध घेतला तर कुणालाच ते सापडले नाही. मग पुन्हा एकदा तसेच घडले आणि वारंवार तसेच घडत राहिले. साप दिसे तो फक्त तिलाच, तसाच वळचणीतून लोंबताना. पण तिला तो काही करीत नसे. अडचणीचे दिवस उलटत होते. आणि मग तिला तो साप दिसायचाही अचानक बंद झाला. पण

दरम्यान तिच्या नवऱ्याला बढती मिळाली होती. थोडा पगार वाढला होता. थोडे स्वास्थ्य आले आणि कधीतरी लगेच त्या गावातून बदलीही झाली.

ही मी मनाने रचलेली कथा नाही. सुप्रसिद्ध लेखक व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'करुणाष्टक' या आत्मचरित्रपर कादंबरीतली ही हकीकत आहे आणि ती घडली तशी नोंदवल्याचेही त्यांनी एका भेटीत सांगितलं होते. पुढे त्यांनी काहीही अधिक स्पष्टीकरण दिलेले नाही.

आणखी एक अनुभव थोड्या वेगळ्या प्रकारचा. आमच्या कॉलेजमध्ये नोकरी करून एम.ए.चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी बरेचदा असतात. कधी कधी योग्य वेळी शिक्षण घेता आले नाही म्हणून प्रौढ वयातही शिक्षणासाठी नावे नोंदवतात. संसारातले बरे वाईट अनुभव घेत असलेल्या या स्त्रियांच्या हकीकतीही आपल्याला विचार करायला लावतात.

अशीच एका वर्षी एका नामांकित डॉक्टरांची पत्नी एम.ए. ची विद्यार्थिनी म्हणून दाखल झाली. भेटली तेव्हा अभ्यासाच्या चौकशीपेक्षा स्वत:च्या तब्येतीबद्दलच बोलत राहिली. तिची मुख्य तक्रार होती ती उच्च रक्तदाबाच्या विकाराची! वस्तुत: त्यावर उपचार करण्याची सोय घरातच होती. जवळच्या उपनगरातून बसने रोज कॉलेजला येणे शक्य नाही, म्हणून मी तिला इतर मार्गाने मदत करावी, अशी तिची इच्छा होती. ती मी मान्य केल्यावर ती गेली. पण मधून मधून फोनवरूनही तिच्या तक्रारी चालू असत.

योगायोगाने तिच्या गावातले एक ओळखीचे गृहस्थ भेटले. त्यांच्याशी बोलल्यावर लक्षात आले की ह्या स्त्रीचे मन इतरत्र गुंतणे हाच तिच्या आजारावर खरा उपचार असू शकतो.

पुढच्या भेटीत मी तिच्यावर (खोटीच) थोडी रागावले आणि तासांना हजर राहिलेच पाहिजे. बी.पी.चा त्रास झाला तर जबाबदारी मी घेईन असेही सांगितले. दुसऱ्या दिवशी ती बसनेच आली. तासांना बसली. मग तिला ग्रंथालयात नेऊन खूप मासिके पुस्तके वाचण्याची इथे कशी सोय आहे ते दाखवले.

पुन्हा पुढच्या दिवशी ती आली आणि 'काल एकटी बसने आले गेले तरी बी.पी. वाढले नाही' म्हणून काहीशा उत्साहाने तिनं सांगितले. अन् हळू हळू आपल्याला हा विकार आहे. याचेही तिला विस्मरण झालं.

पुढे काही वर्षांनी तिच्या पतीची भेट झाली तेव्हा कळले की, तिला आपल्या पतीबद्दल नेहमी संशय असे. 'तो दुसऱ्या कोणा बाईच्या प्रेमात पडला आहे. आता आपले कसे होणार?' या भयाच्या दडपणाखाली ती सतत असे. त्यातून रक्तदाबाचा विकार जडला. आणि तिला घराबाहेर पडण्याचीही भीती वाटू लागली आपण काही

स्वतंत्रपणे करू शकू, असा आत्मविश्वासच वाटेना.

कॉलेजला येऊ लागल्याने, समवयस्क स्त्रियांच्या सहवासात राहिल्याने आणि अभ्यासातला आनंद घेण्याचा अनुभव आल्याने तिचे भय हळू हळू कमी झाले. आत्मविश्वास परत आला.

आणखी एक अनुभव एका अगदी तरुण मुलीचा! नुकतीच वयात आलेली ही मुलगी सतत कोमेजल्यासारखी, दडपणाखाली असल्यासारखी वागे. कधीही ट्रीपला येत नसे. एन.सी.सी. कॅंपला येत नसे. गॅदरिंगच्या काळात तिन्हीसांजेच्या आत घरी जाण्यासाठी ती उतावीळ होई. तेव्हा वाटले हिला घरी फार धाक असावा. हिच्या पालकांशी एकदा त्याबद्दल बोलावे की काय, असा विचार चालू होता. तेवढ्यात काही कारणाने तिनेच आपले मन मोकळे केले. ती वयात येऱ्यापूर्वीच नात्यातल्या एका वयस्क पुरुषाने तिच्याशी असभ्यपणे सलगी करण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या तावडीतून ती सुटली खरी, पण भयाचे दडपण तिच्या मनात जे ठाण मांडून बसले ते जाता जाईना. अखेर एका डॉक्टर मैत्रिणीकडे तिला नेले आणि तिच्या मनातल्या भयाचा निरास करण्याचा प्रयत्न केला.

आणखी एक हकीकत थोडी चमत्कारिकच! श्रावणातल्या एका मंगळवारी भर वर्गात एकीच्या अंगात 'देवीचा' संचार झाला आणि ती घुमायला लागली. भय, आश्चर्य, कुतूहल अशा निरनिराळ्या भावनांपोटी तिच्या भोवती गर्दी झाली. कोणा श्रद्धावान मुलीने कुठूनतरी हळदीकुंकू आणून मळवट भरला. 'देवीच्या' काही मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आणि जमिनीवर अंग टाकून घुमण्याची गती मंद होत होत 'अंगातली देवी' अंतर्धान पावली.

मग तिच्याबद्दलची हकीकत समजली ती खरे तर करुणास्पद होती. आई वडील लहानपणीच वारले होते. मग कोणा नातेवाईकाने तिचे लग्न लावून दिले. सासरची माणसेही चमत्कारिक स्वभावाची होती. अखेर नवऱ्याने तिला टाकून दिले. पुन्हा माहेरच्या भाऊ भावजयांमध्ये येऊन रहावे लागले. अशातच एका नवरात्रात ती 'देवी'ला गेली असताना प्रथम तिच्या अंगात आले आणि पुढे दर मंगळवारी ते येतच राहिले.

पण त्या अंगात येण्यावर माझा काही विश्वास बसला नाही. पुढे काही निमित्ताने एक नाटक बसवण्याचे ठरले. त्यात एका कजाग बाईची भूमिका तिला देऊ केली. नाटकाच्या तालमी रंगू लागल्या. ती ही भूमिकेत रंगू लागली. एक दोनदा मुद्दाम मंगळवारी तिच्या अंगात येण्याच्या वेळातच नाटकाच्या तालमी ठेवल्या. त्या मंगळवारी 'देवी' अंगात येण्यास बहुधा 'विसरली' असावी.

अशातच नाटकाचा प्रयोग एका स्पर्धेत झाला आणि विशेष म्हणजे तिला अभिनयाचे पहिले पारितोषिक मिळाले आणि तेव्हापासून तिचे अंगात येणे थांबले.

अजूनही ती कधीतरी भेटते. ती पन्नाशीला आली आहे. कोठेतरी काम करते. पोटापुरते मिळवते. भावाच्या शेजारी स्वतंत्र खोली घेऊन राहते. तिचा आत्मविश्वास हेच तिचे बळ ठरले आहे.

एक की दोन किती म्हणून बायकांच्या हकीकती सांगाव्या?

शारीरिक कष्ट तर सर्वधाधारणपणे बायकांना नेहमीच जास्त करावे लागतात. त्या ते करतातही, पण त्यातच मानसिक ताणांची भर पडली तर त्रास अनेक पटींनी वाढतो. बहुधा मानसिक ताण सहन करण्याचीही स्त्रियांची क्षमता अधिक असते. पण अधिक हळव्या आणि संवेदनशील स्त्रियांना हे ताण असह्य होतात किंवा कधी कधी खंबीर स्त्रीलाही ताण कोसळून टाकतात.

स्त्रीच्या मनात सतत असुरक्षिततेचे भय असते. ही असुरक्षितता विविध प्रकारची असते. नीती, चारित्र्य, शील यांच्याविषयीची भीती असतेच. कौटुंबिक, सामाजिक दडपणे असतातच. आपल्या 'शीला'विषयी घरातल्या माणसांना शंका जरी आली तरी आपल्याला घराला मुकावे लागेल. आपण असुरक्षित होऊ हे भय फार मोठे असते. मग ते माहेरघर असो वा सासरघर असो आणि ती स्त्री सुशिक्षित असो वा अशिक्षित असो.

मिळवत्या स्त्रीला निदान उपजीविकेची तरी चिंता नसते. पण नवऱ्यावर अवलंबून असलेल्या स्त्रीच्या मनात नवऱ्याची किंवा सासऱ्यांची मर्जी फिरली तर काय? हे भय असतेच. म्हणून कुटुंबात विश्वासाचे वातावरण असणे हाच मोठा आधार असतो.

प्रारंभी सांगितलेल्या घटनेतल्या स्त्रीला नवऱ्याने सोडण्याचे भय नव्हते. हे खरे, पण दारिद्र्यामुळे मुलाबाळांसह उपासमारीची वेळ येईल की काय? हे भय तिच्या मनात ठाण मांडून बसले होते आणि ते सर्पाच्या रूपाने व्यक्त होत होते.

मनात भय वा दडपणे असतात आणि ती कशा ना कशाच्या माध्यमातून प्रतीक रुपाने व्यक्त होत असतात. एका अर्थाने मनात साचलेल्या भय भावनेचे ते विरेचन (कॅथॉर्सिस) असते. कधी 'अंगात येण्याच्या' रुपाने ते विरेचन होते. कधी शारीरिक बाह्य आजारांच्या रुपाने उदा. (डॉक्टर पत्नीचा उच्च रक्तदाब) ते व्यक्त होते तर कधी भयसूचक स्वप्नांतून वा अन्य मार्गांनी व्यक्त होते.

अनेक ताण असे असतात की त्यांचे विरेचन (कॅथॉर्सिस) सहजपणे होत नाही आणि मग गुंतागुंतीची मानसिक विकृती निर्माण होते.

या सर्वांच्या मुळाशी असते ते कोणत्या ना कोणत्या प्रकारचे असुरक्षिततेचे भय! कधी खरे, कधी खोटे, कधी थोडे खरे पण कल्पनेने राईचा पर्वत व्हावा तसे वाढलेले!

त्यातून माणसाचा आत्मविश्वास उणावत जातो आणि 'काळजी' जी एकदा 'काळजात रुतून बसते ती निघता निघत नाही' मग 'वैरी न चिंती ते मन चिंती' अशी अवस्था होते. प्रेम आणि विश्वास असेल तर ताण कमी होऊ शकतात. म्हणून शक्यतो माणसाने स्वत:ला एखाद्या सर्जक, निर्माणक्षम कामात गुंतवून घ्यावे.

काम तर माणसाला करावेच लागते. पण ज्या कामातून स्वत:ला अभिव्यक्त होता येते, असे काम का करू नये? त्यातून निरामयपणे माणसाचा 'अहं' सुखावतो. स्वत:ला आणि इतरांना ज्यातून आनंद, समाधान मिळेल असा मार्ग शोधला की आत्मविश्वास कणखर बनतो. आत्मसुरक्षिततेचा मार्ग स्वत:तच सापडतो.

दिवसेंदिवस आपल्या एकसुरी कंटाळवाण्या कामाचा ताण वाढतो आहे. म्हणून सर्वांनीच विशेषत: स्त्रियांनी आपल्या जवळच्या आनंददायी सर्जक गुणांचा शोध घेऊन दिवसाचा थोडा तरी वेळ आणि शक्ती त्यासाठी आवर्जून राखून ठेवावी.

आणि आपल्या मुलांना लहानपणापासूनच हे 'वळण' पालकांनी आवर्जून लावावे. स्वत:ला लावून घ्यावे.

आपले आनंदनिधान नेमके कोठे आहे? याचा शोध ज्याचा त्याने /तिचा तिने घ्यावा. एकाचे आनंदाचे कारण दुसऱ्याला भावेल असे नाही. यालाच स्वातंत्र्य म्हणायचे. ताण असतो दडपणाचा, स्वातंत्र्य हिरावल्याचा. एक छोटा कोपरा प्रत्येकाला आपल्या आनंद शोधासाठी मोकळा ठेवता यावा.

आपल्या मनाच्या गूढ गुंफेचा शोध घेण्याचा प्रयत्न तरी करून पहावा. त्यातून कदाचित आनंदाचा ठेवा अलिबाबाच्या गुहेसारखा ज्याला त्याला आपोआपच सापडेल. अकारण चिंतेच्या ओझ्यातून मुक्त झाल्याचे समाधान मिळेल. 'तुझे आहे तुजपासी। परि तू जागा चुकलासी।' असे होऊ नये.

# का मरायचं मी आत्ताच ?

सुमारे तीस वर्षेतरी झाली असतील त्या घटनेला. एका स्नेह्याच्या मध्यस्थीने एक मध्यमवयीन पती–पत्नी माझ्याकडे आले. तक्रार होती पत्नीच्या प्रकृतीसंबंधी. माझ्या ओळखीच्या एका डॉक्टरांनी त्या पत्नीची तपासणी करून, निदान करून घ्यावे म्हणून पाचशे किलोमीटर अंतरावरून ते जोडपे आले होते. खरे तर त्यांच्या गावातही चांगल्या वैद्यकीय सुविधा होत्या. विविध क्षेत्रातले तज्ज्ञ डॉक्टर होते. तरी ही मंडळी इतक्या दूरवर ओळख काढीत का आली? ते मला समजेना. स्पष्टच विचारले तेव्हा पती म्हणाला, 'आमचे घराणे गावात फार प्रतिष्ठित घराणे आहे. जर माझ्या बायकोला काही भलता सलता आजार झाल्याचे कळले, तर गावातल्या डॉक्टरकडून ही गोष्ट घरच्या मंडळींना कळेल आणि पंचाईत होईल. घरच्या लोकांनाही आम्ही येथे येण्याचे खरे कारण सांगितलेले नाही.' मला हे सगळे जरा गूढच वाटत होते. तरी मध्यस्थ स्नेह्यांसाठी म्हणून त्यांना ओळखीच्या त्वचारोगतज्ज्ञ डॉक्टरांकडे प्रथम नेले. कारण प्रथम दर्शनी तरी बाईच्या अंगावर बारीक पुरळ आणि चट्टे दिसत होते. कंड सुटत होती. खाजवले की विलक्षण आग होत होती आणि विशेषत: धडापासून गुडघ्यापर्यंतच्या शरीरावर त्याचा विशेष प्रादुर्भाव होता. बाई एकीकडे अगदी हैराण झाल्या होत्या आणि दुसरीकडे खूप शरमिंद्याही झाल्या होत्या. तिऱ्हाईताला तर त्यांच्या शरीराची ती अवस्था फार ओंगळवाणी वाटत होती.

डॉक्टर प्रौढ, अनुभवी आणि तज्ज्ञ होते. त्यांनी शारीरिक तपासणी पाच मिनिटातच संपवली आणि नंतर त्यांच्याशी सविस्तर गप्पा मारल्या. अनेक प्रश्न विचारून त्यांना बोलते केले. शेवटी म्हणाले, 'काळजी करण्याचे काही कारण नाही. ही मलमे लावा' म्हणून एक दोन मलमे दिली. 'बाकी सर्व औषधे–गोळ्या बंद करा' असे सांगून शारीरिक स्वच्छतेसंबंधी एक लांबलचक व्याख्यान त्या–पती–पत्नींना समोर बसवून ऐकवले. त्या जोडप्याच्या डोक्यावरचा ताण सैल झाल्याचे दिसले आणि जोडपे समाधानाने परत गेले.

नंतर त्या डॉक्टर स्नेह्यांशी सविस्तर बोलताना डॉक्टर म्हणाले, 'आमच्या व्यवसायात अशा 'केसीस' नवीन नाहीत. तो नित्याचा भाग आहे. तुम्हाला कधी हा अनुभव नसल्याने तुम्हाला कसे तरी वाटणे स्वाभाविक आहे' अशी प्रस्तावना करून त्यांनी या बाईंसह इतर अनेक रुग्णांचे अनुभव सांगितले. त्यांच्याकडच्या या ताज्या पेशंट बाईपासूनच सुरुवात झाली.

यांचे एकत्र कुटुंब. शेती व्यापार वगैरे असल्याने अर्थिक सुबत्ता भरपूर आहे पण दुसरीकडे घराण्याच्या चालीरीती आणि देवधर्म या सगळ्याचे भलतेच स्तोम आहे. तो सगळा भार घरातल्या या थोरल्या मुलावर आणि सुनेवर पहिल्यापासून पडला आहे. सुदैवाने पहिलाच मुलगा बाईला. लग्न झाल्यावर पहिल्या वर्षातच झाल्याने 'वंशाचा दिवा' लागला होता. त्यासाठी सतराशेसाठ व्रते, पूजा, कुळधर्म, कुळाचार यांची जबाबदारी बाईवर सासू–सासऱ्यांनी टाकली होती. बाईला नैसर्गिक मासिक धर्म काही चुकत नाही. पण त्याच काळात एखादे व्रत, कुळाचार आले की, त्यांची पाळी लांबवण्यासाठी त्या गोळ्या घेत. अडाणी सासूबाईंना ह्या गोळ्या अस्तित्वात असल्याचे मात्र माहित होते.

सुरुवातीला सासूबाईंची आज्ञा पाळायची म्हणून गोळ्या घेतल्या नंतर ते वळणच पडून गेले. सतत पंधरा वर्षेवर्षातून तीन चार वेळा, कधी कधी लागोपाठही हे प्रयोग होत राहिले. त्यातच एकत्र कुटुंबात स्नानासाठी स्वतंत्र बंदिस्त स्नानगृह नाही. सासू जावा सर्वांची गर्दी त्यामुळे ज्या शरीरभागाची जास्त स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे त्याकडेच नेमके दुर्लक्ष होई. शरीराचा अंतर्भाग कधी कोरडा होऊ शकत नसे. सदा घामट चिकचिकला दमटपणा साचून राही. त्याचीच सवय असल्याने यापेक्षा वेगळी

स्वच्छता असू शकते, याचेच या प्रतिष्ठित म्हणवल्या जाणाऱ्या घरातल्या स्त्रियांना भान नव्हते. त्या घरातल्या सर्वच बायकांच्या कमरेला, जांघेत सदैव कंड सुटून नायटे झालेले असत. फार त्रास झाला की, तेवढ्यापुरती वरवरची उपाययोजना होई.

वैज्ञानिक शोधामुळे, औषधांमुळे अनेक फायदे झाले असले तरी काही उपचारांचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणात माणसे परस्परच करून घेतात. बायकांच्या बाबतीत मासिक पाळी लांबवण्यासाठी गोळ्या खाण्याचे प्रमाण असेच चिंताजनक आहे. घरात देवाधर्माचे करणे, पाहुणे येणे, लग्न कार्य, प्रवास अशावेळी पाळी येऊ नये म्हणून हा 'सोपा' उपाय केला जातो. परंतु परिणामी तो भयंकर ठरू शकतो.

डॉक्टर म्हणाले, ''वारंवार असे होत राहिले तर कॅन्सर होण्याची शक्यताही वाढते. त्वचारोग तर होतातच. मुलगा होण्याच्या अट्टाहासापायी वारंवार गर्भपात करून घेतल्यामुळेही स्त्रियांना गर्भधारण क्षमता घटते. किंबहुना त्यांच्या गर्भाशयांना खूप मोठी इजा होत कॅन्सरपर्यंत परिणाम पोचू शकतात. दुसरीकडे मासिक पाळीचा अनियमितपणा, वाजवीपेक्षा अधिक व अधिक काळ स्त्राव जाण्याकडे केलेले दुर्लक्ष स्त्रियांना अंतिमत: मृत्युपर्यंत घेऊन जाऊ शकते.

आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे हेच जणू स्त्रियांच्या गुणवत्तेचे निकष मानण्याची सवय स्त्रियांना आणि आपल्या कुटुंबव्यवस्थेला झालेली आहे. त्यामुळे स्त्रिया स्वत:कडे दुर्लक्ष करतातच. पण अगदी नाईलाज होईपर्यंत अनेकदा कुटुंबीयही लक्ष देत नाहीत.

स्त्रीसंबंधी एकूणच आपल्या समाजाची मानसिकता दुटप्पी आणि दुहेरी आहे. लक्ष्मी, गौरी, दुर्गा वगैरे झगमगत्या विशेषणांची खैरात करीत दुसरीकडे स्त्री देह म्हणजे पापाची खाण, घाणीचे आगर म्हणून तिला घृणास्पद मानले जाते. तिच्या मातृत्वाचा एकीकडे शब्दात गौरव करीत ते मातृत्व प्राप्त होण्याची पूर्व अट म्हणजे मासिक पाळी तो मात्र 'विटाळ' म्हणून तिला अस्पृश्य मानले जाते. अपवित्र मानले जाते. त्या भावनेचा इतका जबरदस्त पगडा मनावर असतो की, 'त्या' काळात देवा–धर्माशी संबंधित काही घटना घडणार असली की, स्त्री स्वत:लाच अपवित्र समजू लागते. बरे स्त्रीला 'या' काळात सर्वार्थाने विश्रांती मिळावी म्हणून पूर्वी अस्पर्श मानले जाई. हे समर्थन प्रत्यक्ष अनुभवावर टिकणारे नाही. उलट ती आता तीन दिवस स्वस्थ बाजूला बसणार म्हणून

ढिगांनी धान्य पाखडण्या–निवडण्याची कामे घरोघर तिच्याकडून करून घेताना मी स्वत: जन्मभर पाहिले आहे. नदीचे गाव असेल तर सगळी अवजड पांघरुणे, गोधड्या, वाकळी त्या तीन दिवसात तिच्याकडून धुवून घेतली जात. वर कोणीतरी पाणी ओतून ते कपडे 'शुद्ध' केले की संपले. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे त्या काळात तिला भरपूर गरम पाण्याने स्वच्छ स्नान करण्याची गरज असते तेव्हा त्या 'अपवित्र' समजल्या जाणाऱ्या काळात स्नानाला प्रतिबंध करून अस्वच्छतेत भरच घातली जाई. अजूनही जेथे अस्पर्शता पाळली जाते, तेथे हीच परिस्थिती आहे.

मासिक पाळीबद्दलचा 'अपवित्रते'च्या भावनेमुळे एकूणच त्यासंबंधीच्या कोणत्याही शारीरिक बाबीबद्दल उघड बोलण्याचा विलक्षण संकोच अगदी शिक्षित स्त्रीच्या मनातही घट्ट रुजून बसलेला असतो. त्यामुळे प्रथम किरकोळ वाटणाऱ्या स्त्रियांच्या तक्रारी पुढे गंभीर रूप धारण करू शकतात, याचे भान स्त्रियांसह सर्व कुटुंबियांना येणे गरजेचे आहे. कारण हा प्रश्न केवळ स्त्रियांचा नाही तर सर्व कुटुंबाच्या, पर्यायाने समाजाच्या, देशाच्या आणि माणसाच्या जातीच्या स्वास्थ्याचा आहे.

सतत अंगावर अशी दुखणी काढण्यामुळे बायकांच्यामध्ये रक्तक्षयाचे पर्यायाने एकूणच अशक्तपणाचे प्रमाण वाढते. त्यातून अनेक मानसिक व्याधीही जडतात. औदासिन्य, चिडचिडेपणा, अकारण आक्रमकता किंवा उलट कुढेपणा... अशा अनेक बाबी! म्हणून स्त्री देहाबद्दलची अकारण अपराध भावना वा अतिरिक्त गौरवही (देवता वगैरे) टाळून एक माणूस म्हणून पाहण्याची सवय आपणा सर्वांना प्रयत्नपूर्वक लावून घ्यायला हवी आहे. ती कुटुंबस्वास्थ्याची, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची गुरुकिल्ली आहे. स्त्रियांच्या गर्भाशयाच्या आणि स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढते आहे. त्यासाठी औपचारिक साक्षरतेबरोबरच स्त्री आरोग्यविषयक साक्षरता, जाणीव वाढण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न व्हायला हवेत.

माझ्याच कुटुंबात दुर्दैवाने तीन स्त्रियांचे कॅन्सरग्रस्त अवस्थेत झालेले मृत्यु मी अनुभवले आहेत. माझ्या एका बहिणीच्या शेवटच्या अवस्थेत तिची भेट झाली. सर्व प्रकारचे भौतिक स्वास्थ्य असूनही केवळ संकोचापायी प्रथम दुर्लक्ष झाल्याने तिचा आजार बळावला होता. अनेक उपचारानंतर नाईलाजाने तिची अखेरची तळमळ

पाहण्याची वेळ जिवलग कुटुंबियांवर आली होती.

सर्व भरलेला परिवार भोवती जमलेला असताना कोणाचाही हात घट्ट धरून ती व्याकुळपणे विचारीत असे, 'का मरायचं मी आत्ताच? मला जगायचं आहे, तुम्हा सगळ्यांमध्ये. का मरायचं मीच एकटीनं?' कुणाकडे उत्तर आहे या प्रश्नाचं?

स्त्रियांच्याच नव्हे तर आपल्या समाजाच्या आरोग्याचे प्रश्न हे केवळ वैद्यकीय औषधोपचाराने मिटणारे प्रश्न नाहीत. ते केवळ दारिद्र्यामुळेही वाढत नाहीत. तर सधन परिवारातही घट्ट रुजून बसलेल्या गैरसमजांमुळेही वाढलेले आहेत. त्यासंबंधी जाणिवा जाग्या होणं म्हणजे आरोग्यविषयक साक्षरता वाढणं.

समाजातल्या सर्वच लाभांमध्ये स्त्री नेहमी काठावरच राहिली आहे. तशीच ती आरोग्यविषयक जाणिवांबाबतही उपेक्षित राहिली आहे. स्त्रीदेहाविषयी अपवित्रपणाचा गंड, अपराध भाव, संकोच या मानसिक व्यूहातून एकीकडे सुटका व्हायला हवी आणि दुसरीकडे शारीरिक आवश्यक नित्य गरजांसाठी भरपूर पाणी, स्वच्छतागृहे, स्नानगृहे आणि वेळ यांची तरतूद मात्र कुटुंबप्रमुखानेच करवून घेणे आवश्यक आहे. मग 'का मरायचं आम्ही आताच?' हे प्रश्न कमी होतील.

# एका शापाची कहाणी

आई होणे ही स्त्री जीवनातली इतिकर्तव्यता असे आपण मानतो. मातृत्व हे महन्मंगल आणि पवित्र! आई जणु देवता, इतका पूज्यभाव ठेवतो. पण ते मातृत्व ज्या मासिक पाळीमुळे येते ती मात्र अपवित्र. असे का मानले जाते? इतर अनेक सुधारणा झाल्या तरी मासिक पाळी म्हणजे जणु बाईच्या जातीला मिळालेला शाप! तो भोगल्याशिवाय गत्यंतर नाही. त्याबद्दल तक्रार करणे बाईला लाजिरवाणे वाटते. इतकी अपराधभावना तिच्या मनात समाजाने, संस्कृतीने आणि धर्माने का रुजवली? कधी? आणि कशासाठी? तिचे स्वरूप किती खोलवर आणि गुंतागुंतीचे आहे? हा अपराधभाव फक्त आपल्याच समाजात आहे का इतर देशात, धर्मात, प्रांतात बायकांची याबाबत काय परिस्थिती आहे? याबाबत शिक्षित–अशिक्षित, वृद्ध, प्रौढ, तरुण अशा विविध स्तरातल्या स्त्रियांचे काय म्हणणे आहे? या सर्वांचा शोध घ्यावा असे कधीतरी कुणाला वाटले आहे का?

वैद्यकशास्त्र स्त्रियांच्या मासिकपाळीसंबंधी कसा विचार करते? आधुनिक आणि जुन्या वैद्यकीय तज्ञांच्या विचारसरणीत काही फरक आहे का? असल्यास का? अशा एक ना अनेक प्रश्नांचा गुंता यातून निर्माण होतो.

सर्वसामान्यपणे इतक्या प्रश्नांच्या घोळातच कोणी शिरत नाही. हा एक निसर्ग नियम आहे. म्हणून सोडून दिले जाते. पण या अपराधभावाचा जीवनावर किती खोल आणि दीर्घकालीन परिणाम होतो, याची पुरेशी जाणीव वैद्यकशास्त्रालाही नाही आणि समाजशास्त्रालाही नाही. पण अशा चाकोरीबाहेरच्या प्रश्नांनी वयात येणाऱ्या एका मुलीची आई झपाटली आणि तिने अनेक अंगांनी या एकाच विषयाचा धांडोळा घ्यायचे

मनावर घेतले. त्यासाठी अक्षरश: डोंगराएवढे प्रयत्न केले. वृद्ध, प्रौढ, तरुण, शिक्षित, नोकरीपेशा, श्रमकरी, विद्यार्थिनी, हिंदू, जैन, मुस्लीम, ख्रिश्चन अशा सर्व स्तरातील आणि महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार अशा अनेक प्रांतातील अनेक स्त्रियांशी संपर्क साधला. या अवघड विषयावर मौन सोडून बायकांना बोलते केले. त्यांचे चित्रविचित्र अनुभव ऐकले, विविध मतमतांतरे ऐकली. वैद्यकीय क्षेत्रातील स्त्री–पुरुष डॉक्टरंची मते ऐकली. आयुर्वेदाबरोबरच धर्मशास्त्रातील या विषयावरचे वाचन केले आणि या सगळ्या खटाटोपातून एक पुस्तक लिहिले. 'एका शापाची कहाणी' या नावाचे! या लिहिणाऱ्या जिज्ञासू स्त्रीचे नाव अरुणा देशपांडे आणि या मुलखावेगळ्या विषयावरचे हे पुस्तक गंभीरपणे आणि तत्परतेने छापून प्रकाशात आणणारी लोककल्याणकारी प्रकाशनसंस्था म्हणजे मुंबईची 'लोकवाङ्मय प्रकाशन गृह' ही संस्था होय.

मासिक पाळी या अत्यंत नैसर्गिक अशा स्त्रीच्या शरीरधर्माला 'शाप' मानण्याजोगी परिस्थिती कुणी आणि कशी निर्माण केली? या प्रश्नातून ही शोधयात्रा सुरु झाली. म्हणू नच 'मासिक पाळी एक सामाजिक, सांस्कृतिक शोध' असे स्पष्टीकरणात्मक उपशीर्षक या पुस्तकाला दिले आहे, ते योग्यच आहे.

हा काहीसा अवघड विषय शक्यतो नेटका करून मांडण्याचा प्रयत्न या एकशे एकसष्ट पृष्ठांच्या पुस्तकातील सात प्रकरणातून केला आहे. एक परीने हा स्त्री जीवनातील एक मूलभूत समस्येचा समाज सांस्कृतिक (socio-cultural) शोध आहे. अखेरच्या परिशिष्टामध्ये आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून मासिकपाळीसंबंधी लेखिकेने वस्तुनिष्ठ माहिती दिली आहे. सर्वात शेवटी संदर्भग्रंथांची सविस्तर सूची आहे. शिवाय प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी तळटीपा आहेत. त्यामुळे लेखिकेचे प्रत्येक विधान साधार असल्याची खात्री पटते.

सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वेयांनी लेखिकेच्या भूमिकेशी संवादी अशी प्रस्तावना लिहिली आहे.

वैद्यक शास्त्रातील संशोधनावर सुद्धा पुरुषप्रधान संस्कृतीचा जबरदस्त पगडा असल्याचे अरुणा देशपांडे यांनी दाखवून दिले आहे. ज्या सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणात व्यक्तीची जडणघडण होते त्या समाजातील समाजांनाच संवादी अशी विधाने वैद्यक शास्त्रातील मंडळीही करतात. त्या उदाहरणांमध्ये 'स्त्रीरोगशास्त्राचे बायबल' समजल्या जाणाऱ्या जेफकॉट या शास्त्रज्ञानेही स्त्रीची मासिकपाळी म्हणजे 'गर्भाशयाचे अश्रू' असे म्हटले आहे. वस्तुत: हे विधान 'शास्त्रीय' नव्हे. पण त्यातून स्त्रीचे दुय्यमत्त्व सुचवणारा काहीसा अधिक्षेपकारक ध्वनी निर्माण होतो. याचा पुनरुच्चार डॉ. बर्वेप्रस्तावनेत करतात. डॉ. बर्वेयांनी प्रस्तावनेच्या शेवटी केलेली विधाने सर्वच

संवेदनशील माणसांना विचारप्रवण करणारी आहेत.

मासिक पाळी ही फक्त स्त्रियांनाच येत असल्याने हे पुस्तक फक्त स्त्रियांसाठीच आहे, असा सामान्यपणे समज होईल. पण लेखिकेने प्रारंभीच सांगितले आहे की, 'स्त्रियांबरोबरच आजच्या पुरुषांनाही परंपरागत मानसिकतेतून बाहेर येऊन या विषयाकडे अधिक मानवी आणि शास्त्रीय भूमिकेतून पहायची गरज आहे. पुरुषाचा स्वत:चा जन्म आणि त्यांना होणाऱ्या मुलांचा जन्म या दोन्ही घटनांद्वारे त्यांचा स्त्रीच्या मासिक पाळीशी जैविक संबंध जोडला जात असतो.'

डॉ. राजेंद्र बर्वेप्रस्तावनेच्या शेवटी म्हणतात, ''पुस्तकामध्ये जागोजागी असलेल्या स्त्री जीवनातील अतिशय सूक्ष्म आणि वैयक्तिक अनुभवांमुळे वाचकाला... विशेषत: पुरुष वाचकाला स्त्रियांविषयी नव्याने अंतर्ज्ञान होऊ शकेल. व्यक्तिगत पातळीवर निवेदन करायचे झाल्यास मी स्वत:ला हे पुस्तक वाचत असताना अनेक प्रश्न विचारू लागलो. आईचा मुलगा, बहिणीचा भाऊ, पत्नीचा पती आणि मुलीचा पिता या नात्याने वावरत असताना मी या निकटवर्ती व्यक्तींकडे अधिक संवेदनक्षम आणि तरल वृत्तीने पाहू लागलो ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

पुस्तकाच्या पुरुष वाचकांनाही अशी अनुभूती मिळावी किंवा मनमोकळेपणाने ती त्यांनी घ्यावी, असे मला आग्रहपूर्वक म्हणावेसे वाटते.''

मला वाटते विविध नात्यांनी स्त्री पुरुष यांच्यामध्ये सहृदय सामंजस्य निर्माण होण्याच्या दृष्टीने डॉ. राजेंद्र बर्वेयांचा अनुभव महत्त्वाचा आहे.

एरव्ही अनेक विषयांवर बडबड करणाऱ्या बायका स्त्री जातीला अटळ असलेल्या मासिक पाळी या विषयावर मात्र 'मौन' पाळतात. मात्र लेखिकेने या नाजुक पण महत्त्वाच्या विषयाला वाचा फोडताच बहुतेकींची 'आम्हाला बोलायचं आहे' हीच उत्कट इच्छा दिसली. त्यातून 'शापाचे मूळ' शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली. अनेक स्त्रिया मनमोकळेपणाने या विषयावर बोलल्याचे उल्लेख आहेत.

आदिम मानवाच्या कथांपासून ते धर्मशास्त्रातील कथांपर्यंत तपशीलाची विविधता असली तरी कोणाच्या तरी शापामुळे बाईला मासिकपाळीचा त्रास सोसावा लागतो हे समान सूत्र पुढे येते. भारतीय पुराणकथेत इंद्राच्या हातून घडलेल्या ब्रह्महत्येच्या पातकाचा एकतृतीयांश वाटा बायकांनी घेतला म्हणून हा त्रास त्यांना भोगावा लागतो. वस्तुत: मुळात हे पातक इंद्राने म्हणजे एका पुरुषाने केले.शापाचा वाटा मात्र बाईला भोगावा लागतो. हे म्हणजे 'चोर सोडून संन्याशाला फाशी' असा उलटा न्याय झाला पण असा विचार करणेही पापच! ख्रिश्चन धर्मानुसार ॲडॅम आणि ईव्ह यांच्या जोडीपैकी देवांनी मनाई केलेल्या ज्ञानवृक्षाचे फळ प्रथम ईव्हने म्हणजे स्त्रीने खाल्ले म्हणून तिला हा शाप दिला. एरव्ही पुरुषाच्या ज्ञानाचा गौरव करणारा समाज जणु स्त्रीला

ज्ञानी होण्यास प्रतिबंध करतो, असाच या कथेचा अर्थ निघतो. या कथेनुसार खरे तर स्त्री जी पुरुषाच्या आधी 'ज्ञानी' झाली म्हणून तिचा अधिक गौरव व्हायला हवा होता. पण पुरुषप्रधान अर्थव्यवस्था व धर्मव्यवस्था स्त्रीजन्माच्या सन्मानाच्या बलिवेदीवरच उभी आहे, याचा प्रत्यय येतो.

आदिकृषीप्रधान मातृसत्ताक अर्थव्यवस्था ही स्त्री गौरवाची धर्मव्यवस्था असल्याचा प्रत्यय येतो. त्याचा मानववंशशास्त्रीय थोडक्यात आढावाही घेतला आहे. मातृसत्ताक व्यवस्थेचे पितृसत्ताक आणि पितृप्रधान व्यवस्थेत रुपांतर करताना स्त्री मनात स्वत:बद्दलच अपराधभाव निर्माण करणाऱ्या कथा, समजुती तिच्या मासिक पाळीभोवतीच गुंफल्या गेल्या. तिच्या देहावरचे स्वामित्व हिरावून धार्मिक कहाण्या आणि व्रतवैकल्ये (उदा. ऋषिपंचमी) निर्माण केली गेली. याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

रजस्वला स्त्री जणु माणूस नव्हेच अशी निर्बंधाची मालिका मनूसह सर्व धर्मशास्त्रज्ञांनी निर्माण केली. आरोग्यास्त्रदृष्ट्या ती चुकीची आणि विपरीत आहेच. पण तिने स्नान, वेणीफणी करू नये, लोखंडी पात्रात एकवेळीच जेवावे, रकट्यावर झोपावे अशा अवमानकारक रूढी केल्या. जणु स्त्रीचा देह केवळ पुरुष भोगाचे साधन आहे. एरव्ही तिनें त्या देहाची निगा राखणे हे पाप, हे गृहितक यामागे आहे. उलट या काळात सकस भोजन, स्वच्छ स्नान अधिक आरोग्यदायक आहे याचे भान धार्मिक ग्रंथकारांना नाहीच पण आयुर्वेदकारांनाही नाही, असे लेखिका सांगते. म्हणजे वैद्यकीय ग्रंथही रुढ सामाजिक व धार्मिक रुढींचीच पुष्टी करताना दिसतात. त्याची अत्यंत अशास्त्रीय पण गोलमाल शास्त्रीय (आधुनिक) भाषेत वर्णने करून चुकीची मूल्ये रुजवतात, हे अधिक घातक असल्याची उदाहरणेही लेखिका देते.

स्त्रीत्वाचा आदर करण्याची आमची परंपरा आहे असे एकीकडे म्हणत दुसरीकडे तिच्या मूलभूत गरजा, अडचणी यांची दखल पूर्वीही घेतली नाही आणि आजही घेतली जात नाही.

मुलींच्या शाळा, महाविद्यालये तसेच इतर लहान कचेऱ्यांपासून मोठमोठ्या कंपन्यांमार्फत स्त्री कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र व पुरेसे पाणी असलेली सुरक्षित स्वच्छतागृहे नसतात. कामगार संघटनाही स्त्री कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांकडे दुर्लक्ष करतात. ही सर्वच स्त्रियांची तक्रार आहे. कामानिमित्त दीर्घकाळ घराबाहेर रहावे लागणाऱ्या स्त्रियांची संख्या आता तालुक्याच्या ठिकाणीही वाढते आहे. पण या मूलभूत सोयीबाबत सर्व व्यवस्था ठार बधीर आहेत.

शेकडा ८०% स्त्रियांच्या मनात मासिक पाळीबद्दलचा अपराधभाव आजही आहे. देवाधर्मापासून त्या काळात दूर राहण्याचे वा पाळी लांबवण्याचे दडपण असते. अनेक

गैरसमज असतात. त्याबाबत बायका स्वतंत्र विचारच करीत नाहीत. मग आचार तर दूरच.

काही बायकांनी मात्र 'पाळीच्या काळातही देवळात जातो, पूजा करतो, लोणचे काढतो तरी काही होत नाही. त्यातून दडपण जाऊन मोकळेपणा येतो, असे आपले अनुभव सांगितले आहेत.

घरात वयात येणाऱ्या मुलीला नीट शास्त्रीय माहिती न दिल्याने प्रौढ, पदवीधर, स्त्रियाही गैरसमजाच्या बळी कशा ठरतात, याचेही नमूने भेटतात. सर्व धर्मांचे शास्त्रकर्तेपुरुष आहेत. आणि ते पुरुषप्रधान सत्ता व्यवस्था टिकवणारे असल्याने स्त्रीच्या मासिक पाळीला सर्वांनीच 'शाप' ठरवले आहे हे खरे आहे.

परंतु या पार्श्वभूमीवर वारकरी पंथातील संत चोखोबांची पत्नी सोयराबाई उर्फ 'चोख्याची महारी' हिने 'देहीचा विटाळ देहीच जन्मला' किंवा 'विटाळावाचूनी कोण जन्म जगी । ऐसे द्या सांगोनी मजलागी ।' म्हणून फटकारले आहे . तसेच कर्नाटकातील लिंगायत पंथाचे प्रवर्तक बसवाचार्य यांनी आपल्या पंथात रजस्वला स्त्रीवर कोणतीही बंधने घातली नव्हती. आजही या पंथातील स्त्रिया पाळीच्या काळात मंदिरातही जातात. या क्रांतिकारक उदाहरणांचा लेखिकेने उल्लेख करायला हवा होता. कदाचित लेखिकेला ते माहित नसेल.

मासिक पाळीविषयी अपराधभाव बाळगणाऱ्या स्त्रियांनी सोयराबाईंचे अभंग व बसवेश्वरांची 'वचने' अवश्य वाचावीत.

गेल्या पंचवीस वर्षात जीवनातील अनेक बाबींचा स्त्रीच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला जात आहे. प्रस्तुत स्त्रीविषयीच्या नाजूक आणि जिव्हाळ्याच्या विषयाचा या नवीन परिप्रेक्षात वस्तुनिष्ठ अभ्यास अरुणा देशपांडे यांनी केला आहे. हे पुस्तक सर्व जिज्ञासू व संवेदनशील स्त्री–पुरुषांनी आवर्जून वाचले पाहिजे अशी आग्रहाची शिफारस करावीशी वाटते.

# सुंदर मी होणार

'ती' रोज आपल्या आरशासमोर उभी रहायची आणि तोऱ्यानं विचारायची, 'आरशा आरशा. तूच सांग, सगळ्या जगात सुंदर कोण?'

आरसा उत्तर द्यायचा, 'दुसरं कोण राणीसाहेब? तुम्हीच!''

आणि राणी आनंदविभोर होऊन दुप्पट दिमाखाने मिरवायची. पण एक दिवस तिचा नक्षा पुरता उतरला. नेहमीप्रमाणं तिनं आरशासमोर उभं राहून प्रश्न विचारला, उत्तर तिला माहितच होतं. वर्षानुवर्षेआरसा एकच उत्तर देत आला होता. पण आज आरशानं निराशा केली. आरसा म्हणाला, 'राणीसाहेब, कालपर्यंत तुम्हीच सुंदर होता. पण काल मध्यरात्री तुमच्याच राज्यातल्या एका गरीब शेतकऱ्याच्या घरात एक बालिका जन्माला आली आहे. ती तुमच्यापेक्षाही सुंदर आहे.'

राणी संतापाने बेभान झाली आणि समोरचा आरसा फोडून टाकला. आरशाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. त्याच्या प्रत्येक लहान तुकड्यात राणीला आपला चेहरा दिसू लागला. जितके आरशाचे तुकडे तितके कुरुप चेहरे!

ही गोष्ट आपल्या बहुतेकांच्या ओळखीची असते. कारण आपण प्रत्येकजण कधीतरी वेड्या वयात आरशासमोर उभं राहून मनातल्या मनात त्या राणीसारखाच प्रश्न विचारीत असतो आणि आरसाही आपल्याला 'तूच सुंदर' म्हणून उत्तर देत असतो. आपण आरशातल्या आपल्याच प्रतिमेवर खुश होतो. कारण आपण आपल्याच 'त्या' प्रतिमेच्या प्रेमात पडलेले असतो.

लोक म्हणत असतात, 'नाक नकटं आहे, रंग काळा आहे, डोळे बटबटीत आहेत'

पण आपला आरसा मात्र आपल्याला छातीठोकपणे सांगत असतो, सगळ्या जगात तूच सुंदर आहेस.

या वेडातूनही बाहेर पडण्याचा एक दिवस उगवतोच. आपण काही राणीसारखा घरातला आरसा फोडत नाही. पण मनातली आपली सुंदर प्रतिमा मात्र भंगलेली असते. आपण आता थोडे भानावर येत असतो.

तोच तारुण्याच्या नव्हाळीत 'कुणीतरी' भेटतं. आपल्याकडे अनिमिष नेत्रांनी टक लावून पहात म्हणतं, 'तू सुंदर आहेस.' मग आपल्यालाही ते कुणीतरी सुंदरच सुंदर दिसू लागतं. कधी तरी मग (व्यावहारिक रीतीप्रमाणं) ते आपण असू की असेच आपल्यासारखे आणखी कोणी एकमेकांना सुंदर दिसणारे असू... आणखी जवळ येतात. 'वाजवा रे वाजवा' होतं. अजून पाय अधांतरीच असतात. कोणीतरी म्हणतं, 'काय मेल्यानं पाहिलं तिच्यात (त्याच्यात) एवढं कोण जाणे?' मग कधीतरी तेही दोघे भूमीवर येतात. पण तेव्हा मात्र ते एकमेकांना जगाच्या पाठीवरच्या सर्वात सुंदर व्यक्तीच दिसतात. ते काही खोटं नसतं. इतरांना ते दिसत नाही. कारण 'तिच्याकडे' पाहताना पाहणाऱ्याजवळ 'त्या'ची नजर नसते आणि 'त्याच्या'कडे पाहताना 'तिची' नजर नसते. म्हणून तर म्हणतात नां, लैलाचं सौंदर्य दिसायचं असेल तर मजनूची नजर पाहिजे. सौंदर्य पाह्यचं असेल तर आधी तुम्ही प्रेमात पडा म्हणजेच तुमची नजर सुंदर करा. तुमची दृष्टी सुंदर करा. कवी म्हणतो, 'शौक ए दीदार है, तो नजर पैदा कर ।।'

पेशवाईतले कवी मोरोपंत म्हणतात,

'न जे प्रिय सदोष ते, प्रिय सदोषही चांगले ।'

जे प्रिय नसते ते सदोष वाटते आणि जे प्रिय असेल ते सदोष असूनही चांगले, सुंदर वाटते. नंतर मात्र मोरोपंत वात्सल्यभावाचे उदाहरण देऊन सांगतात, आपलं बाळ धुळीनं आणि चिखलानं माखलेलं असलं तरी आईबापांना ते सुंदरच दिसतं. म्हणून तर पोर थोडं किरकिरायला लागलं की आईला वाटतं माझ्या गोड(?) पोराला कुणाची तरी दृष्ट लागली असेल. आपल्या लोकभाषेत सांगायचं तर आपला तो बाब्या दुसऱ्याचं ते कारटं. एकूण काय प्रेमाच्या नजरेला सगळं जग सुंदर दिसतं. जर जगावर आपल्याइतकंच आपलं प्रेम असेल तर....!

सौंदर्य वस्तूत असतं की, पाहणाराच्या नजरेत असतं? सौंदर्याचे खरंच काही वस्तुनिष्ठ निकष असतात का? हा फार जुना आणि तरीही नित्य नवा प्रश्न आहे. कारण तो विविध कलांच्या संदर्भात गंभीर चर्चेचा विषयही असतो आणि माणसांच्या जगात

व्यक्तीच्या सौंदर्याचाही प्रश्न असतो.

आपल्या 'दिसण्या'तल्या सौंदर्याबांबत माणूस प्राणी जेवढा सतत जागरूक असतो, तेवढी जागरूकता इतर प्राण्यात नसादी. पुनरुत्पादनाच्या काळात फक्त नर मादींच्या परस्पराकर्षणाची क्रीडा चालत असेल तेवढीच. त्याचीही बरीचशी सोय निसर्गानेच विविध रुप, रंग, गंधांच्या रुपाने प्राण्यांसाठी केलेली असते.

पण निसर्गाने जेवढं दिलं आहे, तेवढ्यावरच खुश राहील तर तो माणूस कसला? म्हणून तर माणूस सतत स्वत:च्या इच्छेनं निसर्गाला वळवीत, वाकवीत, बदलवीत आला आहे. अगदी शरीरसुद्धा! माणसाचं हे स्वेच्छेनं जगाला बदलवणं आहे, त्यातून सगळा संस्कृतीचा पसारा निर्माण झाला आहे. रूप (आकार), रस, गंध, रंग आणि स्पर्श यातून सगळ्या अस्वाद्य संस्कृतीचा विकास झाला आहे. माणूस निसर्गाने निर्माण केलेल्या या मूलभूत तत्त्वांतून स्वत:चं असं जग निर्माण करू पाहतो. म्हणून तो रूप(आकार) या आदितत्त्वापासून सुरवात करतो.

आपली उंची, जाडी, चेहरा, नाक, कान, जिवणी, दात, डोळे हे सगळे चेहऱ्यावरचे अवयव, हात पायापासून अक्षरश: नखापर्यंत माणूस प्रत्येक इंद्रियाला निसर्गाने दिलेल्या अवस्थेतच अखेरपर्यंत स्वीकारीत नाही. त्या प्रत्येकात आपल्या इच्छेनं बदल करू पाहतो. समाजमान्य अशा सौंदर्याच्या मोजमापाने स्वत:चं दिसणं मोजू लागतो.

समाजाला वाटलं की, अमुक रंग, अमुक प्रकारचे केंस, अमुक तऱ्हेचे दात इत्यादी इत्यादी चांगलं आहे, सुंदर आहे की मग आपण तस्संच दिसावं असा खटाटोप सुरू होतो. तसं 'असणं' पेक्षा तसं 'दिसणं' महत्वाचं वाटायला लागतं. तसं असण्याचा निदान भास निर्माण करावासा वाटतो.

पण समाजात तरी दिसण्यातल्या सौंदर्याचे निकष कायम असतात का? समाजाच्या सर्व स्तरात ते समान असतात का? जगाच्या पाठीवरच्या विविध समाजात ते समान असतात का? अशा प्रश्नांची उत्तरं शोधायला लागलं की, देशकालपरत्वे अगदी बाह्य सौंदर्याचे निकषही बदलत आलेले दिसतात.

दुसरी एक गोष्ट प्रथम दर्शनीच लक्षात येते. दिसण्याबाबत स्त्री देहाची जितकी चिकित्सा होते तितकी पुरुष देहाबाबत होत नाही. माणसाच्या जातीचं हेही एक वेगळेपण! प्रकृतीने अन्य प्राण्यांमध्ये मादीला आकर्षित करून घेण्यासाठी नराच्या देहातच रुप, रस, गंधादींची विशेष आकर्षक तरतूद करून ठेवलेली आहे आणि इतकं

असूनही तोच आपल्या सौंदर्याचं प्रदर्शन करीत मादीभोवती पिंगा घालताना दिसतो. विशेषत: पक्षी सृष्टीत हे प्रकर्षाने दिसते.

माणसांनी!ही तसं 'जनानी' आणि 'मर्दानी' असं सौंदर्याबाबत विभाजन केलं असलं तरी माणसानी घडवलेल्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक धारणांचंच प्रतिबिंब त्यात प्रकर्षाने आढळतं. म्हणून तर 'पराक्रम हे पुरुषाचे सौंदर्य असते, तर सौंदर्य हा स्त्रीचा पराक्रम असतो.' अशी शुभाषितं फार लोकप्रिय होतात. समाज प्रगत झाला असं म्हटलं जात असलं तरी या सुभाषितात व्यक्त झालेली मानसिकता प्रबळपणाने मूळ धरून राहिलेली दिसते. सध्याच्या सौंदर्यसाधनांच्या उत्पादनांचा आणि जाहिरातींचा भडिमार पाहिला की त्याची कल्पना येते या भडिमारातून एकसाची सौंदर्यकल्पना प्रसारित होत राहतात.

अगदी शरीर सौंदर्याबाबत निरनिराळ्या काळात आपल्या देशापुरतं पाहिलं तर खूप विविधता दिसते.

प्राचीन संस्कृत साहित्यातही स्त्रीच्या गोऱ्या रंगाला भाव असला तरी त्यातही सपीटासारखा गोरा, चांदणगौर वर्णापासून गोधूम वर्ण, केतकी वर्ण अशा विविध छटा दिसतात. आणि त्याचवेळेला नीलश्यामलवर्णा द्रौपदीच्या सौंदर्याचे अनोखे तेजस्वीपणही भेटते. गोरी घारीपेक्षा उष्ण अशा भारताला आणि त्यातही महाराष्ट्र कर्नाटकाला श्यामलवर्ण हा अधिक प्राकृतिक आणि स्वभाविक आहे. 'एक गोरी आणि हज़ार खोड्या चोरी' अशा एखाद्या लोकप्रचलित वाक्प्रचारात गौरवर्णासंबंधीची अढी किंवा काहीसा अधिक्षेपच दिसतो.

स्त्री सौंदर्याबाबतही अभिजन वर्गाच्या धारणा आणि लोकधारणा यात कमालीचा फरक दिसतो. 'सावळा वर बरा गौर वधूला' अशी अभिजनांनी तरफदारी केलेली असली 'शुभ्र तनु जानकी। राम घननील तो ।।' अशी उदाहरणे दिली असली तरी जात्यावर दळण दळणाऱ्या श्रमकरी शेतकरी बाईला रानावनातून नवऱ्यामागे हिंडत वनवास काढणारी आणि तरी संशयावरून नवऱ्याने रानात सोडून दिलेली गर्भवती सीता ही आपल्याच सुखदु:खाच्या कुळीची बहीण वाटते. मग अशा सीताबाईचं वर्णन करताना,

राम नि लक्षीमण दोघे इंद्रनील मणी ।<br>
त्यांच्यामंझार शोभे सावळी सीतामाई ।।

म्हणून सीतेचं सावळेपण अधोरेखित करते.

अंगावर फुलांचा हार पडल्याने बेशुद्ध पडून मरण पावलेल्या इंदूमती नावाच्या अतिनाजुक राणीचं कौतुक 'अजविलाप' या संस्कृत काव्यात रंगवलेलं असतं तर दगडाचं जातं ओढण्याइतकं बळ मनगटात असलेली आणि म्हणून आपल्या आईच्या दुधाचा अभिमान बाळगणारी तरुणी लोकगीतात भेटते.

महाराष्ट्रातल्या पुढारलेल्या एका समाजात स्त्री पुरुषांच्या घाऱ्या डोळ्याचे कौतुक असले तरी उर्वरित महाराष्ट्राला काळ्याभोर डोळ्यातच सौंदर्य आढळते. फार तर उर्दू – पर्शियन काव्याची लागण झालेल्या एखाद्या कवीला ''डोळे तुझे बदामी।'' भुरळ घालताना दिसतात.

कुरंगनयना (हरिणाक्षी), मीनाक्षी, कमलाक्षी, पद्माक्षी असे डोळ्यांचे विविध आकार रुचीनुसार सौंदर्याचे लक्षण ठरतात तर कुणाला चंचलाक्षी मृगनयना मोह घालते. त्याचवेळी मात्र जनलोकात 'गाईसारखे शांत' आणि नीतळ सोशीक डोळे जन्माचा दिलासा देतात.

कुणाला ताणलेल्या विरळ भुवया भुरळ घालतात तर कुणाला कमानदार रेखीव धनुष्याकृती भुवया गुंगवून ठेवतात.

कुणाला पातळ ओठ सौंदर्याचे लक्षण वाटते तर कोणाला आव्हानात्मक, काहीसे पुष्ट ओठ ओढ लावतात, कोणाला कुंदकळ्यासारखे दात सुंदर दिसतात तर एखाद्या ग्रामकन्येचं 'कुरळ्या केसाची, विरळ्या दाताची।' म्हणून केलेलं वर्णन लोभवतं.

भ्रमरांच्या थव्यासारखा काळाभोर आणि कपाळावर वलयांकित बटा रूळवणारा कमानी वळणाचा केशसंभार गुंगवून ठेवतो तर कुणाला सोनेरी केसांच्या राजकन्येचा ध्यास लागतो, कुणा पर्शियन कविकुळाची लागण झालेल्या कवीला तांबूस रेशमी केशकलाप बांधून ठेवतो तर हल्लीच्या शांपू जाहिरातीतल्या समस्त सुंदऱ्या दोरीसारख्या सरळसोट केसांचे फलकारे घुमवण्याचा आदर्श समोर ठेवतात.

कुणाला सरळ धारदार नाकाची धार जायबंदी करते तर कुणाला किंचित अपरं (डोळा मारीत उडवलं जाणारं) नाक (जयश्री गडकरी नाक) मोहात पाडतं. कुणाला उंच मोठं कपाळ सुंदर दिसतं तर कुणाला किंचित लहान, कमानदार केसांच्या महिरपीचं कपाळ आवडतं. कुणाला लांबसडक कृश अशी हातापायाची बोटं सुंदर दिसतात. तर कुणाला किंचित गुबगुबीत मऊ हात हातात घेणं अधिक सुखावतं.

कुणाला कृश चवळीची शेंग कवळी असलेला बांधा म्हणजे सौंदर्याची पुतळी वाटते

तर कुणाला भरलेला बांधा बांधून ठेवतो.

गजगामिनी, हंसगामिनी, मोराची चाल, लटपट चालणं ते आजच्या कॅटवॉक्पर्यंत चालींच्याच कितीक चाली आपल्या खासीयतीत चालत आल्या आहेत. कुणाला हरिणीची तुरूतुरू चाल आकर्षित करते तर कुणाला कुर्रेबाज चालीचाही मोह पडू शकतो.

हे झालं आपल्या देशातलं. आपल्याकडे कमलदलासारखी लांबसडक पावलं मोहक वाटतात तर जपानच्या परंपरेत इवलीशी बुटकी बंदिस्त पावलंच सुंदर मानली जातात.

परत जगाच्या पाठीवरच्या निरनिराळ्या वंशांच्या अंगलटी ठेवणी, चर्या त्यांच्या त्यांच्या समाजातल्या सौंदर्याची गौरीशंकर असतात. अगदी निग्रोंनाही आपल्या काळ्या कुळकुळीत रंगाचा अभिमान असल्याची आणि तोच रंग सुंदर असल्याची धारणा त्यांच्या एका लोककथेतून व्यक्त होत असते. एकूण काय तर 'लोकं भिन्नरुचैर्जनस्य' व्यक्ती तितक्या आवडी आणि ज्याला जे आवडतं ते त्याच्या दृष्टीने सुंदर असतं. शरीर सौंदर्याचे, बाह्य सौंदर्याचे काही स्थायी निकष ठरवणं कधीही कुणाला शक्य झालेलं नाही, हेच खरं.

आणि तरीही प्रत्येकाची ओढ प्रथम दर्शनी तरी बाह्य सौंदर्याकडेच असते. तत्त्वज्ञ कवी पुन:पुन्हा सांगतच असतात की,

जन विषयातील किडे ।<br>
त्यांची धाव बाह्याकडे ।।

म्हणून अधिक स्थायी, अंत:सौंदर्याचा वेध घेणं अधिक शहाणपणाचं.

क्रमाने संपत्ती आणि शारीरिक सौंदर्य यांचा फार काय मुळीच अहंकार बाळगू नये कारण ते कोणत्या क्षणी नष्ट होईल सांगता येत नाही.

ययातीने शरीरभोगाचा हव्यास धरला आणि त्याला जेव्हा कळले, की 'उपभोगेनशाम्यति' केवळ शरीराचे उपभोग कधीच पूर्ण शांती आणि समाधान देत नाहीत. कारण माणूस म्हणजे केवळ शरीर नव्हे. शरीराबरोबरच मन आणि बुद्धीच्या सौंदर्याचीही काळजी घेणं महत्त्वाचं.

अनेकदा आपणा सर्वांनाच अनुभव येतो की, शरीर सौंदर्याचे रूढ निकष एखाद्या व्यक्तीकडे असूनही जर बुद्धिमत्ता, आत्मविश्वास नसेल तर त्या व्यक्तीकडे फारसं लक्ष जात नाही. गेलं तरी टिकून राहत नाही. मग ती स्त्री असो की पुरुष! त्याउलट एखाद्या

व्यक्तीकडे रूढ सौंदर्याचे कोणतेही लक्षण नसले तरी तिची प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्यामुळेच सौंदर्याचे वलय त्या व्यक्तीला व्यापून राहते.

असं म्हणतात की, इसाप हा एक कुरुप गुलाम होता. पण त्याची विलक्षण कल्पनाशक्ती, अमोघ चातुर्य आणि गुलामगिरीतून मुक्त स्वातंत्र्याकडे जाण्याची उर्मी इतकी प्रबळ होती की, तो जाईल तिथे त्याच्या चाहत्यांचा वेढा पडत असे. त्याच्या गोष्टी ऐकण्यासाठी, त्या गोष्टींतून मिळणारा संदेश उमगून घेण्यासाठी लोक उत्सुक असत.

सॉक्रेटिसच्या बाबतीतही असंच म्हटलं जातं. तोही कुरुप होता. पण विलक्षण धारदार बुद्धिमत्ता, जनहिताची तळमळ आणि सत्यनिष्ठा या गोष्टी इतक्या पराकोटीच्या होत्या की अखेरचा विषाचा पेला घेईपर्यंत त्याच्या परमभक्तांना त्याला सोडवत नव्हते. सॉक्रेटिस काय की इसाप काय त्यांच्या सुंदर कर्तृत्वाने ते अजरामर झाले.

सौंदर्याची ओढ ही सुसंस्कृतपणाचीच ओढ असते. ते स्वाभाविकच आहे. प्रकृती आहे त्यापेक्षा अधिक उन्नत आणि सुंदर करण्यासाठी माणूस आपले बुद्धिकौशल्य वापरीत आला आहे. म्हणूनच शरीर सौंदर्याहून मनाचे आणि बुद्धीचे सौंदर्य कांकणभर नव्हे चांगलेच सरस ठरते. दीर्घजीवी तर ठरतेच.

जीवनातली सगळी स्थित्यंतरं सहजपणे पेलण्यासाठी मन आणि बुद्धी परिपक्व झाली की त्या त्या वेळचं शरीरही सुंदर दिसतं. म्हणूनच महात्मा गांधींच्या दंतविहीन कृश, वृद्ध चेहऱ्यावरचं हास्य सुंदर असतं. महात्मा गौतमाच्या कषाय अर्ध वस्त्रांकित शरीराच्या चेहऱ्यावरचा करूणांकित शांत व आश्वासक भाव चिरस्मरणीय करण्यासाठी शिल्पकार आणि चित्रकार आपली सौंदर्यानुभूती पणाला लावीत आले आहेत. हिमशुभ्र दाढीचे रवीन्द्रनाथ ठाकूर वृद्धत्वातील सौंदर्याचा आदर्श आहेत. देहसौंदर्याने नगरातील युवकांना घायाळ करणाऱ्या कितीतरी रूपगर्विता काळाच्या पडद्याआड गेल्या. त्यांची नावंही शिल्लक राहिली नाहीत. पण त्यापलीकडच्या चिरंतन सौंदर्याचा आणि शांतीचा ध्यास घेतलेली एकेकाळची रूपवती आम्रपाली मात्र महात्मा गौतमाच्या तोडीची सम्बोधी प्राप्त करून अजरामर झाली.

दृश्य सौंदर्यापलीकडचे सौंदर्य टिपण्याचे सामर्थ्य लाभले की ओबडधोबड काळ्या पाषाणाची विटेवरची मूर्ती पाहून 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी।' असा साक्षात्कार तुकारामांसारख्या संतजनांना होतो.

जन्मतःच दोन्ही पायांनी अपंग! पण सुदैवाने राष्ट्रप्रेमाने झपाटलेल्या ऐन तारुण्यातल्या विनायक दामोदर सावरकर यांच्या 'अभिनव भारत मित्र मेळा' मधील

एक सच्चा मित्र सुंदर होण्याचा ध्यास घेऊन उत्स्फूर्तपणे गाऊ लागला. देहाने अपंग असलेले त्याचे कविमन उत्तुंग भराऱ्या घेऊन ओजस्वी कविता करू लागले. त्याच्या कविता आवेशाने गात गात सावरकरांच्या राष्ट्रीय प्रेमाने भारलेल्या मित्रांची संघटना प्रथम नाशिकला उभी राहिली.

त्यांच्या मेळाव्यातला हा कवी म्हणजे 'कवी गोविंद! गोविंद आबाजी दरेकर!' तो अपंग कवी आपली दुर्दम्य इच्छाशक्ती कवितेतून सांगतो.

'सुंदर मी होणार । आता मरणाने जगणार ।'

'मरणम् प्रकृति शरीरिणाम् ।' शरीर कधीतरी संपणारच. पण मरणाने सुंदर होण्याचा संदेश देणारे कवी गोविंद मात्र अमर होतात.

# खरंच आमचा कळवळा आहे ?

''ताई आमच्या जातीचा मेळावा आम्ही प्रथमच घेतोय. तुम्ही यायला हवं. नाही म्हणू नका. आमच्या बायका अडाणी आहेत. शिकलेल्याच नाहीत.''

''तुनच्यात पुरुष किती शिकलेत?'' मी मधेच विचारलं.

''पुरुष पण फार कमी शिकलेत. दोघं आत्ताशी डॉक्टर झालेत. ५/६ वकील झालेत हे खरं पण बहुतेक पोरं मॅट्रिक व्हायच्या आधीच साळा सोडून देतात.''

''आता पुरुषच जर इतके अशिक्षित असतील तर बायका शिकलेल्या कुठून येणार? आपल्या बायका खरंच शिकाव्या असं वाटतं का तुम्हाला?'' या प्रश्नाचं उत्तर देताना समोरची मंडळी संकोचली, गोंधळली.

एका शिकलेल्या बाईला आपण आपल्या जातीतल्या बायकांच्या मेळाव्याचं उद्‌घाटन करण्यासाठी बोलवायला गेल्यावर एक तर ती होकार देईल, नाहीतर नकार देईल. पण असा काही उलटा पंचनामा होईल, असं त्या कार्यकर्त्यांना वाटलं नसावं. पण बायकांचा मेळावा घ्यायची त्यांनी इच्छा मात्र प्रामाणिक होती.

''मी येईन मेळाव्याला. पण परत याल तेव्हा एखाद्या बाईला कार्यकर्ती म्हणून घेऊन या. अडाणी असली तरी.''

मंडळी संकोचानं हसली आणि समाधानानं परत गेली.

मेळाव्याच्या आधी तासभर मला घेऊन गेली. प्रथम थोडा वैताग आला. पण मग बिचकत बिचकत एखाद दुसरी तरुण मुलगी येऊ लागली. चहा पाणी विचारायच्या निमित्तानं!

मेळाव्याला साडेतीनशे ते चारशे बायका असतील त्यांच्या बोलीत 'कालवा' चालला होता. प्रत्येकीच्या आसपास एखाद दुसरं पोर होतं. त्यामुळं ओरडा आरडा होणं स्वाभाविक होतं.

मुली आता शाळेत जायला उत्सुक होत्या. दोघी चौघी कॉलेजातही जात होत्या. ''पण जास्त शिकायला घरातनंच विरोध होतो ताई. तू शिकलीस तर नवरा कुठनं आणायचा? आपल्यात शिकलेली पोरं कुठं असतात फार? असं म्हणतात.''

मुली आता मोकळेपणानं बोलायला लागल्या होत्या.

''आता पोरं शिकत नाहीत ही काय आमची चूक?'' एकजण फणकाऱ्यानं म्हणाली.

''अगं सोयी नसतील शिकायच्या?'' मी उगीचच सावरून घेत म्हटलं.

''नसायला काय झालं? आम्हा मुलींपेक्षा तर नक्कीच जास्त सोयी असतात. पोरगा म्हणून घरात पहिल्यापास्नं लाड होतात. जी काय बरी–वाईट मिळकत असती त्यातनं आधी पुरुषाचे वाटे काढले जातेत. मग ती खायची गोष्ट असो की कपड्यालत्याची असो. परत शाळेत फी नसतीच. पण यांनाच नीट मन लावून शाळा शिकायला नको.''

''आता आम्ही नाही शिकत! परत घरातली सगळी कामं करून आणि बोलणी खाऊन शिकतो. आमच्यापैकी एकजणही अजून एकदाही नापास झाली नाही.'' हे सांगणारीच्या नजरेच आणि आवाजात भलताच आत्मविश्वास होता.

''खरं सांगू का ताई, आमच्या शाळेला सगळ्यात जास्त आडकाठी आमच्या भावांचीच असती. आई अडाणी, तिला भाऊच काही बाही सांगतात. मग तिचीही बुद्धी फिरती'

''असं कसं होईल? खरं तर भावांनी बहिणींच्या पाठीशी राहून त्यांना प्रोत्साहन द्यायला हवं'' माझं मध्यमवर्गीय शहरी मन बोलून गेलं.

''होऽऽ! ते बरे पाठीशी राहतील! शाळा बुडवून ते बाहेर टगेगिरी करीत हिंडतात. ते आम्हाला माहित असतं नां! आम्ही ते घरात सांगू नये म्हणून आमचीच शाळा बंद करायला बघतात.''

''सगळे असेच आहेत?''

''नाही सगळे नाही तसे. थोडे चांगले मन लावून शिकणारेही आहेत. पण आधी बिघडलेले त्यांनाही कळपात ओढायला बघतात.''

''म्हणजे...?''

''म्हणजे शाळा बुडवून सिगरेटी ओढायच्या. गुटखा खायचा. पोरींची टिंगल टवाळी

करायची. एखाद वेळी दारू पिऊन धुडगूससुद्धा घालतात.''

''हे दुसऱ्या मुलींची टिंगल करतात, तेव्हा त्यांना वाटतं दुसरी मुलं आमचीही टिंगल करतात. आणि ते खरंच आहे हो!''

''बरं पण आता या सगळ्यांनी तुमचा मेळावा घेतला आहे ना! तिथं बोला ना काय मनात असेल ते!''

असं म्हणत असतानाच कार्यक्रम सुरु होत असल्याची सूचना आली.

मग रीतसर पुढारी, कार्यकर्तेयांची भाषणे सुरू झाली. हार, गुच्छ, फोटो सगळे सोपस्कार झाले. चार शिकलेल्या बायका, कोणी पंचायत समितीवर निवडून आलेल्या बायका सगळ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार झाले.

काही बायकाही बोलल्या. पुढाऱ्यांची प्रथमच बायकांचा असा मेळावा घेतला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त झाली. असंच सगळ्यांनी एकत्र येऊन मधून मधून भेटावं अशा इच्छा बोलून दाखवल्या गेल्या. ठराव वगैरे झाले. आणि...

''मला जरा बोलायचंय...'' एक आवाज श्रोत्यातून आला. पुढाऱ्यांच्यात जरा चलबिचल झाली. पण आमच्यासारख्या शहरी पाहुण्यांच्या नजरेतला होकार पाहून त्यांनाही होकार देणं भाग पडलं. डोक्यावरचा पदर सावरीत एक पस्तिशीची बाई माईक समोर आली आणि त्या जमातीच्या बोलीत खणखणीत आवाजात बोलू लागली. तिच्या बोलण्याचा आशय स्पष्टपणे कळत होता.

''हे मेळावा-बिळावा घेऊन आम्हा सगळ्या बायकांना एकत्र घराबाहेर काढलं ते चांगलं केलं म्हणे पुढाऱ्यांनो! पण त्यांना बायकांची खरीच कळकळ असेल तर त्यांनी दोनच गोष्टी कराव्या.''

तिच्या बोलण्यातला थेट सच्चेपणा आणि आवेश ऐकून समारोपाकडे निघालेली सभा सावध होऊन कान टवकारून ऐकू लागली. एका हाताने (सवय म्हणून) डोक्यावरचा पदर सावरीत आणि दुसरा हात पुरुष श्रोत्यांकडे आणि कार्यकर्त्यांकडे दाखवीत ती म्हणाली, ''पहिली गोष्ट म्हणजे पुरुषांनी रंडीबाजी (हा तिचाच शब्द) बंद करावी'' क्षणभर... क्षणभरच सभा या अनपेक्षित दणक्यानं सुन्न झाली आणि दुसऱ्याच क्षणी समोरच्या बायकांनी कडाडून टाळ्या वाजवून मंडप दणाणून सोडला. पसंतीचं आणि समाधानाचं हसू एकेकीच्या चेहऱ्यावरून मंडपभर पसरलं आणि सराईत वक्त्यासारखी क्षणभर थांबून पुन्हा त्यांची प्रतिनिधी असल्यासारखी ती म्हणाली, ''... आणि आपल्या लग्नाच्या बायकोला नीट नांदवावी. तिला पोराबाळासकट सोडून दुसरा घरोबा करू नये आणि दुसरी गोष्ट...'' पुन्हा सभा सावध झाली. पुरुष मंडळी अस्वस्थ

झाली, तरी ऐकण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं ना!

''दुसरी गोष्ट अशी की, सगळ्या पुरुषांनी दारू सोडून द्यावी'' पुन्हा मंडप उत्साहाने कडाडला. जणु तिच्या रूपाने साडेतीनशे बायकांचे मन गरजले होते.

''जी काय कमाई होते, ती पोराबाळांच्या खाण्या पिण्यासाठी, कपडालत्त्यासाठी आणि शिकवण्यासाठी खर्च करावी. पण वाईट गोष्ट अशी की आमचे पुढारीच लग्नाच्या बायका सोडतात आणि दारूबाजीत बुडलेले असतात. मग आम्ही यांचा विश्वास कसा बाळगायचा? आमचं ऐकणारे जे कोणी असतील त्यांच्यामागे आम्ही येऊ नाहीतर आम्हाला कुणी फुकटची भाषणं देऊ नयेत...'' आणि काही घडलंच नाही इतक्या सहजतेनं ती जागेवर जाऊन बसली.

पण आता मेळाव्यात खऱ्या अर्थानं चैतन्य संचारलं होतं. तिच्याभोवती बायकांचा गराडा पडला होता आणि त्याच गोंधळात आभाराचं भाषण कसंबसं होऊन सभा संपली.

संपली कुठली? खऱ्या अर्थानं आता कुठं सभा सुरू झाली.

पुढाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मनात असो की नसो पण मेळाव्याचं उद्दिष्ट माझ्या दृष्टीनं शंभर टक्के साध्य झालं होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाक्य त्यावेळी मंत्रासारखं मनात घुमत राहिलं.

''गुलामाला आपण गुलाम आहोत. याची फक्त जाणीव होऊ द्या. त्यातून बाहेर येण्याचा मार्ग मग तो आपण होऊनच शोधून काढील.''

खोटा वाटावा असा हा प्रसंग आहे ना! पण अगदी शंभर टक्के खरा अनुभव आहे हा! खूप काही शिकवणारा!

# रॅगिंग

नुकतेच लग्न झालेल्या शहरी नव्या नवरीला घेऊन वरपक्षाचे वऱ्हाड त्यांच्या गावी.. खेड्याकडे निघाले होते. नवरीने कधी खेडे पाहिलेच नव्हते. बैलगाडीने प्रवास करण्याचा तिचा आयुष्यातला पहिलाच प्रसंग! रस्ता खास दगडगोट्यांच्या माळरानातला, उन्हाळ्याचे रणरणते दिवस. गाडीत बसलेल्यांची धक्क्या हिसक्यांनी हाडे खिळखिळी होत होती. नवरी सहज बोलून गेली, 'त्यापेक्षा पायी चाललेलं परवडलं'

गाडी हाकणाऱ्या धाकट्या दिरानं कासरा ओढून गाडी थांबवाली आणि म्हणाला, ''वैनी, उतरा खाली''

गाडीतून सगळेच उतरणार असतील असे वाटून हिरव्या चुड्यातली नवी वैनी खाली उतरली आणि स्वत:ला सावरते आहे तोच दिराने बैलांना पराणी टोचली आणि गाडी चौखूर उधळली. गाडीतली खेड्यात राहणारी सासरची स्त्री पुरुष मंडळी भेदरलेल्या नव्या नवरीकडे पाहून चेकाळून खिंकाळत होती.

उन्हाचा ताप डोक्यावर घेत दगड गोट्याच्या रस्त्याने चालताना नवरी रडकुंडीला आली. तिला पुरती रडवल्यावरच गाडीत घेतले. सासरच्या माणसांच्या वागण्याचा त्या नवरीच्या मनावर काय परिणाम झाला असेल? दहशत, भीती, तिरस्कार अविश्वास या सगळ्याचे मिश्रण! हे सगळे आपल्या माणसांबरोबर त्यांच्याच सारख्या मनोवृत्तीने खिदळत पाहणाऱ्या नवऱ्याबद्दल तिच्या मनाच्या एखाद्या कोपऱ्यात अविश्वाचे बीज रुजले नसेल? पुढे त्यांच्या सहजीवनावर त्याचा काही परिणाम झाला असेल? त्या

कारणांचा कधी कुणी शोध घेतला असेल?

त्या मुलीच्या स्वभावावर आयुष्यभर काही परिणाम झाला असेल? ती दडपलेली, संकोचलेली राहिली असेल की संधी मिळताच आक्रमक झाली असेल? तिला सून आल्यावर ती कशी वागेल? एक की दोन अनेक प्रश्न आज माझ्या मनात येत आहेत.

अगदी लहानपणी खूप जवळून पाहिलेली ही घटना. मला नव्याने आठवली आणि त्याहीपेक्षा नवीन अशी अर्थवलये या घटनेच्या निमित्ताने माझ्या मनात उमटत राहिली आहेत. असेच हे आणखी काही प्रसंग.

अशीच एका नव्या नवरीची मंगळागौर होती. जेवणाची पंगत बसली होती. बाकी जेवणं वाढणारी अनेक मंडळी होती. पण कौतुक म्हणून नववधूने एखादा पदार्थ वाढावा म्हणून ती पंक्तीत वाढू लागली आणि तिचा छळ सुरू झाला. बाकीच्या वाढणारांना गप्प बसायला सांगून जेवणाऱ्या प्रत्येकाने वेगवेगळ्या पदार्थांसाठी तिला सतवायला सुरुवात केली. एका व्यक्तीने एक पदार्थ मागितला तर दुसरा तेव्हा घेत नसे. ती ते भांडे ठेवून आली की दुसऱ्याने परत तोच पदार्थ; मागावा. शेवटी तर मीठ, लिंबू, पाणी अशा पदार्थांसाठीही तिला तासभर धावपळ करायला लावली. ती दमून रडकुंडीला आली. सासरचे अपरिचित वातावरण आणि मुख्य म्हणजे तिच्या त्या अगतिक अवस्थेत रस घेऊन भर टाकणारी, खिदळत असलेली सगळी स्त्री पुरुष मंडळी! अखेर स्वयंपाकीण बाईंना तिची दया आली आणि त्यांनी हे नव्या नवरीचे रॅगिंग थांबवले.

ही दोन्ही उदाहरणे पाहिली की, आज ज्याला रॅगिंग म्हणतात, त्याचाच हा एक कौटुंबिक प्रकार आहे हे लक्षात येईल. रँग म्हणजे चिंधी.

आपल्या कुटुंबव्यवस्थेतही अनेक प्रकारचे रॅगिंग होत असते आणि त्याचा बळी बहुधा स्त्रिया असतात. कधी कुटुंबातील दिसायला कुरूप, आर्थिक किंवा शारीरिकदृष्ट्या दुबळी व्यक्ती असते.

आणखी एक असाच प्रसंग आठवतो. शाळेत एक नवीन मुलगा आलेला होता, गरीब असावा. बाकीचेही फार श्रीमंत नव्हते. पण याच्या चड्डीला मागच्या बाजूला ठिगळ होते. एका दांडगटाने कंपास पेटीतल्या दुभाजकाचे टोक त्याच्या ठिगळात खुपसले. त्याच्या पार्श्वभागाला ते टोचले असणार. तो कळवळून ओरडला. त्याला प्रथम काय झाले, ते कळलेच नव्हते. सगळी मुले खिंकाळत हसली आणि मग अगदी ठरवून केल्याप्रमाणे प्रत्येकाने फाटलेल्या जागी बोटे खुपसून त्याच्या चड्डीच्या जवळ जवळ चिंध्या केल्या. पुन्हा म्हणून तो मुलगा शाळेत दिसला नाही.

काय झाले असेल त्याचे? त्याने शिक्षणच कायमचे बंद केले असेल की दुसऱ्या

शाळेत गेला असेल? नेमके काय झाले असेल? तो शिकला नसेल तर कसा जगला असेल? कष्टकरी दरिद्रीच राहिला असेल की सूडबुद्धीने गुन्हेगार झाला असेल? अनेक प्रश्न मनात येत राहतात.

पुण्याच्या विधी महाविद्यालयात अलीकडे एक रॅगिंगचे प्रकरण गाजले आणि रॅगिंग विषयी उलट सुलट चर्चा सुरु झाली ती प्रामुख्याने, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थीनींमधील प्रवृत्तीची! गंमत म्हणून सुरु झालेल्या सतावणुकीचा शेवट समूहाच्या क्रूर हिंसक आक्रमकतेत होतो आणि आक्रमणाचा बळी एकाकीपणे पराभूत होतो. काही कारण नसताना तो अगतिक लाचार होतो. क्वचित विरोध केला तर विकृत आक्रमणांमुळे जीवही गमावून बसतो. कधी मारला जातो कधी स्वत:चा आत्मघात करून बसतो. सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या सुनेसारखे असते हे! सुनेच्या छळामागे आर्थिक हाव असते तर तरुणांच्या या वृत्तीमागे विकृतीखेरीज कोणतेच कारण दिसत नाही.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील रॅगिंगच्या अशा जीवघेण्या घटना अधून मधून प्रकाशात येतात. त्या बहुधा एखाद्या/एखादीचा 'बळी' गेल्यानंतरच ! प्रकाशात न येणाऱ्या पण प्रत्यक्षात होत असलेल्या अशा कितीतरी घटना प्रत्यक्षही घडत असतात.

अनेकदा 'बळी' घाबरून माघार घेतो. शिक्षण, महाविद्यालय किंवा ते गाव सोडतो. आक्रमणकर्ते 'जितं मया'च्या थाटात विजयी वीरासारखे पुन्हा दुप्पट उमेदीने नव्या 'बळी'कडे वळतात. दरवर्षी वसा दिल्यासारखा वरच्या वर्गातली मंडळी खालच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना नकळत हा वसा देत असतात. नवागताचा छळ करण्याच्या नवनव्या युक्त्याही 'ज्येष्ठ प्रतिभावंत' मंडळी शोधून काढीत असतात आणि हे रॅगिंग चक्र थोड्याफार प्रमाणात अखंड चालू राहते.

अभ्यासात लक्ष नसलेले, वारंवार नापास होऊन एकाच वर्गात वर्षानुवर्षेमुक्काम करून बसलेले, गुंड प्रवृत्तीचे 'बडे बापके बेटे' या छळसत्रात आघाडीवर असतात, हे बहुधा खरे असले तरी तथाकथित संस्कारसंपन्न घरातून आलेले आणि हुशार असलेले विद्यार्थीसुद्धा या पंक्तीत आसल्याचे अनेकदा दिसते.

महाविद्यालयात (कुटुंबसंस्थेत-घरात) आलेल्या नवीन व्यक्तीला सुरुवातीला थोडा 'हिसका' दाखवला की नवीन वातावरणात सामावून जाण्याची थोडी तयारी होते. शाळेच्या किंवा माहेरच्या सुरक्षा कोशातून मोकळ्या मोठ्या जगातल्या अनुभवांना सामोरे जाण्यासाठी त्या क्षेत्रातली वरच्या वर्गातली ज्येष्ठ अनुभवी मंडळी सुरुवातीलाच थोडे विपरीत अनुभव नवागताला देतात. एका परीने ते विपरीत अनुभवांना सामोरे

जाण्यासाठी ट्रेनिंग (सराव) असते. असे रॅगिंग चे समर्थक सांगतात. त्यात थोडे तथ्य आहेच. नवीन पावले टाकायला लागलेल्या बाळाकडे एकीकडे लक्ष ठेवीत दुसरीकडे ते पडले. थोडे लागले तरी अनुभवी वृद्ध दुर्लक्ष करतात. पुन्हा बाळ उठते. आता ते अधिक काळजीपूर्वक जपून पावले टाकते आणि वाढत्या सरावाने खऱ्या अर्थाने त्याच्या पावलात बळ येऊन ते आपल्या पायावर उभे राहते.

नवागताला असे 'तयार' करण्यासाठी सुरवातीला गंमत म्हणून, चेष्टा म्हणून थोडा त्रास वर्गातले ज्येष्ठ जेव्हा देतात, तेव्हा ते क्षम्य मानायला हरकत नाही. निदान त्यांच्या हेतूबद्दल शंका घ्यायला जागा राहत नाही.

पडलेली वस्तू उचलून दे, अमूक इतके चालून किंवा पळून दाखव, उठाबशा काढ, (येत नसेल तरी) गाणे म्हणून दाखव, नाचून दाखव अशासारखे हुकूम ज्येष्ठ नवागताला देतात. पण याच्या मनात भय, कटुता निर्माण होण्यापूर्वीच त्याच्याशी मैत्री करतात, तोपर्यंत सारे काही ठीक असते. तरुण वयातल्या खोडकर वृत्तीचा भाग म्हणून त्याकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही. फार जुन्या काळापासून अशा प्रकारचे रॅगिंग होत असते. त्यात एक निरामयता असते.

पण गेल्या काही वर्षात वृत्तपत्रांतून गाजलेली रॅगिंगची प्रकरणे पाहिली की रॅगिंग म्हणजे आक्रमक, हिंसक आणि संघटित अशी विकृती आहे, तिची दिवसेंदिवस वाढ होते आहे असे दिसते.

महाराष्ट्र हे उत्तरेकडील राज्यांच्या तुलनेने शिक्षणाच्या बाबतीत पुरोगामी, सुरक्षित आणि गुणवत्ता असलेले राज्य म्हणून मान्यता पावले आहे. गेल्या काही वर्षापासून येथे विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू झाल्या आहेत. स्वाभाविकच शिक्षण संस्थांचा खर्च भागविण्यासाठी सरकारी अनुदानित संस्थांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांकडून (खरे तर पालकांकडून) फी, देणगी, इमारत फंड इत्यादी नावाखाली शिक्षण संस्थांना धनिकांची बाळे मुक्तपणे देणग्या देऊन अशा संस्थांतून प्रवेश घेऊ लागली. राज्यांतर्गत धनिकही अग्रक्रमाने आले. स्वाभाविकच अशा धनिकांसाठी गुणवत्तेच्या अटी शिथिल होत गेल्या. संस्थाचालक अशा विद्यार्थ्यांचे एका परीने मिंधे झाले. कारण लाखोंनी देणग्या देऊन पुन्हा परप्रांतात ऐषोआरामी, जगण्यासाठी आपल्या पाल्याला मुक्त हस्ताने पैसा पुरवणाऱ्या पालकांचा तो पैसा किती प्रामाणिक मार्गाने आलेला असेल, याचा सहजच अंदाज करता येतो. त्यामुळे लहानपणापासूनच अनिर्बंधपणे मिळवलेल्या पैशांचा उपभोग घेत त्याच वातावरणात वाढलेले पाल्य जेव्हा महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून परक्या ठिकाणी

जातात तेव्हा ते अधिकच बेलगाम होतात. संस्थेत पैसा ओतण्याची क्षमता असल्याने, अभ्यास करणे, शिस्त पाळणे, गुरुजनांचा आदर करणे हे कोणत्याही विद्यार्थ्यासाठी स्वाभाविक असलेले निर्बंध आपल्यासाठी नाहीत, याची पक्की खूणगाठ अशा विद्यार्थ्यांच्या मनात असते. पैशामुळे आणि पालकांच्या सत्तास्थानांचे संरक्षण असल्याने येणारी बेपर्वा मग्रुरी वाढीस लागते आणि मग त्याच महाविद्यालयात आपल्या शैक्षणिक गुणवत्तेवर आलेला एखादा सालस विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी 'अशा' ज्येष्ठांच्या तावडीत सापडतो. प्रथम सहज चेष्टेतून सुरू झालेले प्रकार विकृत छळ छावणीत कधी रूपांतरित होतात, ते कळत नाही. अत्यंत क्रूर आणि किळसवाण्या कृतीही हे 'ज्येष्ठ' करतात. करवून घेतात. त्यात विकृत उद्दाम आनंद ते घेतात. 'बळी' आगतिक एकाकी असतो. अपमानाने आणि शारीरिक छळाने तो अर्धमेला होतो. स्वत:चे अस्तित्वच त्याला नकोसे वाटावे असे वातावरण त्याच्याभोवती निर्माण केले जाते.

नुकत्याच घडलेल्या विधी महाविद्यालयातील रॅगिंग प्रकरणासह गाजलेल्या सर्व प्रकरणांतून हे समान घटक आढळतात. संस्थाचालक अनेकदा बचावाची भूमिका घेतात. पोलिसांवर धनाढ्य पालक दबाव आणतात. पैशाने तर काहीही दडपता, फिरवता येते. खूनही दडपण्याचे प्रयत्न या सर्व घटनांत झाले आहेत. बळी गेलेल्या मुलामुलींची अवस्था बलात्कारितांसारखी झालेली असते. बलात्कारी मस्तीत राहतो. अपराध करूनही तो मस्तीत राहतो आणि काहीही दोष नसताना बलात्कारित व्यक्ती मात्र अपराधगंडाने आत्मसन्मानाला पारखी होते.

अशा घटनांतील आक्रमक विद्यार्थी मस्तवाल तर असतातच. कायद्याचे, मानहानीचे भय त्यांना नसते. पालकांचे पद, प्रतिष्ठा आणि पैसा ही त्यांची संरक्षक कवचे असतात. पण सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे निरपराध्याला पीडा देण्यात, छळण्यात त्यांना मनस्वी आनंद होतो, भूषण वाटते. परपीडनात आनंद वाटणे ही सर्वात घृणास्पद विकृती आहे याचे त्यांना भान नसते. मानवी सन्मानाच्या मूलभूत संकल्पनाच त्यांच्या मनात कधी रुजलेल्या नसतात. एका परीने रोमन सम्राट 'नीरों'चे हे वारसदार असतात. सत्ता आणि संपत्ती यांचा एवढा मद चढलेला असतो की निरपराध्यांना परोपरीने पिडणे हीच त्यांच्या आनंदाची आणि आत्मगौरवाची सीमा असते.

मानवतावादी सात्त्विक सद्गुणांच्या आधारे समाजात मान्यवर होता येते, आत्मगौरव मिळवता येतो, ह्या संस्काराला ते पारखेच झालेले असतात. त्यामुळे इतरांवर आपल्या विकृत हिंसक आक्रमकतेने जरब बसवण्यातच त्यांना आत्मगौरव

वाटतो. परपीडनात आत्मगौरव आणि आनंद शोधणे ही पराकोटीची विकृती आहे. सर्व रॅगिंगच्या मुळाशी ही विकृत परपीडक वृत्ती असते. अगदी प्रारंभी वर्णन केलेल्या कौटुंबिक प्रसंगातही हेच दिसते. विकृत परपीडक लोक मनातून न्यूनगंडाने पछाडलेले आणि भयभीत असावेत असेही वाटते. कारण आक्रमक हे नेहमी भयग्रस्त असतात. शिवाय ते बहुधा समान वृत्तीचा समूह निर्माण करतात. समानशील विकृत एकत्र येऊन अशी घृणास्पद कृत्ये करताना दिसतात. कौटुंबिक जीवनातही नवागत वधूचा छळ... क्वचित वध करतानाही बहुधा एकाधिक व्यक्ती एकत्र येतात आणि एकाकी दुबळ्या व्यक्तीला बळी बनवतात. हे सगळे पाहिल्यावर परपीडनाची वृत्ती का निर्माण होते? की ती काही व्यक्तींमध्ये उपजतच असते? असे प्रश्न निर्माण होतात. परिस्थितीमुळे, पालकांच्या बेपर्वाईमुळे की अकाली हातात विनासायास पैसा आल्यामुळे तरुण मुलामुलींमध्ये परपीडनातून आनंद मिळवण्याचा 'शॉर्टकट' निर्माण होतो की काय? विघटित होत जाणारी समाजव्यवस्था आणि कुटुंब व्यवस्था, अर्थकेंद्रित जीवनातून येणारी बाजारू मूल्ये यामुळे उदात्त मानवी मूल्यांची पीछेहाट होत आहे. हेही महत्त्वाचे कारण आहे. पण त्यामुळे समाजात सर्वच स्तरावरची विषमता आणि मूल्यहीनता वाढते आहे ही मात्र समाजव्यवस्थेच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे.

# एक कहाणी! तशी पुराणी (च)!

अग अग सयांनो, माझ्या आयाबायांनो, भावांनो आणि बहिणींनो, अधिक महिना आला आहे, आषाढाची चाहूल आहे, श्रावण अजून लांब आहे, तरी त्याची ओढ आहे....!

म्हणून माझं सांगणं ऐका, आधी माझी कहाणी ऐका!

'निर्मळ मळे, उदळाचे तळे,

त्यात फुलती लाल कमळे,

मध्ये ईश्वराची देवळे'

ऐकायला वाटते बरे! अशा ठिकाणी राहणे म्हणजे भाग्याचे देणे!

पण हे राहिले पुस्तकांच्या कहाणीतच! आठवा बरं बालपण! तेव्हाचे ते सण आणि उत्सव!

प्रत्येक सण येतो तो निसर्गाच्या हाती हात देतो, झाडा पाण्याशी, ऊनपावसाशी, आकाश मातीशी नाते जोडीत येतो!

श्रावणामध्ये उठावे, बागेत रानात जावे, झिम्म पाऊस अंगावर घ्यावा, सगळीभरची हिरवाई डोळ्यात भरून घ्यावी, तोंडाने गाणी गावी, हाताने फुलेपत्री तोडावी, खळाळत्या झऱ्याकाठी फुगड्या झिम्मा रंगवावा, घनदाट झाडाला झोके बांधावे, सासर माहेर जोडीत मनसोक्त झुलावे, तनामनाने तृप्त व्हावे!

गौरीला नानापरीच्या शाक–भाज्या कराव्या, त्या तुझ्या माझ्या परड्यात पिकाव्या, दारात रसबाळी केळ असावी, एखादी कपिला गाय नांदावी, तिथच आपलं गोकुळ

नांदावं! आड पाण्याचा,.कोठा दाण्याचा सदा असावा भरलेला, हीच कुबेराची दौलत!

रानातले गहू, त्याच्या पोळ्या केल्या नऊशे नऊ, तुम्ही आम्ही पोटभर खाऊ आणि आनंदात न्हाऊ, ही घरातल्या पार्वती परमेश्वराची आस असे, ती तृप्तही होत असे! आता मात्र काय करावं? मागचं सगळं विसरावं... का ते स्वप्नच म्हणावं?

आता श्रावण तोंडावर आला, तरी पाण्याचा ठिपूस नाही, अजून डोळे टँकरकडेच! झाडं झुडं नाहीत, सगळं कोरडं ठक्क!

नद्या आटत चालल्या, विहिरी आटल्या, ओढ्यांचा ओलच राहिली नाही, झरे झुरून झुरून कोरडे झाले, झाडा झुडांचे नाव नाही, उन्हाला सावली नाही, कुणाला आडोसा नाही.!

खरं तर 'श्रावण आला, श्रावण आला' म्हणत शिवालयात जावं, शिवालयाभोवती दाट वन असावं, पाणी तुडुंबलेलं असावं. पण आता देवळंही बसली सिमेंटच्या जंगलात! कसला श्रावण आणि कसला आनंद...?

असं सगळं विपरित झालं. होत्याचं नव्हतं झालं. कशानं आणि का झालं? विचार करायला वेळच नाही. विचार केला तर आचार काय करावा? तो कुणी करावा?

प्रश्न प्रश्न आणि नुसतेच प्रश्न! उत्तर कोणी द्यावं? जबाबदारी कोणी घ्यावी? ज्याला त्याला वाटतं, मी एकटा काय करणार? जिला तिला वाटतं की एकटी काय करणार? खरं तर करणार आपणच एकेकटे! एकटी असले म्हणून काय झालं? तसं कशाला? तुम्हाला एक कहाणीच सांगते, कहाणी तशी जुनी नाही, कल्पनेतली तर नाहीच नाही.

कहाणी आहे, आपल्याच देशातली! आत्ता या क्षणी चालू असलेली!

हिमालय पर्वत पायथ्यांचा प्रदेश आमचा मानदंड! घनदाट जंगलांचा! 'जंगल मे मंगल'चा साक्षात् अनुभव देणारा!

पण माणसाची जात नतद्रष्टच! सुंदर देवदाराची जंगलं, माणसाला पाहवेनात. माणसाला हाव सुटली. अफाट जंगलतोड केली. पैसा मिळवण्याचा मोह आवरेना! जंगल तोडणारे गब्बर झाले, हिमालयातले रहिवासी मात्र दरिद्री झाले जळणाला लाकूड नाही. जंगल तुटले आणि पाणी आटले, अगदी आपल्यासारखेच झाले!

पण तिथले लोक स्वस्थ नाही बसले तुमच्या आमच्यासारखे!

एक म्हातारा उठला, त्याने पुढाकार घेतला. जंगलतोड करायला कोणी आलं, की मिठ्या मारा झाडांना. एक माणूस, एक झाड! पुरुष, बायका मुले म्हातारे एकेकजण बसला मिठी मरून! आधी मला तोडा मग झाड तोडा हे धाडस अजब होतं. हा उद्योग

० नाव त्याचे सुंदरलाल बहुगुणा।
नावाचे सार्थक करणारे त्याचे काम।

रोज चाले. रात्रंदिवस गावकऱ्यांनी जंगलात पहारा ठेवला. झाड म्हणून तोडू दिलं नाही.

राजस्थानात तर, एक धर्मपंथच आहे वैष्णवांचा! त्यांचा देव एकच 'झाड'. देवाची स्थापना करायची, म्हणजे झाड लावायचं! देवाची पूजा करायची म्हणजे झाड वाढवायचं! देवाची उपासना करायची म्हणजे झाड जतन करायचं.

किती हुशार ते लोक! देवाजवळ माणूस काय मागतो? सुख! सुख काय आकाशातून थोडंच पडतं. आकाशातून पडणारं सुख म्हणजे पाऊस आणि जमिनीवरचं सुख म्हणजे धनधान्य, पानं-फुलं, फळफळावळ! हा मोठा आधार! त्याचं जतन केलं की देवाजवळ वेगळं काय मागायचं?

खरं तर आपणही वृक्षपूजकच! पण फक्त पूजाच करणारे! झाडं लावायला हवीत, जतन करायला हवीत, नुसतं पूजेचे कर्मकांड काय कामाचं? ते कर्मकांड उलटं झाडांना ओरबाडतं! तसं झालं तर पूजेचा काय उपयोग? खरा देव निसर्गातच असतो. केशवसुत म्हणतात,

'देवळी त्या देवास बळे आणा ।।

परी राही तो सृष्टीमध्ये राणा ।।

आपण ही वृक्षाची उपासना विसरलो, म्हणून निसर्गराजाचा कोप वाढत चालला आहे.

'या पावसाळ्यात निश्चय करू! दारादारात वाढवू एकेक तरू!'

दरडोई, दरवर्षी, एकेक झाड लावायचं आणि ते जतन करायचं! असा धरला नेम, तर तेच मोठं काम! पुण्याचं, धर्माचं अन् सुखाचं! आपलं आणि आपल्या पुढच्या पोराबाळांच्या पिढ्यांचं!

पुढच्या पिढ्यांसाठी सोनं नाणं, रुपये पैसे, माड्या गाड्या, कितीही संपत्ती ठेवली अन् पाणीच संपलं धरतीवरचं तर? जमिनीतून धान्यच नाही उगवलं तर? उपयोग काय त्या रूक्ष संपत्तीचा!

खरी संपत्ती ही निसर्गाची! हा खजिना द्रौपदीच्या थाळीसारखा, अखंड भरलेला राहील तर अनंत पिढ्या सुखाची बरसात होईल आज माणूस शहाणा झाला म्हणतो अन् मूर्खपण करतो, निसर्गाचा खजिना ओरबाडतो! ओरबाडू नका, बेता बेताने वापरा! दरवर्षी जेवढे वाढेल, तेवढेच वापरा! तरच ती द्रौपदीची थाळी अखंड राहील. नाहीतर आपणच होऊ शत्रू आपल्या पुढच्या पिढ्यांचे! सुरुवात तर आपण केलीच आहे. पण आता ती चूक सुधारून तसा मनापासून निश्चय करू. तरच येणाऱ्या भीषण संकटातून तरून जाऊ अन्यथा मरू. पाणी नाही, आहे ते दूषित! हवा दूषित, अन्नधान्य दूषित!

जगणार कसे सुखाने? त्यासाठी हवं भरपूर स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा! त्यासाठीच हवीत झाडं! जंगलं!!

म्हणून प्रत्येकजण निश्चय करू!

दारी वाढवू एकेक तरू!

हा निश्चय दर वर्षासाठी! एक श्रावण व्रतच म्हणाना! हा वसा दर वर्षी वाढवत न्यायचा!

असं केल्यानं काय होईल? पाच वर्षात गाव हिरवगार होईल. शाळा, पंचायत समिती, शेताचे बांध सगळं हिरवंगार! झाडंही अशी की त्यांनी उत्पन्नही द्यावं! दारिद्र फिटावं.

आणखी काय होईल? जमिनीची कूस ओलावेल, तिच्या पोटातली पाण्याची माया कधी आटणार नाही. गावात पाणी नाही म्हणून गाव सोडून जावे लागणार नाही. शहरातल्या गलिच्छ झोपडपट्टीत राहावं लागणार नाही!

आपलं गाव, सुखासमाधानाचं आगर! हा करावा निश्चय! मग सुखाची बरसात होईल.

दारामध्ये झाड ।<br>
जोपासे जो प्राणी ।।<br>
सुखाच्या कल्लोळी<br>
नाहतो गा ।।

असा अनुभव येईल.

# घर असावे घरासारखे

मे महिन्याच्या सुट्टीत एका मैत्रिणीकडे गेले होते. तिच्या मुलाचं सात आठ महिन्यांपूर्वीच लग्न झालं होतं. मुलगा आणि सून दोघेही कॉम्प्यूटर इंजिनिअर! दोघेही रुपागुणानं एकमेकांना साजेसे, नोकरी करणारे वगैरे.....नेहमी सारखे!

सकाळी मुलगा आधी उठला. त्यानं आपला स्वत:चा आणि आमचा चहा केला. सून पाच दहा मिनिटांनी उठली. मग तिनं दोघांच्या डब्याची भाजी पोळीची तयारी केली. पोळ्या करून भाजी फोडणीस टाकली आणि आंघोळीला जाताना भाजीकडे पाहण्यासाठी नवऱ्याला सांगितले. लगेच माझी मैत्रिण तिची सासू दबक्या आवाजात माझ्या कानात कुजबुजली, 'बघ बघ या अलीकडच्या मुली माझ्या मुलाचा अगदी स्वयंपाकी करून टाकलाय... एवढा शिकलेला तो!'

'अगं! पण, सूनही तुझी तेवढीच शिकलेली आहे. तीही त्याच्या बरोबरीनेच कामाला जाते. मग सकाळी घाईच्या वेळी थोडी केली मदत तर काय झालं?' मी म्हटलं, मग ती काहीच बोलली नाही. पण माझं बोलणं तिला आवडलं नसावं मला मोठी गंमत वाटली.

कारण गेल्याच वर्षी तिची अमेरिकेत राहारी मुलगी, जावई आणि दोन लहान नातवंडं आली होती. तेव्हा त्या छोट्या तान्ह्या बाळाच्या 'शी'चा लंगोट जावयानं चटकन बदलला होता, सराईतासारखा! तेव्हा मी त्यांना गंमतीनं म्हटलं होतं, 'चांगलीच सवय दिसतेय जावईबापूंना मुलं सांभाळायची!' तेव्हा हीच माजी मैत्रिण कौतुकानं म्हणाली होती, 'अगं काही विचारू नकोस, सगळं काही करतात ते घरात! स्वयंपाकही छान येतो. मुलाचं तर निम्मं अर्ध तेच करतात! आंघोळी, शी-शू, दुधाच्या

बाटल्या धूवून भरणं ... काय करणार? दोघंही तिथं नोकऱ्या करतात, तरी वेळा त्यांनी सोयीच्या करून घेतल्यात. दोघांपैकी एकजण घरात राहील अशा बेतानं! मग करावंच लागतं सगळं! अगं, तिकडे नोकर चाकर मिळतात कुठे? मिळतात ते इतके महाग की विचारू नकोस!'

'तेच तर सांगतेय. बाहेर एवढे मोठे ऑफिसर... पण घरात फक्त मुलांचे (बाबा) आणि शमाचे असतात' मैत्रिणीचं जावयाबद्दलचं कौतुकपुराण पुन्हा चालू झालं होतं.

मला मात्र आता आश्चर्य आणि गंमत दोन्ही वाटत होतं. आपला परदेशातला जावई घरकामात मुलीला मदत करतो.स्वत:च्या मुलांचं करतो. म्हणून त्याचं कौतुक करणारी ही बाई इथं भारतात मात्र स्वत:च्या मुलाला सुनेनं फक्त भाजी करपू नये म्हणून तिकडे पहा असं सांगितलं की नाराज होते आणि त्याला सुनेनं स्वयंपाकी केला म्हणून नाक मुरडते. हा काय प्रकार आहे? या विसंगतीचं आश्चर्य वाटलं.

पण ही विसंगती केवळ माझ्या या शिकलेल्या मैत्रिणीच्याच घरात आहे, असं नाही.... सगळ्या समाजातच आहे. घरकाम आणि मुलाबाळांचं संगोपन, विशेषत: मुलांची शी, शू काढणं, खाणं पिणं बघणं, थोडक्यात म्हणजे किचकट आणि कष्टाची कामं तेवढी घरातल्या बायकांची...! मग त्या शहरी असोत की ग्रामीण, शिकलेल्या असोत की बिन शिकलेल्या...! हे कितपत योग्य आहे?

वस्तुत: घर आणि मुलं बाळं ही घरातल्या सर्वांची असतात. त्यामुळं त्यासाठी पडणारे सर्व प्रकारचे कष्ट आणि त्रास यात सर्वांचा समान सहभाग हवा आणि मगच त्यापासून मिळणाऱ्या आनंदावर आणि सुखावर आपल्याला खऱ्या अर्थाने हक्क सांगता येईल. खरं तर, तो आनंदही अधिक चांगल्या प्रकारे उपभोगता येईल. विशेषत: लहान बाळांशी त्यांची आंघोळ, शी, शू, खाणं पिणं ही कामं करताना फार जवळकीचं नातं निर्माण होतं. त्यात आनंदही असतो. पण आपल्या ढोकळेबाज पुरुषी बायकी कामांच्या कल्पनेमुळे आमचा फार मोठा पुरुषवर्ग हे कोवळं समाधान उपभोगूच शकत नाही. त्यातून एक कोरडेपणा, रुक्षपणा, बेपर्वाई त्यांच्या वृत्तीत वाढत जाण्याची प्रक्रिया घडते आणि घरापासून सुरु झालेलं हे लोण सामाजिक बेजबाबदार तरुण वर्गाच्या उद्रेकात होत जातं.

जीवनाबद्दलचं प्रेम, आस्था मिळण्याचं आणि जोपासण्याचं काम कुटुंबात होत असतं. पण भुकेपोटी आयतं खाण्यासाठी आणि दमून झोपण्यासाठीच फक्त घर असतं, अशी काहीशी बेजबाबदार वृत्ती पुरुष वर्गात जोपासली जाते. याला काही सन्माननीय अपवाद जरूर असतील, पण ते अपवादच असतात.

घरकामाबद्दलची आणि पर्यायानं ती कामं करणाऱ्या म्हणजे स्त्रिया व नोकर चाकर याबद्दलची तुच्छताबुद्धी समाजात पिढ्यान्‌पिढ्या पोसली जाते. नोकरांना पैसे द्यावे लागतात म्हणून त्यांना 'किंमत' तरी असते, बायका फुकटच अन्न वस्त्रावारी राबणाऱ्या...!

घरात राहून रात्रंदिवस राबणाऱ्या बायकांच्या मनातही 'आपण काही मिळवीत नाही' ही कमीपणाची भावना उगीचच असते. ज्या पुरुषांची घरातील कामं करणाऱ्या बायकांबद्दल अशी कल्पना असते (आणि ती बहुतेकांची असते), त्यांनी जरा वेगळा विचार करावा. घरातील स्त्री बादलीभर म्हणजे पंधरा वीस कपडे रोज धुते. तेच रोज धोब्याकडे दिले. भांडी घासणे, झाडझूड करणे, स्वयंपाक करणे किंवा बाहेर जेवायला जाणे या प्रत्येक कामासाठी जर बाजारभावाने पैसे दिले, तर पुरुषाने कमावलेला पैसा किती पुरेल? उलट स्त्रीच्या या कामांचा बाजारभावाने हिशोब केला तर तो कितीतरी जास्त होतो म्हणजे तेवढे पैसे ती कष्ट करून वाचविते.

आधुनिक अर्थशास्त्रानुसार 'पैसे वाचवणे म्हणजे पैसे मिळवणे' म्हणून केवळ घरकाम करणारी गृहिणी 'कमावणारी' ठरते.

अशा आधुनिक पद्धतीने अर्थशास्त्रीय विचार केला की, गृहिणीच्या घरकामाला 'मूल्य' प्राप्त होते. एरव्हीही ते होत असतेच. कसे ते पहा! घरातला स्वयंपाक, पोराबाळांची दुपटी–चौघड्या शिवणे ही कामं खास बायकांची म्हणून पुरुषांना ती करण्यात कमीपणा वाटतो. पण यात फार मोठी लबाडी आणि फसवणूक असते हे लक्षात घ्यायला हवे. कारण घरात या कामांना पैसे मोजावे लागत नाहीत. हॉटेलात स्वयंपाक करणे, टेबल पुसणे (म्हणजे उष्टी खरकटी आवरणेच की) यांना पैसे मिळतात तिथे मात्र सगळा पुरुषांचा भरणा म्हणजे जिथे पैसा मिळतो तिथे प्रतिष्ठा! मग तो स्वयंपाक असो की शिवण टिपण असो, मी गंमतीने नेहमी सांगते की, फुकट दुपटी शिवायला गृहिणी... आणि त्यालाच पैसे मिळतात असे दिसले की टेलर! सगळे हॉटेलवाले आणि लेडीज टेलर पुरुषच... कारण तिथे साक्षात अर्थोत्पादन होते! म्हणजे घरकाम फुकट असल्याने ते हलके, तुच्छ ठरते. पैसे टाकावे लागले की, तेच मूल्यवान ठरते. तिथे मग बायका पुरुष हा भेद रहात नाही.

याचाच अर्थ असा की, मुळात कोणतेच काम हलके वा भारी नसते आणि कां कोणतेच काम केवळ बायकोचे वा केवळ पुरुषांचे नसते. ही कृत्रिम विभागणी माणसांनीच केली आहे.

आणि म्हणूनच कुटुंबात सर्व माणसांना आनंदाने, समाधानाने, प्रेमाने रहायचे

असेल तर या कृत्रिम भेदांची हकालपट्टी करणे हे सुजाण स्त्री पुरुषांचे काम आहे.

आपला समाज सर्वार्थाने अजूनही पुरुषप्रधान आहे, असे म्हटले जाते. पण तेही पूर्णपणे खरे नाही. कुटुंबापुरतेच बोलायचे झाले तर कुटुंबाच्या आर्थिक नाड्या पुरुषांच्या हाती असतात. म्हणूनच कुटुंबातील व्यक्ती आणि स्थावर जंगम या सर्वांवर कुटुंबप्रमुखाचा हक्क असतो. स्वामित्व असते.

पण हक्कांबरोबर काही कर्तव्येही असतात की नाही? केवळ अर्थोत्पादन एवढेच एक दृश्य कर्तव्य असते की, आणखी काही कर्तव्ये असतात? याचा विचार जितक्या आस्थेवाईक गंभीरपणे व्हायला हवा, तेवढा होत नाही.

मुलगी सुगृहिणी बनावी म्हणून तिच्यावर जन्मापासून संस्कारांचा(?) मारा करण्याचा आग्रह असतो, त्याच्या शतांशानेही मुलगा 'सद्गृहस्थ' बनावा याचा प्रयत्न नसतो. केवळ शिक्षण म्हणजे पदवी संपादन पुरेसे नाही, तर कुटुंबातील सर्व घटकांचा समान दर्जा, कर्तव्ये हक्क यांचा विचार आणि आचार घराला खरे 'घरपण' मिळवून देते, हा विश्वास आणि प्रेम निर्माण करण्याची जबाबदारीही कुटुंबप्रमुखाचीच असते. याचा मात्र विसर पडला आहे. तसे होणे घातक आहे.

घर असावे घरासारखे ।
नकोत नुसत्या भिंती
तिथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती माती ।।

# चाहूल बाळजन्माची

जमाना कोणताही असो नवा की जुना, समाज कोणताही असो देशी की विदेशी आणि  राहणी कोणतीही असो शहरी की ग्रामीण. घरात फार दिवसांनी बाळ जन्माला येणार आहे, अशी चाहूल लागली की अगदी सर्वांना आनंदी आनंद वाटतो. नव्या बाळाचं स्वागत कसं करायचं, याचे ज्याच्या त्याच्या परीने मनसुबे बांधायला सुरुवात होते आणि त्याचा प्रारंभ होतो तो बाळाच्या आईपासून!

बाळाला जन्म देणारी आई हा सर्वांच्या काळजीचा आणि कौतुकाचा विषय होतो. सगळेजण आपापल्या परीनं तिला जपत असतात. जुन्या जमान्यातल्या वडीलधाऱ्या बायका घरात असल्या तर त्यांची डोहाळ जेवणाची तयारी सुरु होते. तिसऱ्या महिन्यात चोरचोळी कधी करायची? पाचव्या महिन्यात डोहाळ जेवण कसलं करायचं? मग बागेलतं कधी करायचं? होडीतलं कधी करायचं? चांदण्यातलं कधी करायचं? असेही बेत हौशी मंडळी करायला लागतात. मोठ्या बायका उत्साहानं पारंपरिक गाणीही म्हणायला लागतात.

पहिले मासी सासरा पुसे,
सूनबाई तुमचे डोहाळे कसे
आमचे डोहाळे पुरवा सासरा
चंदन तोडूनी बांधा बसाया ।

असे म्हणून डोहाळतुलीच्या एकेक इच्छा व्यक्त होतात व त्या पुरवण्याची तयारी आनंदाने सुरू होते.

डोहाळ जेवणात गरोदर बाईच्या आवडीचे निरनिराळे चवदार पदार्थ खाऊ घालण्याची जणु सासर माहेरच्या बायकांमध्ये स्पर्धा लागते.

गर्भवतीचं मन प्रसन्न राहावे म्हणून परोपरीने काळजी घेतली जाते. विशेषत: पहिलटकरणीला अनुभव नसल्याने तिच्या मनावर ताण असतो. तिच्याही नकळत एक दबलेपण येते. अशावेळी तिचे मन दुसऱ्या चांगल्या विषयात गुंतले तर तिची प्रकृती तर चांगली राहतेच, पण तिच्या पोटात वाढणाऱ्या बाळाची प्रकृतीही चांगली राहते. त्याची शारीरिक, मानसिक वाढ चांगली होते. कारण आई जे जे खात पीत असते, त्यातूनच गर्भाला पोषण मिळत असते. एक दुसरा जीव तिच्या आश्रयाने आकार घेत असतो. म्हणून तिला जुन्या बायका म्हणतात, 'दोन जिवांची!' ते खरेच आहे.

आईच्या हृदयातून रक्तपुरवठा होत होत एक नवीन हृदय आकार घेत असते. म्हणून संस्कृतात तिला म्हणतात 'दौ हृद' दोन हृदयांची! 'दो हृद' शब्दाचं देशी भाषेतलं रूप 'दोहृद' त्याचीच रूपं म्हणजे डोहाळ, डोहाळे किंवा ग्रामीण बोलीत 'ढवाळं'!

असं म्हणतात की, गर्भवतीच्या शरीराला ज्या ज्या जीवनसत्वांची, खनिजांची कमतरता असते, त्या गुणांनी युक्त असे पदार्थ खाण्याची तिला इच्छा होते. म्हणून तिच्या इच्छेनुसार हवे ते पदार्थ तिला आवर्जून खाऊ घालावेत, किंबहुना कृत्रिम औषधे व टॉनिके देण्यापेक्षा दूध, तूप, ताजा भाजीपाला, फळफळावळ, ताजे पण साधे रूचकर अन्न तिला वेळेवर खाऊ घालावे. मात्र कौतुकापायी खाण्याचा अतिरेकही करू नये. तिच्या प्रकृतीला मानवेल तेवढे आणि तेव्हाच खाऊ घालावे.

गर्भवतीचे मन नेहमी प्रसन्न राहिल असे वातावरण घरात असावे. पूर्वीच्या काळी डोहाळ जेवणाच्या निमित्ताने बागेत, नदीकाठी सर्वजणी जमत, हसतखेळत, गाणी गात, खाणे पिणे मजेत करीत. त्यामुळे तिचे मन प्रसन्न रहायला निश्चितच मदत होत असे.

गर्भवतीला हलके, स्वच्छ परंतु सुंदीर कपडे त्या निमित्ताने दिले जात. विशेषत: चांदण्यांच्या डोहाळ जेवणात पांढरी साडी, बागेत हिरवी साडी परिधान करवली जाते. त्या रंगांमुळेही वातावरण आनंदी रहायला मदत होते.

हिरव्या रंगाचे माहात्म्य तर एकूणातच आपल्याकडे म्हणजे महाराष्ट्र कर्नाटकात जास्त! हिरवा रंग फळा पुलांनी, धान्यांनी आणि पिकांनी बहरलेल्या धरतीचा रंग! धरती ही सर्व जीवसृष्टीची महामाता! बाळाची आई ही जणु त्या महामातेचे मानवी

लघुरूपच! म्हणून पिकांनी बहरलेल्या हिरव्यागार धरणीसारखी ही मानवी माताही, सुंदर गुटगुटीत बाळाला जन्म देणारी समृद्ध माता व्हावी, असा संकेत असतो.

धरती आणि स्त्री या दोघी निसर्गाची सर्जक व पोषक सामर्थ्य असलेली रूपे आहेत. म्हणून त्यांना आपल्या सांस्कृतिक जीवनात परस्पर रूपात पाहिले जाते, संबोधले जाते. धरती फळा पिकांनी बहरावी म्हणून लेकुरवाळीने पहिले बी पेरावे आणि स्त्रीने सुंदर निरोगी बाळाला जन्म द्यावा म्हणून तिला हिरव्यागार धरतीच्या रंगाचे वस्त्र नेसवावे, असे प्रतिकात्मक संकेत आहेत, ते मानवी मनात सुफलीकरणाबद्दल असलेला आदरभाव व्यक्त करतात.

बालकाला जन्म देण्यात स्त्री पुरुष दोघांचाही सहभाग असला तरी स्त्रीचा मातेचा सहभाग अगदी जीवशास्त्रीय पातळीवरही सर्वात जास्त असतो. स्त्रीच्या उदरात प्रतिष्ठित झालेला अतिसूक्ष्म पेशी जीव वाढत वाढत नऊ महिन्यात मानवाचे सगळे अवयव धारण करून जन्म घेतो, हा सृष्टीचा सर्वात मोठा चमत्कार आहे. त्या जीवाच्या वाढीसाठी मातृगर्भाशयाइतके सर्वाधिक सुरक्षित आणि सर्व सोयींनी सुसज्ज असे स्थान निर्माण करणे माणसाला, शास्त्रज्ञांना जवळजवळ अशक्य आहे, असे तज्ञ म्हणतात. त्यामुळे स्त्रीच्या गर्भाशयात आकाराला येणारी मानवी प्रतिकृती हा सर्वात मोठा चमत्कार आहे आणि निसर्गाने स्त्रीला दिलेले ते सर्वात मोठे सामर्थ्य आहे.

नवीन जीवाचे सर्जन करण्याबरोबरच जन्मानंतर काही काळ पोषण करण्याची तरतूदही निसर्गानेच स्त्रीच्या ठायी केली आहे. म्हणून तर जननी म्हणजे जन्म देणारीच त्यांचे जतनही करते. म्हणूनच ममता करणारी ती माताही असते. ती बाळाची रक्षकही असते.

माता शरीर-मनाने जितकी निरोगी, स्वस्थ असेल तितके बालकही शरीर मनाने स्वस्थ आणि निरोगी असते, हे आपल्या जुन्या कुटुंबव्यवस्थेला माहीत होते. म्हणून तर एरव्ही जरी स्त्रियांची जेवणे पुरुषांच्या नंतर होत असली तरी लहान मुले, वृद्ध, आजारी माणसे आणि गर्भवती स्त्रिया यांना स्वयंपाक झाल्याबरोबर आधी जेवण द्यावे, असा दंडक होता. कधी कधी जुन्या चांगल्या गोष्टी आपण विसरतो आणि वाईट तेवढ्या जतन करतो.

गर्भवती स्त्रियांचे खाणं पिणं, कपडेलत्ते यांचे कौतुक करावे, तिचे मन सख्यांच्या मेळाव्यात प्रसन्न राहील अशा उत्सवांचे, समारंभांचे आयोजन करावे, गाणी गोष्टींमध्ये मन रमवावे, चेष्टा मस्करी करून मनावरचे ताण सैल करावेत. अशी सोय पारंपरिक कुटुंब जीवनात होती, आहे.

नवीन वैद्यकीय ज्ञानाचे आधार घेऊन अधिक डोळसपणे त्यांचा उपयोग करून घ्यायला हवा, कारण बाळाचा जन्म ही केवळ त्याच्या आई बाबांच्या आणि कुटुंबांच्या दृष्टीनेच अपूर्वाईची घटना नसते, तर एकूण सृष्टी चक्राचे अखंडत्व राखणारी ती घटना असते. संस्कृतीच्या प्रवासातला पुढचा दुवा बाळाच्या रूपाने अस्तित्वात येणार असतो. प्रत्येक जन्म, प्रत्येक सृजन ही आनंददायी अपूर्व अशीच बाब असते.

माणसाने यंत्रांचे आणि तंत्रांचे कितीही शोध लावले तरी त्यांचा उपयोग पुढच्या पिढ्यांच्या निरोगी वाढीसाठी होणार नसेल, केवळ शस्त्रास्त्र निर्मिती आणि संहार यांच्यासाठीच होणार असेल, तर त्याला मानवी संस्कृतीचा विकास म्हणायचे की विनाशक विकृती म्हणायचे? याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

एक नवा जीव जन्माला येणे, त्याच्यासाठी अनुकूल भूमी तयार करणे याच्यासारखे समाधानकारक, सुंदर असे काही नाही. सतत मृत्यूवर मात करीत फुलत राहणे म्हणजे संस्कृती!

एका बाळाचा जन्म हा संस्कृतीच्या साखळीतला एक सुगंधी मोती असतो आणि त्या बाळाची जन्माची क्षमता निसर्गाने ज्या स्त्रीजवळ दिली आहे, ती सर्वात सामर्थ्यशाली शक्ती असते. कारण जन्म देणे सर्वांना जमत नाही. मारण्याचे काम कोणीही करू शकतो.

सृजन, पोषण, रक्षण ही सृष्टीचक्रातली सर्वात कठीण कामे करण्याचे सामर्थ्य निसर्गानेच स्त्रीच्या ठायी निर्माण केले आहे म्हणून तर जगत्पालक सर्व श्रेष्ठ शक्ती मानवी प्रतिभेला जाणवली ती मातेच्याच स्वरूपात!

जगन्माता आणि घराघरातल्या बाळांच्या माता म्हणूनच आदरणीय असायला हव्यात आणि त्यांची दैनंदिन जीवनातही काळजी घ्यायला हवी.

# अडगुलं ऽऽ मडगुलं ऽऽऽ

'आजी नातीची गोष्ट रंगात आली होती.'

'एक होती...?' आजीनं प्रश्न विचारायचा.

'ऊ!' नातीचं उत्तर! हा क्रम गोष्टभर चालू....

'तिला सापडला ....?' आजी

'पैसा!' ननू.

'ती गेली...?' आजी

'आईकडं!' ननू

'आई आई...?' आजी

'पैशाचं काय आणू...?' ननू

'आई म्हणाली...' आजी

'आण भाजी...!' ननू

'ऊनं आणली...' आजी.

'भाजी...' ननू

'चिरू कशी...?' आजी

'खस्सा खस्सा' ननूचा जोरजोरात चिरण्याचा अभिनय

'शिजवू कशी...?' आजी

'रट्टा रट्टा.....' ननूची भाजी ढवळण्याची ॲक्शन

'खाऊ कशी...?' आजीचा प्रश्न.

'मट्टा मट्टा...!' ननू मांडा ठोकून भाजी ओरपतेय.

आजी नातीच्या अशा अनेक साभिनय गोष्टी चालायच्या. एका मागोमाग दुसरी गोष्ट. अर्धं वाक्य आजीनं म्हणायचं, बाकीचं अर्धं वाक्य नातीनं साभिनय पूर्ण करायचं. मग आजीलाही अभिनयात भाग घेणं भाग पडायचं. गोष्ट सांगण्याचा कार्यक्रम इतका रंगायचा की ही गोष्ट आहे याचं भानच राह्यचं नाही. ननूचं नाट्यीकरण मनापासून सुरु असायचं. आपण नाटक करतोय याची ननूला जाणीवच नव्हती. गोष्टीतल्या आशयाबरोबरच आवाज बदलण्याचं तंत्रही ननूला पुरेपूर माहीत झालं होतं. सुप्रसिद्ध चिमणी कावळ्याची गोष्ट चालू असायची. कावळा चिमणीचं दार ठोठावतो आहे.

'चिमणे चिमणे, दाऽर उघड' आजी कावळा झालेली.

'थांब माझ्या बाळाला आंघोळ घालते' ननू चिमणी होऊन उत्तर द्यायची. मग बाळाची तीट काजळ होऊन बाळाला झोप आलेली असायची. कावळा ओरडतोच आहे, ''चिमणे चिमणे, दार उघड.'' आजी कावळा झालेली. ''थांब माझ्या बाळाला आंघोळ घालते'' ननू चिमणी होऊन उत्तर द्यायची. मग बाळाची तीट काजळ होऊन बाळाला झोप आलेली असायची. कावळा ओरडतोच आहे. ''चिमणे चिमणे दार उघड'' आजी. ''थांब माझ्या बाळाला गाई गाई करते'' ननू मऊ आवाजात उत्तर देते. तिची चिमणी आता झोप येऊ घातलेल्या बाळाची आई झालेली असते आणि हे सगळं अगदी सहज उत्स्फूर्तपणे ननू करायची. सगळ्यांना तिच्या नाटकीपणाचं भारी कौतुक वाटायचं.

पण ननूचं हे कौतुक एवढ्यापुरतंच नव्हतं. ती अगदी तान्ही होती, तेव्हाही आंघोळीला उघडीबंब करून आजीच्या पायांवर तेल माखून घेणं ननूला फार आवडायचं. मग आजीचं गाणं सुरु व्हायचं, 'चोळ सखू चोळ...! चोळ सखू' आणि ननू जाणत्या माणसासारखी हुंकार द्यायची. लयीत झुलत रहायची. डोळ्यांतून बोलत रहायची. मग आजीचं दुसरं गाणं सुरु व्हायचं आणि ननूचा त्यासोबत लयबद्ध अभिनय. आता ननूचे सवंगडी खेळायला आलेले असायचे आजीचं गाणं

'ही सोन्याची सखुबाई बरं का?
हिला बाजारात नेऊ नका बरं का!
हिला पोरं मारतील बरं का!
हिला नाही बऽळ आणि
चिमटा घेऊन पऽळ'

हलक्या आवाजात आजी कानमंत्र द्यायची आणि ननूसह सगळी पोरं मिस्किलपणे डोळे मिचकावून खदाखदा हसायची. ननूच्या इवल्याशा बोटांचा चिमटा हळूच कुणाला तरी बसायचा. इतक्या लहान वयातही आता खरा चिमटा घ्यायचा नाही. नुसतं चिमटा घेतल्यासारखं खोटं खोटं करायचं हे तिला जणू वातावरणातूनच आपोआप कळायचं.

ननूला कंठ फुटायच्या आतच तिचे डोळे बोलायला लागले. 'अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं...' तालात सुरु व्हायचं आणि अखेरीस 'तान्ह्याऽ बाळाला तीऽट लावू' म्हणताना डोळे इतके तान्हे तान्हे निरागस व्हायचे की तीट लावू म्हणताना कपाळावर बोट टेकताना हळूच तिच्या कोवळ्या जावळावर ओठ टेकायचे.

ननूचे सवंगडी जमले की मग धमालच धमाल, 'अरंगळी करंगळी, मधलं बोट चाफेकळी' करीत आजीची बोटे तळहात मनगटाच्या मार्गाने गळागाठीला पोचली की, खुदूखुदू सुरु व्हायचं आणि जावळात पोचून वर चिमण्यांचा कलकलाट सुरु झाला की टाळ्या पिटून सगळ्यांच्या खदाखदा हसण्याच्या खुळखुळाटात चिमण्या भुर्रकन उडून जायच्या.

मग मधूनच 'ननूच्या डोक्यावर काऽवळा येऊन बसायचा.' आम्ही आलो देऽवळा देवळाचं पाणी आटऽलं आणि शेवटी...

ननूचं मडकं ऽऽ फुऽटलं... म्हणून दोन्ही चिमुकले हात धाडकन मडकं खाली टाकायचे. अचानक मडकं फुटलं म्हणून भयचकित डोळे आणि हात भीतीने कानावर या फोडतोडीची चिंता चेहराभर पसरायची.

मग मधूनच इवलासा तळहात पसरायचा आणि मोराला निमंत्रण जायचं. आवाज आजीचा, अभिनय नातीचा,

इथं इथं बैस रे मोरा ।<br>
बाळ घालतंय चारा ।<br>
चारा खा. पाणी पी ।<br>
भुर्रऽऽ कन् उडून जा ।।

मग दोन्ही हात वर जायचे. चिमुकले पंजे फडफडायचे. मोर उडून गेल्यामुळे रिकामे रिकामे डोळे उदासपणे व्हायचे.

मग ननूला पाय फुटले. लुटू लुटू दोन पावलं चालून क्षणोक्षणी बुदकुलं बदाबदा पडायला लागलं आणि ननू उभी रहायला लागली की घरात आजी, आजोबा , काका

सगळ्यांचा कोरस सुरु व्हायचा.

'ननू उभी राह्यली, आम्ही नाही पाह्यली'

मधूनच कुठं तरी दाराआड ननू लपायची. हळूच डोकवायची आणि मी कुऽके? (कुठे) म्हणून प्रश्न विचारत हैराण करायची, कारण आता पायाच्या जोडीला कंठही फुटत होता ना!

जरा तोल सावरला यायला लागला. सलग पावलं टाकणं सुरु झालं.

चाल चाल माते ।

पायी मोडले काटे ।

बाजारात जाऊ रंगीत जोडा आणू

आता पायात छुमछुम पैंजण आले. त्या नादावरनं कळायचं ननू आता काय करतेय, चालतेय की पळतेय की झोपेत पाय चाळवताहेत की नाच सुरु झालाय हे! एक पाय जमिनीवीर घट्ट रोवून एक पाय आपटत नाच सुरु व्हायचा. एक पाय नाचिव रे गोविंदा घागऱ्याच्या छंदा ....ननूच्या देहाच्या लयीला आता ताल मिळाला होता. कंठात सूर उमटत होते. हाताच्या टाळ्यांच्या तालावर ननूचं गाणं आणि खेळ चालायचा.

आपडी थापडी

गुळाची पापडी

धम्मक लाडू ऽऽ

तेल पाडूऽऽऽ

सुरु झालं होतं. अर्थ कशाचाच काही कळत नव्हता. या सगळ्याला नेमका अर्थ तरी कुठे होता म्हणा? अडगुलं मडगुलं... ला तरी काय अर्थ होता? पण अर्थावाचून तसं नडत कुणाचंच नव्हतं! डोळ्यांतून हातवाऱ्यांतून हुंकारातून जे कळतं होतं, ते खूप खूप होतं. शब्दांच्या पलीकडचं होतं.

आणि मग एकदा पावसाच्या सरीवर सरी कोसळायला लागल्या. ननूचा पहिला पाऊस! आभाळातनं कोसळणाऱ्या त्या धारांचं नवल पाहत ननू खुळावली. आश्चर्य आणि आनंद डोळ्यात मावेना आणि नकळतच अंगअंगभर उतू चाललेल्या आनंदानं गिरक्या घ्यायला सुरुवात केली.

गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या...

भोवळ आली. खिडकीतून कोसळणाऱ्या धारा दुरुन पाहून समाधान कुठे होत होतं!

सगळ्यांचा डोळा चुकवून ननू आता अंगणात पळाली होती. दोस्त मंडळी गुप्त कट केल्यासारखी आपापल्या आई बाबांची नजरकैद चुकवून अंगणात आली. एकमेकांना जलधारांखाली मिठ्या मारुन टाळ्या वाजवून आनंदाचा पहिला आवेग मोकळा झाला आणि आकाशाकडं पाहत चिमुकल्या हातांनी पावसाला निमंत्रण करीत मोकळ्या गळ्यांनी एका सुरात साद घातली.

ये रे ये रे पावसा ऽ
तुला देतो पैऽसा
पैसा झाला खोटा ऽ
पाऊस आला मोऽठ्ठा ।।

या कोरसातल्या आवाजानं सगळ्यांचे आईबाबा सावध झाले. दाबून दडपून मंडळींना पावसातून हकललं. मग आता पावसात भिजणार नाही या अटीवर वळचणीखाली आडोशाला चिमण्या पाखरांसारखी ही चिमण्या दोस्तांची रांग उभी राह्यली. पाऊस दुरुनच पाहायचा ही गोष्ट मंजूर करायला मनं तयारच नव्हती. नकळत हळूच पाखरं खाली बसली. पागोळ्यांखाली हात धरले, पागोळ्यांचं पाणी ओंजळीत साचलं, पागोळ्यांच्या धारांनी जमिनीत आधीच झालेल्या खळ्यांचे खळगे पाडायला काहींनी सुरुवात केली आणि आई बाबांना दिलेल्या आश्वासनाचा विसर पडून मंडळींचा कोरस सुरु झाला

ये ग ये ग सरी ।
माझे मडके भऽरी ।
सर आली धावून ।
मडके गेले वाहूऽन ।

पोरं रंगात आलेली, या किलबिलाने आतली थोर मंडळी मात्र जागी झाली. आपल्या पोरांच्या आश्वासनावर विश्वासून राहणं हे काही खरं नाही हे बिचाऱ्यांनी जाणलं आणि चिमणी पाखरं घराच्या पिंजऱ्यात बंद झाली. कोठडीतल्या कैद्यासारखे खिडक्यांच्या गजांशी धरून मिटी मिटी डोळ्यांनी बाहेर पाहणं आणि वाऱ्याच्या झोतासरशी अंगावर येणाऱ्या एखाद्या शिंतोड्यावर समाधान मानणं यापलीकडे बिचाऱ्यांना गत्यंतरच उरलं नाही.

ननूचे बाहुलीचे खेळ आता रंगात यायला लागले होते. किती तरी नव्या नव्या

बाहुल्या घरात सारख्या येत होत्या. पण कोणे एके काळी आणलेली अगदी जीर्ण शीर्ण झालेली, विटलेल्या रंगाची, ननूच्या सासुरवासात नाक तोंड घासून चपटे झालेली आणि हात पाय डोक्याचे स्पेअरपार्टस् केव्हाही गळून पडणारी एक जुनी पुराणी सोनीच ननूला प्रिय होती. सोनी म्हणजे आता ननूची ननू झाली होती. तिचा तो बहिश्वर प्राणच! आपलंच एक रुप ननू बाहुलीत पाहत होती. थोड्याफार फरकानं तिच्या सगळ्या मैत्रिणीचीही हीच अवस्था होती.

सगळ्या नव्या बाहुल्या सोडून या जुन्या पुराण्या सोनीवर ननूचा इतका जीव का? हे कुणालाच कळायचं नाही. नादिष्ट आहे झालं! म्हणून सगळ्यांनी तो विषयच संपवून टाकला होता. मला आता वाटतंय, तो नुसता नादिष्टपणा नव्हता. ननूच्या चिमुकल्या जीवनात तिच्यापेक्षा छोटसं रुप प्रथम आलं ते तिच्या सोनीच्या रुपानं! त्या रुपावर तिचं संपूर्ण स्वामित्व होतं. बाकी सगळी तिच्यापेक्षा मोठी मंडळी! ती ज्या माणसावर – हो ननूच्या दृष्टीनं तिची सोनी माणूसच–पूर्ण हक्क सांगू शकत होती अशी सोनीच तर होती. या विश्वात तिनं प्रथम स्वामित्वाचा अनुभव घेतला होता तो सोनीमुळं. खऱ्या अर्थानं तिचा अहं (इगो) तृप्त केला तो सोनीनं! म्हणून सोनीवर तिचा हक्क! ती म्हणेल तसं सोनीनं वागलंच पाहिजे.

'सोनी, आता दूध पी बरं मुकाट्यानं, नाही तर बुवाला हाक मारीन. ये रे बुवा!'

'सोनी, आता मुकाट्यानं झोपायचं हं!' म्हणून एका दुपट्यात चिंधीत गुंडाळून मांडीवर आडवं घालून धोपटायला सुरुवात! 'सोनी, कुठं मातीत धडपडायला गेली होतीस? मळवलेस ना पुन्हा कपडे, खा मार आता' म्हणून सोनीच्या पाठीत दोन धपाटे. मग सोनी रडायची. (असं ननूला वाटायचं)

'उगी, उगी ग माझी सोनी, रडायचं नाही आता राणी, चला ऽ आता आपण भूऽर जाऊ'

मग सोनीचं तोंड धुणं, तीट, पावडर, कपडे बदलणं, प्रसंग पडला तर शी–शू सुद्धा सगळे कार्यक्रम उरकायचे मग जोडी फिरायला बाहेर पडलेली...

'चालणार आहेस का सोनी रस्त्यानं नीट? नाही तर उरावर बस' म्हणून बखोटं धरून सोनीला कमरेवर घ्यायचं. मधेच फुलं दिसली की सोनी कधी निसटून पडते आणि हातात फुलं कधी येतात हे कळतच नाही. तोवर ननूच्या सोनीची काळजी आईनं घ्यायची असते. चालताना मग ननू दमते. मग आईच्या कडेवर ननू आणि ननूच्या

कडेवर सोनी अशा तीन पिढ्या घरी येतात आणि चौथ्या पिढीच्या आजीच्या ताब्यात जातात.

सोनीशी वागताना ननू एकीकडे आईही होते आणि एकीकडे ननूही होते. एका ननूच्या देहात या दोन्ही वाऱ्यांचा संचार होत असतो. ननू आता नुसती ननू राहतच नाही. तिनं पहिला आईचा मुखवटा नकळत चढवलेला असतो आणि त्याच वेळी स्वत:च्या अस्तित्वाचंही भान असतं.

ननूला आता आमच्या शाळेत घालायचंय बालवाडीत. ननू बालवाडीत लगेच रमलीय.

ननूची प्रगती होतेय. गाणं, गोष्ट, नाच सगळ्यातून ननू वाढतेय. एका ननूच्या अनेक ननू होताहेत. परमेश्वराचं जसं झालं होतं तसंच ननूचं होतंय.

परमेश्वर विश्वारंभी एकच होता. मग विश्वाचा पसारा वाढत गेला. मग तो सगळ्यांत शिरला. त्याच्या एकातून तो अनेक झाला. 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति! त्या एकाच परमेश्वराला अनेक नावांनी लोक ओळखू लागले. तसेच त्या एका ननूची आता अनेक रुपं होऊ लागली. आता आईजवळ काय सांगायचं, बाबांजवळ काय सांगायचं, आजीजवळ काय सांगायचं, आजीजवळ कशी लाडीगोडी लावायची, मावशीला कशी गळ घालायची, वर्गातल्या मुलांसमोर कशी दादागिरी करायची? सगळं सगळं तिलाच उमगतंय. ती एक होती, ती अनेक होते आहे परमेश्वरासारखीच!

# स्वातंत्र्याची षष्ठ्यब्दी

१५ ऑगस्ट १९४७

पुण्याच्या शनिवारवाड्यासमोरचे विस्तीर्ण पटांगण प्राथमिक शाळेतल्या मुलामुलींपासून सुप्रतिष्ठित स्त्री पुरुषांपर्यंत सर्व स्तरांतल्या माणसांनी फुललेले! पहिल्या स्वातंत्र्यदिनांचा अपार उत्साह. 'स्वातंत्र्य मिळाले म्हणजे नेमके काय झाले?' हे न कळण्याच्या अवस्थेतील सहा सात वर्षेवयाच्या असंख्य मुलामुलींमधली मी एक वेंधळी मुलगी. त्या गर्दीतला एक कण!

१५ ऑगस्ट २००७ साठ वर्षेउलटली आहेत. म्हटले तर खूप आठवणी. म्हटले तर युगांतर झाल्यासारखे वाटते कधी कधी. तुलना करायची नाही म्हटले तर साठ वर्षानंतरच्या चित्राचा नीट अर्थच कळणार नाही.

आम्ही तेव्हाच्या शाळकरी मुली. शाळेत जात होतो खऱ्या, पण आम्हाला 'सुगृहिणीच' व्हायचे आहे हे कुणी न सांगताच रक्तात भिनलेले होते. आत्ताच्या आमच्या नातींची पिढी पाहिली की केवढा तरी टप्पा पार केला आहे हे स्पष्ट दिसते.

'मंगळागौरी आणि सत्यनारायण पूजांसाठी शाळा बुडवायचीच असते' हा आमचा शिरस्ता; तर आता अगदी बालवाडीपासूनच्या मुलींच्या शाळेच्या वेळांशी आणि वेळापत्रकांशी जुळणी करीत नाचणारे घर. आता आधी शाळा कॉलेज, अभ्यास, निरनिराळे क्लासेस, मैत्रिणींशी ठरवून आखलेले घराबाहेरचे कार्यक्रम आणि बहुधा

सगळ्यांत सहभागी होणारे पालक! विशेषत: स्त्रीपालक! मुलींना घरकाम यायला हवे, पण ते पार दुय्यम तिय्यम स्तरावर सरकले आहे.

अगदी डोळ्यात भरणारा बदल पोषाखातला. किती तरी प्रकारचे कपडे, अंगाबेताचे (क्वचित तोकडेही). पायताणापासून डोक्यातल्या पिनांपर्यंत रंगसंगतीचा आग्रह अगदी पाच वर्षांच्या चिमुरडीचाही! अगदी रानाशेतात काम करणाऱ्या ग्रामीण मुलीही सर्रास डोईवरच्या पदराची बोंगा साडी सोडून सलवार खमीसमध्ये आल्या आहेत. हे पाहिले की आमच्या वेळच्या फक्त सणासुदीचे निमित्त करून घरातल्या समस्त पोरीबाळींना एकाच ताग्यातल्या कापडातून बनवलेले 'वाढत्या अंगाचे' झगे नाहीतर परकर पोलकी आठवली की, आता आमची आम्हालाच गंमत वाटते. तथाकथित मध्यमवर्गीय पांढरपेशा (खरे तर ब्राह्मणी) घरातल्या मुलींची ही अवस्था! मध्यमवर्गच चिमूटभर होता. पालकांच्या नोकऱ्या फारच 'बेतशीर' उत्पन्नाच्या. कुटुंबकबिल्याचा विस्तार ऑक्टोपस सारखा विस्तारलेला. आजच्या त्रिकोणी फार तर चौकोनी कुटुंबाच्या तुलनेत अवाढव्यच! त्याचा परिणाम जीवनाच्या, जगण्याच्या, समाजाच्या आणि म्हणूनच स्त्री जातीच्या सर्व अंगांवर होणे अपरिहार्यच नव्हते का?

स्त्रियांचा विचार करताना प्रामुख्याने मध्यमवर्गीय शहरी स्त्रियांचाच विचार अधिक होतो. खरे तर भारतासारख्या अफाट देशात असा एकजिनसी, एकस्तरीय विचार अशक्य आहे. आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, जातीय, धार्मिक कितीतरी भेदभाव आहेत. त्यानुसार आदिम जंगली स्तरापासून ते अत्याधुनिक यंत्र तंत्र प्रगत वैज्ञानिक युगातल्या अवस्थेपर्यंत कितीतरी स्तर आहेत. सर्व स्तरांतल्या स्त्रियांची (समाजाचीच) अवस्था इतकी परस्परभिन्न आहे की, हत्ती आणि सात आंधळ्यांच्या गोष्टीसारखी येथील स्त्रीजीवनाची अवस्था आहे. पण इतका विस्तृत विचार या लहानशा लेखमर्यादित अशक्य आहे. म्हणून विषयव्याप्तीचा केवळ निर्देश करीत आहे.

अगदी मध्यमवर्ग म्हटला तरी साठ वर्षांपूर्वीच्या मध्यमवर्गापेक्षा आजचा मध्यमवर्ग कितीतरी वेगळा, विस्तारलेला आहे. हा विस्तार आडवा म्हणजे संख्यात्मकही आहे आणि उभा आर्थिकदृष्ट्याही उंचावलेला आहे. आर्थिक स्तर उंचावणे हे मध्यमवर्गाचे एक महत्त्वाचे पायाभूत लक्षण असेल तर परंपरेपेक्षा कितीतरी भिन्न जातीय समाज मध्यमवर्गीय झाले आहेत. मध्यमवर्गाचा पाया विस्तारला आहे. तो असा! शिक्षणाला

अग्रक्रम देण्याची वृत्ती हे मध्यम वर्गाचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण आणि याचाच पुढचा टप्पा म्हणजे निश्चित उत्पन्नासाठी शिक्षित व्यक्तींची धडपड, स्पर्धा त्यामुळे आलेले काहीसे आर्थिक स्थैर्य! या सर्वांचे केंद्र अपरिहार्यपणे 'व्यक्ती' होत जाते तेव्हा स्वाभाविकच स्त्री व्यक्ती म्हणूनच या नवमध्यमवर्गात आपले स्थान निश्चित करण्यासाठी प्रयत्नशील राहते.

१९४०-५० च्या दशकात आणि पुढच्याही एखाद्या दशकात दुर्मिळ आणि आपत्कालीन असलेले मध्यमवर्गीय स्त्रीचे अर्थार्जन पुढच्या पाच पंचवीस वर्षात 'महागाई'चे निमित्त करीत कुटुंबप्रमुखाच्या (पुरुषाच्या) तुलनेने दुय्यम पण पूरक राहत गेले. आजच्या साठीतल्या बाईची तेव्हा ही स्थिती होती मात्र आज स्त्रीला आपली स्वतंत्र ओळख करून घेण्यासाठी अर्थार्जन अपरिहार्य वाटते. 'पूरक'त्व हळूहळू बाजूला सरकते आहे.

उलट शहरीकरणाकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामीण भागातील (मधल्या जातीय स्तरातली) स्त्री साठ वर्षांपूर्वीच्या मध्यमवर्गीय स्त्रीच्या जागी पूरक अर्थार्जन करण्याच्या भूमिकेत येत आहे. मध्यमवर्गीय स्त्रीच्या अर्थार्जन अवस्थेतली ही उभी वाढ आहे असे वाटते.

शहरी उच्च मध्यमवर्गीय स्त्री आता प्रगतीची अनेकानेक शिखरे पादाक्रांत करीत निघाली आहे. एके काळी केवळ प्राथमिक माध्यमिक शिक्षिका किंवा कारकून असलेली ही स्त्री प्राध्यापक, वकील, डॉक्टर... असे व्यवसाय पादाक्रांत करीत 'कॉर्पोरेट' एरियात नवऔद्योगिकीकरणाच्या क्षेत्रात कळीच्या जागांवरील जबाबदारी लीलया पेलीत आहे. ठराविक कार्यक्षेत्रांच्या पलीकडे कितीतरी विविध क्षेत्रे पादाक्रांत करीत आहे. उद्योजक म्हणून स्त्रियांची एक स्वतंत्र जमात आकार घेत आहे. स्त्रीचे अर्थार्जन आता चर्चेचा मुद्दा न राहता, जगण्याचा अविभाज्य भाग होत आहे.

परंपराशील ग्रामीण स्त्रीमधील दृश्यबदल गेल्या वीस पंचवीस वर्षात ठसठशीत होत चालला आहे. निदान महाराष्ट्रात! औपचारिक शिक्षण घेणारींची संख्यात्मक वाढ विविध शाखांचे शिक्षण देणाऱ्या संस्थांचे जाळे ग्रामीण भागापर्यंत पसरल्याने सहज शक्य झाली आहे. परिणामत: राहणीमानात, पोशाखात अधिक नीटनेटकेपणा, जाणीवपूर्वकता वाढत आहे. दिग्दर्शन, चित्रपट, जाहिरात युग आणि मुख्य म्हणजे

ग्रामीण भागापर्यंत पोचलेली आधुनिक बाजारवस्तूंची उपलब्धता यांचा परिणाम स्पष्ट जाणवतो आहे. आता टूथपेस्ट, शाम्पूचा वापर हा ग्रामीण जीवनात अपवाद नाही (पुन्हा साठ वर्षांपूर्वी कपड्याचा साबणही घरातल्या फक्त कर्त्या पुरुषांच्या कपड्यांसाठीच असे) ग्रामीण भागातील महिला मेळावे, स्त्रियांच्या सभांमधूनही नऊवारी साडी आणि डोक्यावरचा पदर अपवादानेच दिसतो. चापूनचोपून पिना लावून, साड्या नेसणाऱ्यांची संख्या सर्वत्र वाढत आहे. अगदी तालुक्याच्या गावीही 'ब्यूटी पार्लर' ही नवलाई नाही.

आर्थिक बदलाचे स्त्रीसमूहावरचे हे काही दृश्य परिणाम आहेतच. बरोबरीने स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये स्त्रियांना मिळालेल्या राखीव जागा आणि अलीकडच्या काळातील महिला बचत गटांची वाढती संख्या या दोन्हीतून ग्रामीण स्त्रीच्या बदलाला वेग आला आहे. राखीव जागांमुळे राजसत्ता आणि बचतगटांमुळे अर्थसत्ताप्राप्तीच्या संधी खुल्या झाल्या आहेत आणि वापरून गुळगुळीत झालेला शब्द वापरायचा तर अर्थाच्या सर्व कंगोऱ्यांराह स्त्रीचे 'सक्षमीकरण' होण्यासाठी अनुकूल वातावरण समाजाच्या सर्व स्तरांत निर्माण झाले आहे. कुटुंब विशेषत: पती, समाज आणि पुरुषसत्ताक मानसिकता यातील अनुकूल बदलांसह जेथे सहकार्य मिळते आहे, तेथे स्त्रियांच्या अनेकानेक सुप्त गुणांची त्यांची त्यांनाच ओळख होत आहे. त्यातून आत्मविश्वास वाढतो आहे. जेथे विरोध आहे, तेथे स्त्रिया संघर्षातून वाटा मोकळ्या करीत आहेत. हा संक्रमणकाळ आहे. त्यामुळे येथेही भलेबुरे अनुभव, संघर्ष माघार, क्वचित स्त्रियांनीही पुरुषी दुर्गुण उचलणे हेही घडते आहे. पण एकूण समाजात स्त्री पुरुष मानसिकतेत अभिसरण घडत आहे. मुलींचे शिक्षण हा आता वादाचा मुद्दा राहिला नाही. मात्र तिचे गृहिणीपण अबाधित राहावे ही मानसिकता सर्वत्र आहे. पुरुष घटक (पिता, पती, भाऊ) शहरातच नव्हे तर ग्रामीण भागातही अनेकदा सहकार्याची भूमिका घेत आहेत. हे होणे अपरिहार्य आहे. अन्यथा बदल केवळ एकांगी झाले तर घडी विस्कटून जाईल.

स्त्री सर्व स्तरात ज्या प्रमाणात बदलते आहे, त्या प्रमाणात पुरुष बदलत नाही, हे वास्तव आहे. परिणामत: अनेक ठिकाणी उसवलेपण वाढते आहे. शहरीच नव्हे, तर ग्रामीण भागातही दृश्य अदृश्य घटस्फोटांचे प्रमाण वाढते आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेचे स्मरणरंजनात्मक (नॉल्जेस्टिक) गोडवे गाण्याची लाट मध्यमवर्गीय दूरदर्शन मालिकांतून आली असली तरी ग्रामीण भागातील कुटुंबांतूनही नोकरीपेशा स्त्रियांच्या

वाढत्या प्रमाणाबरोबर विभक्त कुटुंबे वाढत आहेत. बालवाडी, प्राथमिक शिक्षिका ही क्षेत्रे केवळ स्त्रियांनी व्यापलेली दिसत आहेत. किरकोळ वस्तूविक्रेत्यांपासून प्राध्यापक, डॉक्टर, वकील... या क्षेत्रात ग्रामीण महाराष्ट्रात स्त्रीसंख्या झपाट्याने वाढते आहे. कंम्प्यूटर, तंत्रनिकेतन, फॅशनडिझायनिंग, आर्किटेक्चर, खेळ, पोलीस खाते, डिपार्टमेंटल स्टोअर्स..... अशा चाकोरीबाहेरच्या क्षेत्रातही शहरी ग्रामीण सर्वच भागातील स्त्रियांची संख्या वाढत आहे. त्याबरोबरच स्त्रीचा आत्मविश्वास आणि आकांक्षाही वाढत आहेत. स्त्रीच्या वाढत्या अर्थार्जनाबरोबर तिचे 'कुटुंबकर्तेपण'ही वाढते आहे. काहीसा मोकळेपणा, धिटाई, हक्कांची जाणीव ते मिळवण्यासाठीची सर्व स्तरांवरची कृतिशीलता यातून आत्मसन्मानाची जाणीव वाढत आहे.

बाजारी अर्थव्यवस्थेमुळे आलेल्या अनेक वस्तुरूप साधनांमुळे शहरी स्त्रीचे शारीरिक कष्ट (गृहव्यवस्थापनातले) संपुष्टात आले आहेत. मिक्सर, दूरदर्शन, गॅस, फ्रीज, नळ, बेसीन या बाबी ग्रामीण जीवनातही नवलाईच्या राहिल्या नाहीत. मधून मधून हॉटेलिंग तालुकापातळीवरही पोचले आहे. स्वयंचलित वाहने (दुचाकी सर्रास, क्वचित चारचाकी) तेथेही पोचली आहेत. मोबाईलचे खेळणे हातोहात झाले आहे.

तरीही....

या सगळ्या बदलांपलीकडे अंधारात असलेल्या, बालविवाहाच्या बळी, हुंडाबळी, फसवून नाडल्या जाणाऱ्या अशांची संख्याही कमी नाही. ग्रामीण भागातही पौगंडावस्थेतील मुलांच्या विपरित वर्तनाच्या समस्या वाढत आहेत. एडस बाधितांची संख्या चिंताजनक आहे. कुटुंबे संख्यात्मकदृष्ट्या आटोपशीर होत असतानाच एकुलत्या एक अपत्यामुळे आलेले मुलांचे भावनिक पोरकेपण, वृद्धांच्या समस्या, शहरी जीवनातून ग्रामीण भागातही सुधारणा(?) बरोबरच पाझरत आहेत.

जुन्या सासुरवासांची जागा सूनवास घेत आहे का? असे वाटण्याजोगी परिस्थितीही क्वचित दिसते. स्त्रियांबाबत अनेक उत्साहवर्धक बदलांबरोबरच काही विपरीतही घडत आहे.

वैज्ञानिक आविष्कारांतून कुटुंब आटोपशीर झाल्याने स्त्रीला उसंत मिळाली खरी, पण आता त्याच विज्ञानाची मदत घेऊन स्त्री अर्भक जन्मापूर्वीच नष्ट करण्याची प्रवृत्ती चिंताजनक पातळीवर पोचली आहे आणि तथाकथित जागरूक स्त्री या अपप्रवृत्तीच्या

विरोधात नेटाने उभी राहिल्याचे कुठेच दिसत नाही, असे का?

वाढते औपचारिक शिक्षण अर्थार्जन, अर्थसत्तेत व राजसत्तेत वाढता सहभाग. यातून धडाडी आत्मविश्वास दिसतो असे वाटत असले तरी अगदी उच्चभ्रू, उच्चशिक्षित तरुण स्त्रीही व्रते, उद्यापने, दिखाऊ पूजा अर्चा, पोथ्या, स्वामी, महाराज, गुरु यांसारख्या देवताळेपणात गुरफटत चाललेली दिसते. असे का?

आज साठ सत्तरीत असलेल्या स्त्रियांनी त्यांच्या तरुण प्रौढ वयात विचारपूर्वक जी कर्मकांडे सोडली होती, त्याच्या कितीतरी अधिक प्रमाणात पुढची पिढी त्यात गुरफटताना दिसते. अर्थात येथेही अपवाद आहेत. पण सर्वसाधारण चित्र हे आहे. कर्मकांडाचे स्तोम न माजवताही प्रामाणिक श्रद्धा असू शकते, पण हा विवेक नसणारा, कर्मकांडी समाज वाढताना दिसतो आहे. मनाचा एक कोपरा एवढा तकलादू, अस्वस्थ का? असेही काही प्रश्न उभे राहतात.

# रडू...हसव रे जरा...!

काही दिवसांपूर्वी दूरदर्शनवर एका आदिवासी जमातीवरचा माहितीपट पाहिल्याचे आठवते आहे. घनदाट जंगल. अत्यंत विरळ अशी माणसांची वस्ती. पण पोटापाण्याची सोय त्यांनाही करावी लागतेच. अशात एखाद्या दांडग्या रानडुकराची शिकार करायचा घाट घातला जातो. जनावर माजलेले. त्याला मारण्यासाठी आदिवासींजवळ फक्त धनुष्यबाण आणि भाले शिकारीची वेळ रात्री–पाणवठ्यावर मंडळी दबा धरून बसली आहेत. ताण वाढतो आहे. दाट जंगलातल्या चढत्या रात्रीने त्यात भर पडली आहे आणि डोळ्याचे पाते लवते ना लवते एवढ्यात जनावर पाण्याला तोंड लावत असताना गचकन् त्याच्या राठ पाठीत भाला घुसतो. जनावर चवताळून उलटते आणि रोखल्या श्वासांनी, जिवाच्या कराराने बाण आणि भाले डुकरावर आदळत, खुपसत त्याला संपवतात. जनावर शांत झाले तरी वातावरणातला ताण कमी होत नाही. एका दांड्या बांबूला यथास्थितपणे ते बांधून मागे पुढे चार चार जणांच्या खांद्यांचे टेकू लावून ते उचलले जाते. जाळीतून दबत्या पावलांनी वाट काढत मंडळी ओळखीच्या वाटेला लागतात आणि त्यांच्या कंठातून आवाज उमटतात. एका लयीत आणि पावलांच्या तालावर विशिष्ट सूर घुमू लागतात. सूर्याची किरणे दिसू लागतात आणि चेहऱ्यांवरचे ताण दूर होतात. जंगलात आपल्याच सुरांची सोबत साथ देत राहते.

आणि अचानक मला गाण्याच्या उमगाची गंगोत्री सापडते. सुरांनी माणसाची स्वत:चीच प्रथम सोबत केली. डोक्यावरच्या चिंता ताण सैल करण्यासाठी मदत केली.

ताणमुक्तीचा आनंद दिला.

मग सगळीच आदिवासी गीते आणि नृत्ये आठवली, सुगीच्या दिवसातली लोकगीते आणि नृत्ये आठवली. ग्रीष्माच्या रखरखाटाने आलेले शारीरिक आणि मानसिक ताण पावसाच्या शिडकाव्याने सैल झाले. शेतं हिरवी झाली. कणसे भरली, धान्याच्या राशी खळ्यात आल्या की ताणमुक्तीच्या आनंदाने बेहोश होऊन लोकगीते नृत्ये रंगू लागतात. निसर्गाने साथ दिली की वर्षभराची चिंता दूर होते आणि त्याचा आविष्कार गीत, नृत्य, यात्रा, जत्रा, क्रीडा, स्पर्धा, नटणे थटणे अशा अनेक अंगांनी होत राहतो. अशावेळी कविवर्य केशवसुतांची एका कवितेची ओळ आठवते, 'गाण्याने श्रम वाटतात हलके । हेही नसे थोडके ।।'

श्रम शरीराचेही असतात. मनाचेही असतात. नुसतेच शारीरिक श्रम करीत राहिले तर शीण थकवा वाढतो. म्हणून आपल्या पारंपरिक जीवनशैलीत कामाबरोबर गाणे येते. आता शेतीकामातही खूप यंत्रे आली आहेत. पण जेव्हा बैलांचे नांगर, मोटा होत्या, कापणी, मळणी माणसांनाच मेहनत करून करायला लागायची तेव्हा मोटेची गाणी, भलरीची गाणी गात शेतकरी श्रम हलके करीत असे. 'गाता गळा आणि शिंपता मळा' ही माणसाच्या सुखाची परमावधी असते.

बायकांची तर पारंपरिक सगळी कामं शारीरिक कष्टाची! दळण–कांडण, धुणी–भांडी, बाळाला जोजवणं, सडा–सारवण शिवाय शेतातली कामे आणि वर घरात सासुरवास निराळाच! अशा वेळी तर काम करताना गाणे गात, ओव्या गात आपले शारीरिक मानसिक ताण हलके करण्याचा प्रयत्न बाई करीत आली आहे.

'गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा' म्हणत दळताना जात्याच्या दगडाशीच ती बोलत राही तर कधी –

'जात्या तू ईसवरा (ईश्वरा) नको मला जड जाऊ' म्हणत जात्याचीच विनवणी करीत असे.

हादग्या–भोंडल्याच्या गाण्यातून सासरच्या माणसांवर 'झिप्रं कुत्रं सोडा गं बाई' असे हसत सांगत प्रत्यक्षातल्या सासुरवासाच्या कडक आधणात गाण्याचे विसण घालीत राही. प्रत्यक्षात सासरच्या माणसांपुढे मान वर करून पहायची हिंमत नसे. अशा वेळी खेळातल्या गाण्यातून, म्हणी उखाण्यांतून आपले मन मोकळे करण्याच्या बाईच्या दृष्टीने मनात साठलेल्या ताणांचे हे एक प्रकारे विरेचन (ॲरिस्टॉटलच्या भाषेत

कॅथॉर्सिस) असे.

नृत्य, नाट्य, गीत या सर्वच कला माणसांचे शारीरिक मानसिक ताण हलके करण्यासाठी असल्याची प्रचिती नाट्यवेद निर्माण करणाऱ्या भरतमुनींनेच सांगून ठेवली आहे. नाटकाच्या निर्मितीचा हेतू सांगताना भरतमुनी म्हणतात,

दु:खार्तानां, श्रमर्तानां, शोकार्तानां, तपस्विनाम्

विश्राम जननं लोके, नाट्यमेतद् मया कृतम् ।।

दु:खी, श्रमिक, शोकग्रस्त आणि तपस्वी या सर्वांच्या मनाला विसावा मिळावा (आणि पुन्हा प्रपंचातले टक्के टोणपे खाण्यासाठी ताजे तवाने होता यावे) म्हणून मी नाटक निर्माण केले असा निर्वाळा नाट्यशास्त्रकर्त्यानेच दिला आहे.

दैनंदिन गरजा भागवण्यासाठी शारीरिक आणि मानसिक श्रम घ्यावेच लागतात. कधी कधी त्यांचा अतिरेक होतो. मग ताण वाढत जातात. अशावेळी कला आणि क्रीडा यांच्यामध्ये प्रत्यक्ष कृतिशील सहभाग हा फार निरामय उतारा आहे.

प्रत्येक व्यक्तीजवळ कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची कल्पकता, नवसर्जनशीलता असते. आपल्या ऐहिक गरजांसाठी ती वापरली जातेच. पण जेव्हा व्यावहारिक लाभहानीची गणिते ओलांडून तिचा उपयोग होतो तेव्हा जे निर्माण होतं तीच कला! त्यातून मिळणारा आनंद हा कलात्मक आनंद! ज्या आनंदाला व्यावहारिकतेची कुंपणे नसतात, नसावीत. असा एक कोपरा सुबुद्ध माणसाने प्रयत्नपूर्वक जतन करायला हवा. प्रपंचाच्या ऐन धकाधकीतही त्याच्यासाठी शक्ती आणि वेळ ठेवावा. मग ताणमुक्तीच्या नावाखाली, बिझनेस पार्टीच्या नावाखाली इतर मादक द्रव्यांच्या सेवनाची गरज राहत नाहीच. आपण काहीतरी आनंददायी निर्माण करू शकतो ही धुंदी पुरेशी ठरते. पण त्यासाठी त्या कलानिर्मितीत प्रत्यक्ष सहभाग हवा. केवळ दुसऱ्यांची गाणी ऐकून, टेपरेकॉर्ड ऐकून, नाटके सिनेमे पाहून किंवा तत्सम अप्रत्यक्ष कलास्वाद हा एक प्रकारे माणसाला निष्क्रिय करतो. हे सर्व करताना स्वत:ही गाण्याची लकेर आपल्यापुरती–आपल्यासाठीच–निर्हेतुक छेडीत रहावी, आपल्यासाठीच नृत्याचा ताल लयीत कधीतरी झोकून द्यावं, आपण आपल्यासाठीच रंगाचे चार फटकारे कागदावर ओढावेत आणि आपल्याला अभिव्यक्त करीत रहावे थोडक्यात म्हणजे

'गाना आये या ना आये गाना चाहिये।'

तो आनंदाच्या मुळीचा झरा आहे. जीवनातले ढळते तोल सावरण्यासाठी आपल्याचा रक्तातला आदिताल सर्वात प्रभावी उतारा आहे. त्यालाच कला म्हणायचे, दुसरे काय?

आपण सगळे तानसेन होऊ शकत नाही पण कानसेन तर होऊ शकतो. आणि बाथरूम सिंगर तर असतोच असतो. तो गाता गळा एरव्हीही वाहता ठेवून पहावा. अनोख्या आनंदाचा ठेवा सापडेल.

आपल्या पारंपारिक जीवनशैलीत देवा धर्माच्या नावावर का होईना आरत्या, पदे, स्तोत्रे, अभंग, भजने हे सर्वांच्या गात्या गळ्याला प्रवाही ठेवत होते. एक परीने ते ॲक्टिव्ह पार्टिसिपेशन होते. आता नुसते दूरस्थ बसून ऐकणे पाहणे हे फार पॅसिव्ह होते आहे. शरीर आणि मन दोन्हीची गुंतवणूक कलेत हवी तरच पुरता आनंद भोगता येतो. अन्यथा चिंता, ताण, अस्वस्थता माणसाला ग्रासून टाकते.

कला आणि क्रीडा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जोपर्यंत ते पोटापाण्याचा आणि रुपये आण्याच्या विनिमयाचे साधन होत नाही, तोवर त्यातून निखळ आनंद मिळतो. त्यामुळे चिंता ताण यातून तोल सावरतो. जी निर्मिती केवळ स्वान्त: सुखाय असते, ती माणसाला स्वर्गीय समाधान देते.

जी.ए.कुलकर्णी यांची एक सुंदर कथा आहे. एक फीडल वादक असतो. जगाच्या पाठीवरचा सर्वश्रेष्ठ फीडल वादक व्हायचे, ही त्याची महत्वाकांक्षा असते. तो खूप मेहनत घेतो. अनेक स्पर्धा गाजवतो, महफिली गाजवतो. यशाच्या धुंदीत जगू पाहतो. पण मन शांत होत नाही. अशांतच राहते. हातात अखंड वाद्य असते. आता सर्वकाळ तो आणि वाद्य हेच एकमेकांचे असतात. त्याला खाण्यापिण्याचेही भान रहात नाही. वाजवीतच चालत राहतो. पाहणारांना भीती वाटते की, हा वाद्याच्या नादात कुठेतरी तोल जाऊन पडेल. पण घडते भलतेच. एका क्षणी नादावल्या अवस्थेत तो फीडल् फेकून देतो. पाहणारा म्हणतो, 'आता त्याला दुसऱ्या कशाची गरज नाही. तोच एक फीडल झाला आहे.' आता तो तोल जाऊन पडणार नाही. कलावंताची कलेची समाधी म्हणतात ती हीच! त्याला आता बाहेरच्या कोणत्याच साधनाची गरज नाही पूर्णपणे आत्मरंगात तो दंग झाला, सुख दु:खाच्या, ईर्ष्या स्पर्धेच्या अतीत पल्याड जाऊन तो पोचला.

जी.ए.ची ही कथा जगण्याचे, आनंदाने जगण्याचे एक फार मोठे सूत्र सांगते. एक परीने आत्मरंगी मन रंगले। म्हणणाऱ्या संतासारखी ही कलेची आत्मलीन समाधीच समाधानाची परमावधी ठरते. सुख सुख म्हणतात ते वस्तूत आणि इर्षेत थोडेच सापडले? वेड्या मना –

कर विचार । सुख थोडे, दु:ख फार ।।

असे आधुनिक कवीही सांगतात, पण या दु:खावर मात करण्याचा उताराही माणसाजवळच असतो. एखादी कला थोडी जरी अवगत असली तरी दु:खाच्या कळा विसरता येतात. तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ।। असे होते तर क्रौंच पक्षाच्या आनंदमग्न जोडीतल्या नराला पारध्याचा बाण लागला आणि क्षणार्धात तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. हळव्या हृदयाचे महर्षी वाल्मिकी शोकाकुल झाले. दुसऱ्याच क्षणी तो शोक प्रसंगच त्यांच्या अंत:करणातल्या प्रतिभावंत कवीला प्रेरणा देणारा ठरला आणि करूणरसपूर्ण, शोक संतप्त भावना व्यक्त करणारा सुमधुर अनुष्टुभ, छंदातला श्लोक त्यांच्या मुखातून उमटला. तो जगाच्या पाठीवरच्या एका महान महाकाव्याचा रामायणाचा प्रारंभ बिंदू होता. महाकवीच्या प्रतिभास्पर्शाने शोक श्लोकरूप झाला. त्या रामायण महाकाव्याने अक्षरश: पिढ्यान्‌पिढ्यांच्या जनमानसाला मात्र समाधान दिले आहे. आनंद दिला आहे. महाकवीमुळे, कलावंतामुळे वेदनेचा वेद होतो. आसूचे रुपांतर हसू मध्ये होते. हे सामर्थ्य आहे कलेचे! कलात्मक रसिक वृत्तीचे!

आपण सगळे काही महाकवी वाल्मिकीची (किंवा व्यास मुनींची) प्रतिभा घेऊन जन्माला आलो नाही. ते प्रतिभेचा महासागर होते. पण आपल्याजवळ त्या महासागरातला एखादा बिंदू निश्चित असतो. तो आपल्या मधल्या कलावंताची सर्जनशीलता, नवनिर्माण क्षमता चेतवतो आणि आपल्याही दु:खावर उतारा देणारे क्षणाचे हसू का होईना फुलवू शकतो. आपल्यासारख्या सामान्य माणसांना सरस्वतीकन्या बहिणाबाई चौधरींनी दिलेला संदेश या संदर्भात फार महत्त्वाचा वाटतो. आनंदाच्या चंद्रज्योती फुलवणारा वाटतो. बहिणाबाई म्हणतात,

रडू नको माझ्या जीवा । तुला रडण्याची रं सवंऽ (सवय)

रडू हसव रे जरा । त्यात संसाराची चव ।। हेच खरे!

# लेकुरे उदंड झाली

एकविसाव्या शतकात जाणाऱ्या बायांनो आणि बाप्यांनो, ऐका नीट ही कहाणी. मनात रुजवा ही वाणी.

आटपाट नगर होते. गावात शिवार रान होतं. मुलं, माणसं, बायका पुरुष आनंदात न्हात होते. जमिनीत जे पिकत होते ते गावाला पुरत होते. पै पाहुणा, आला गेला सगळ्यांना तृप्त करीत होते. गाई गुरांची खिल्लारं दूध तूप देत होती. माणसं सहसा आजारी पडत नव्हती. पाण्याचा दुष्काळ पडत नव्हता. गावाचा कचरा खताच्या कामी येत होता. हवा पाणी त्यामुळे स्वच्छ रहात होते.

गावातल्या शाळेत मुलं मुली शिकत होती. शहाणी होऊन गावात कामं करीत होती. गावं सुधारत होती. श्रीमंत करीत होती. मुलं मोठी झाली की लग्नकार्य होत होती. काही मुलींना गावाबाहेर सासरघरं मिळत होती. काही मुली बाहेरगावाहून सुना म्हणून गावात येत होत्या. घरासाठी, गावासाठी कष्ट करीत करीत म्हाताऱ्या होत होत्या. अशी खूप खूप वर्षे सरली. अनेक पिढ्या जन्माला आल्या आणि संपल्या.

पण इतक्या काळात गावाचं रूपच पालटलं. म्हातारी माणसं म्हणू लागली, 'आरारा... गावाची अगदी रयाच गेली. शेतीवाडी, जमीन पाणी आताच का पुरेनाशी झाली? आमचं लहानपण सुखाचं होतं. घराला मोठं आंगण होतं. भवताली मोठं शिवार होतं. दुधा तुपाचा सुकाळ होता. आता असं कसं झालं? घरं आता पुरत नाहीत, धान्य धुन्य पुरत नाही. पै पाहुणा जड होतो. मुला बायकांच्या तब्येती तोळा मासा झाल्या.

तरुण मंडळीही रोडावत चालली. कुणाला ताप येतो, कुणाला खोकला होतो, कुणाची पोटं बिघडतात, म्हणे हवा पाणी बाधतं. असं कधी आधी होतं? आपल्याच गावातली हवा, इथलंच पाणी! आता कां उरफाटी झाली इथली रहाणी?

गावातलाच एक शहाणा मुलगा, त्याच गावची एक शहाणी मुलगी. डॉक्टरीचं शिक्षण घेऊन गावात आली. लग्न करून प्रपंचाला लागली.

वर्ष दोन वर्षेगेली. त्यांची वंशवेल फुलली. पहिली बेटी, धनाची पेटी. कुरळ्या केसाची, मोत्याच्या दाताची, बाई माझी गुणाची. दिसामाशी वाढू लागली. साखळ्या तोडे पायी ल्याली. घरादारात रुमझुम झाली. आई बापाला अपार सुख झालं. आजी आजोबाला धन्य धन्य वाटलं. लेक दोन वर्षाची झाली. मग मात्र आजीची भुणभुण सुरु झाली, 'अग अग सूनबाई. तू मोठी डाक्टरीण झालीस–सगळ्या गावाच्या बायांना दवा पाणी देतीस. आजारी पोरं जगवतीस आणि तुझ्या स्वत:च्या एकीच कशी कानाडोळा करतीस?'

'काय झालं सासूबाई? मी तर चांगली खाती पिती आहे. मी तर चांगली धडधाकट आहे.'

'म्हणूनच म्हणते ग सूनबाई, आता मला नातू हवा. नात झाली आता मोठी. आता मला नातू हवा – नातू हवा, नातूच हवा'

'कशाला हो सासूबाई नातू हवा? नात तुमची कशी गोमटी, रूपा–गुणाची खाण आहे. बुद्धीनं तेज आहे.'

'आहे बाई आहे. मी कधी नाही म्हटलं? नात माझी गुणी, रूपा गुणाची खाणी पण मुळातच उणी, होईल दुसऱ्या घरची राणी! मग आपल्या घराण्याचं काय? आपल्या घराण्याचा लौकिक, आपली वंशवेल, आपल्या बापजाद्यांचं नाव कोण चालवणार? म्हणून मला नातू हवा. एक बेटा, घरला करील मोठा!'

'कशावरून सासूबाई घराला करील मोठा? कशावरून बेटा पाठीत नाही मारणार सोटा? त्या तुमच्या म्हाताऱ्या काशीबाईला एक सोडून पाच बेटे आहेत. माहीत आहे ना! एक तरी विचारतो का तिला. एक करतो चोऱ्या, दुसरा आहे बेवडा, तिसऱ्यानं काढलं दिवाळं, चौथं आहे येडं गबाळं, पाचव्याची तर वरताण, म्हाताऱ्या आईला हाणतो पायताण! काय त्यांचा उपयोग!'

'हाय तसं तुझं खरं. पण पोरगा तो पोरगा. मेल्यावर तोच पाणी पाजणार.

त्याच्याशिवाय सत् ना गत्'

'सासूबाई सासूबाई, कसं सांगू तुम्हाला? अहो जितेपणी अन्न अन्न आणि मेल्यावरती पिंडदानं. कुणी बघितलंय मेल्यावर काय होतं ते! आप मेला अन् जग बुडालं. मेल्यावरचं एकच खरं. तीन चिमटी राख. जितेपणी त्या म्हातारीला कोण राखतंय? पाच पोरगे असून ते नाही राखत, अखेर म्हातारी पोरीच्याच दारी आहे ना! तीच म्हातारीची सेवाचाकरी करते ना! तीच जितेपणी अन्न पाणी देते ना!'

'होय ग सूनबाई. ती लेकच लेकापरीस गुणी! पण तरी वाटतं वंशाला दिवा हवा.'

'सासूबाई, लेक तरी आईच्याच पोटात वाढती अन् पोरगा तरी आईच्याच पोटात वाढतो नाही का? दोघांना जन्माला कारण बापच असतो नाही का? मग एकाच रक्तामासातून जन्माला आलेली लेक आपल्याच वंशाचा दिवा नाही का? एक गुणी लेक चार उनाड पोरांच्या चढ कुळाची कीर्ती वाढवते की न्हाई?'

'पटतंय खरं सूनबाई. पण नाव कुठं राहतं आपलं? पोरीचं लगीन झालं की नाव तिचं बदलतं!'

'आता ते दिवस संपले सासूबाई. लेकीचं लगीन झालं तरी नाव बदलायची आता गरज नाही. कायद्यानं सुद्धा नाही.'

'तरीपण मला नातू हवाच' म्हातारी काही आपला ठेका सोडायला तयार नाही, म्हणताना डॉक्टर मुलगा आपल्या आईला म्हणाला, 'आई आणि परत मुलगीच झाली तर...!' 'आरे बाबा तू यवढा डाक्टर झालास! ती तपासणी का काय कर, आन् मुलगीचा गर्भ असला तर होऊनच देऊ नकोस'

'अग आई, तू एक बाई आणि असं बोलवतं तरी कसं तुला? तुझ्या आईनं तुझ्यावेळी असा विचार केला असता, तर तू कशी जन्माला आली असतीस? आणि तू नसतीस तर मी तुझा मुलगा तरी कसा जन्माला आलो असतो? सगळ्याच मुलींना संपवलं तर पुढचे मुलगे कुणाशी लग्न करतील?'

आता काय बोलावं ते म्हातारीला कळेना. तरी आपलंच म्हणणं रेटत ती भुणभुण करीत राहिली. 'मग पोरगा होण्यासाठी दुसरी बायकू कर. हिची कूस फक्त पोरगीच देणारी असली तर!'

'अग आई तिच्यावर कोणी पोरगा पोरगी होणं अवलंबून नसतंय. मी तुझा मुलगा डॉक्टरी शिकलो आहे ना! डॉक्टरी शास्त्र सांगतं, मुलगा होणं आणि मुलगी होणं हे

बापाच्याकडून आईकडे जाणाऱ्या बीजावरच ठरतं. दोष बाईचा नसतोच. मग काय करायचं?'

'आरं बाबा, मी अडाणी. मला कुठं तुझं हे शास्तर माहीत आहे! आत्ता कळलं मला की त्या शांतीच्या मुलानं तीन बायका केल्या तरी दर एक बायकोला दोन दोन मुलीच का झाल्या ते!'

'तेच म्हणतो मी आई. आता त्याची हालत बघ कशी झाली? सहा मुलींना जेऊ खाऊ घालताना त्याची कशी तारांबळ उडते? त्या मुलींना धड कपडे लत्ते नाहीत. त्या सारख्या आजारी पडतात. त्यांना शिक्षण कसं मिळणार? त्यांची लग्नं कशी होणार? त्यांना चांगले नवरे कसे मिळणार?'

'आणि एक बघा सासूबाई' डॉक्टर सून मधेच म्हणाली, 'तुमच्या भावाचीच हालत बघा, एक मुलगी झाली पाठोपाठ मुलगा झाला. तेव्हा आम्ही म्हणलो आता पुरे करा तर त्याला लोभ सुटला. आणखी एक मुलगा हवा म्हणाला. तर पाठोपाठ दोन मुली झाल्या. मग मुलगा. आता पाच पोरांचा प्रपंच वाढला. घर तेवढंच, जमीन तेवढीच खाणारी माणसं मात्र वाढत चालली. मग कसं पुरे पडणार? सगळ्या गावभर असंच झालय ना गेली अनेक वर्षे!'

तेवढ्यात ऐकत बसलेला म्हातारा म्हणाला, 'खरं बोललीस पोरी. अग तू पण पोरगीच की, शिकून सवरून शहाणी झालीस. म्हणून ज्ञानानं आम्हा म्हाताऱ्यांहून मोठी झालीस. धा अडाणी पोरांपेक्षा एक तुझ्यासारखी शहाणी पोरगी दोन्ही कुळाचं नाव वाढवती. आमच्या या आटपाट नगरात नुसतीच माणसं वाढली बघ. आमच्या लक्षातच आलं नाही. जमीन, पाणी होतं तेवढंच राहिलं. पृथ्वीमाता तेवढीच राहिली. आपण माणसांची संख्या वाढवली. खायला काळ आणि भुईला भार! आपणच हवा पाणी खराब केलं. येवढ्या सगळ्या माणसांना चांगलं अन्न-पाणी, हवा कशी मिळणार? कामधंदा तरी किती वाढवणार? गिरण्या कारखाने वाढवले की, धूळ धूर वाढणार कारखान्यातली दूषित औषधं जाऊन नद्या, ओढे, समुद्रसुद्धा आता घाणीने भरायला लागले? मग माणसं शरीराने आणि मनाने निरोगी तरी कशी रहाणार? कळतंय का म्हातारबाई मी काय म्हणतो ते!'

'कळतय् हो कळतय, एक नातू व्हायच्या मागे इतकं रामायण असेल, हे कधी लक्षातच आलं नव्हतं हो माझ्या. मला आपलं एवढंच माहीत होतं,

'लेकीची जात खायाची जायाची, लेकानं केली बोली काशीला न्यायाची'

'पण आई, मी नाही हं तुला काशीला न्यायची बोली करणार' डॉक्टर मुलगा म्हणाला.

'का रे बाबा?'

'अहो सासूबाई, त्या काशीच्या गंगेचं निर्मळ पाणीही लोकांनी इतकं घाण करून टाकलय की त्या पाण्यात बारा महिने पटकीचे रोगजंतू असतात. इतकी माणसं सगळीकडून येतात आणि तिथं आपल्या देहाची सगळी घाण आणून टाकतात.'

'होय का रे बाबा! मग आपल्या इथल्या नदीलाच मी गंगामाई म्हणून बुचकळून येईन बाबा. यवढी माणसं वाढणं म्हणजेच एक पाप झालय् म्हण की!'

'बरोब्बर बोललीस आई. केवळ मुलगा व्हावा, म्हणून माणसं केवढी संकटं ओढवून घेतात बघ. थेंबे थेंबे तळे साचे म्हणतात पण प्रत्येक घरात थोडी थोडी म्हणून गावातली आणि जगातली माणसं वाढून किती अनर्थ करतात बघ!'

'आणि सासूबाई, एकच गुणी मुलगी चार दुर्गुणी मुलांपेक्षा चांगली असं आपल्या सावित्रींच्या कथेतच नाही का सांगितलं?'

'होय ग सूनबाई विसरलीच होती बघ मी! यज्ञदेव सावित्रीच्या बापाला म्हणाला होता, 'बोल, तुला मुलगा हवा की मुलगी? मुलगी हवी असेल तर ती सुंदर, गुणाची होईल. मुलाची काही मी खात्री देत नाही. मग सावित्रीच्या बापानं गुणी मुलगीच पसंत केली आणि तिने आईबापाचं, सासू सासऱ्यांचं नवऱ्याचं सगळ्यांचं कल्याण केलं. ऐकली होती ती कहाणी मी!'

'ऐकलीस आणि विसरलीस ना! काय पण आमची म्हातारी! नुसती वट सावित्रीला भक्कम फराळ करून उपास करती आन् वडाला दोरं गुंडाळून गुंडाळून हैराण करती नुसती' म्हाताऱ्यानं चिडवलं

'म्हनलं एकदा, चुकलं माझं म्हणून! आता मला नातू नको आन् दुनियाभर नुसती माणसं वाढून वैताग नको'

'आगं, संतांनी म्हटलंच आहे की,

''लेकुरे उदंड झाली ।
ते तो लक्ष्मी निघोनी गेली ।।''

''म्हणून आटपाट नगराची ही सगळी दुर्दशा झाली'' म्हाताऱ्यानं पुन्हा पुस्ती जोडली.

मग म्हातारी इरेसरीनं म्हणाली,

'राहू द्या तुमचं माझी आई म्हणायची मला तेच मी आता म्हणते माझ्या नातीला,

- जुंदळ्यापरीस मी ग वाढविते तुरी ।
  लेकापरीस मला लेक बाई प्यारी ।।
- लुगड्याच्या घडीवर लुगड्याची चवड ।
  मला लेकीची आवड ।।
- ल्येकाचे नवस तुला केलेत लेकीबाई ।
  माझी मोगऱ्यामंदी जाई ।।

म्हातारी खुलली. एका हाती सून, एका हाती नात, दोघींना प्रेमानं गोंजारीत म्हणाली,

- ल्येकापरास ल्येक कशानं झाली उणी?
  एका कुशीची रत्नं दोन्ही ।।
- ल्येकीच्या आईला नका म्हनूसा हालकी ।
  ल्योकाच्या आईला कुनी दिलीया पालकी?

म्हातारीला जसं सुनेचं आणि लेकाचं म्हणणं पटलं, ती आणि तिचं कुटुंब जसं सुखी झालं, तसं शहाणपण तुम्हा आम्हाला येवो, ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

# उपरकी टीमटाम

झकपक कपडे आणि नट्टापट्टा करून कुणी बाहेर जायला निघावं पण कित्येक दिवसात नीट केस न धुतल्याने डोक्याचं प्राणीसंग्रहालय झालेले असावे किंवा दात नीट न घासल्याने दुर्गंधी येत असावी.

एखाद्या  गृहिणीने बैठकीची खोली आवरलेली असावी पण स्वयंपाकघर मेणचट असावे, मोरीला कित्येक दिवसात ब्रश न लावल्याने घसरडे होऊन शिवाय दुर्गंधी येत असावी, अशी कोणतीही परिस्थिती असली की आमची आजी फटकन म्हणायची, 'उपरकी टीमटाम अंदरकी राम जाने' मराठीबरोबरच हिंदी म्हणींचाही ती मारा करायची आणि मनातला आशय थेटपणे ऐकणारापर्यंत पोचवायची. सर्वंकष स्वच्छतेबाबत तिचा फार कटाक्ष असायचा. नुसती वरवरची स्वच्छता आणि देखावा पाहून ती फार अस्वस्थ व्हायची. राग यायचा तिला. एकवेळ कपडे फार भारी नसले तरी चालतील. अगदी फाटके असले तरी ते स्वच्छ असावेत.

अनेकदा बाहेरचे  दिखाऊ कपडे खूप फॅशनेबल, स्वच्छ असतात पण अंतर्वस्त्रे अत्यंत मेणचट आणि दुर्गंधीयुक्तही असतात. स्वच्छता ही जणू काही फक्त दाखवायची बाब आहे असा अनेकांचा समज असतो.

आमच्या एका स्नेह्यांकडे एक ड्रायव्हर होता. मोठा उत्साही , उमदा आणि अदबशीर असे. फारसा बोलायचा नाही. पण जेव्हा बोलायचा तेव्हा मोठा मार्मिक बोलायचा. एकदा प्रदीर्घ प्रवासात संस्कृती, संस्कार अशा विषयांवर स्वैर गप्पा

चालल्या होत्या. ड्रायव्हरला कुणीतरी डिवचले, 'तुम्हाला काय वाटते?' म्हणून विचारले,

तेव्हा तो शांतपणे म्हणाला, 'ज्या स्त्रीच्या पेटीकोटचे काठ आणि पुरुषाचे बनियन बाहेरच्या कपड्यांइतकेच स्वच्छ असतात ते लोक खरे सुसंस्कृत आहेत, असे मला वाटते. स्वच्छता हा संस्कार आहे.' आपली संस्कृती फार उदात्त आहे असे अनेकजण सांगतात परंतु संस्कृतीच्या अनेक अंगांपैकी स्वच्छता हे महत्त्वाचे अंग आहे, हे बऱ्याच वेळा लक्षातच घेतले जात नाही. घेतले तरी त्यात कमालीचा संकुचितपणा अनेकदा दिसतो.

म्हणजे आपल्यापुरती स्वच्छता आपण करीत असताना आपल्याखेरीजच्या परिसराबद्दल विलक्षण उदासीनता असते. आपल्या घरातला कचरा काढायचा पण तो घरासमोर किंवा बाजूलाच टाकून द्यायचा. आपले घर स्वच्छ करायचे पण दुसऱ्याच्या घरी बेपर्वाई करायची. आपली वैयक्तिक स्वच्छता आणि सार्वजनिक स्वच्छता याबाबत तर कमालीची विसंगती असते.

आपल्या रस्त्यावर आपण सहजच कागद, कचरा, फळांची साले, विड्यांची थोटके सर्वत्र फेकत असतो. एस.टी.स्टँडवर, रेल्वे स्टेशनवरचे फार काय रेल्वेच्या डब्यातही माणसे सहजच असा कचरा करतात. हातापलीकडे कचऱ्याचे कोंडाळे असले तरी केळ खाऊन साले पायाशीच टाकली जातात. तीच गोष्ट इतर खाद्यपदार्थांच्या कागदांची, प्लॅस्टिकच्या पिशव्यांची! स्टेशनवर दर पंधरावीस मिनिटांनी झाडू मारला तरी ढीगभर कचरा असतोच. ही प्रचंड बेपर्वाई आहे.

जिथे तिथे थुंकत राहणे, ही जणु आपल्या देशातल्या लोकांची श्वास घेण्याइतकी सहज सवय आहे. यात कुणाला गलिच्छपणा, असंस्कृतपणा वाटतच नाही. जणु सार्वजनिक ठिकाणी ही 'थुंक संस्कृतीच' ही मंडळी मिरवतात. तीच सवय तरुणांना, लहानांना लागते.

एस.टी. स्थानके, रेल्वे स्थानके, सार्वजनिक स्वच्छतागृहे यांचा नीट वापर करण्याचे भान तर नसतेच.

अशावेळी आपण परदेशातल्या स्वच्छतेचे आणि शिस्तीचे फार कौतुक करतो. खरे तर तेथे प्रत्येक नागरिक सार्वजनिक स्वच्छतेची काळजी घेतो. सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर, अन्य जागांचा वापर करण्याचे बाळकडू लहानपणापासूनच

रुजवले जाते. साधा चॉकलेटचा कागदही मुले वाटेल तिथे टाकत नाहीत. नीट कोंडाळ्यात टाकतात. ही राष्ट्रीय शिस्त असते. खऱ्या नागरिकाची जडण घडण तिथे होते.

आपल्याकडे तर मंदिरांचे परिसरही अत्यंत गलिच्छ असतात. यात आपण आपल्याच श्रद्धेचा अपमान करतो आहोत असे लोकांना का वाटत नाही? एक की दोन अनेक क्षेत्रात आपण मूलभूत नागरिक कर्तव्ये विसरतो.

अनेकदा आपण बाह्य, दिखाऊ, वरवरच्या बाबींकडे खूप लक्ष देतो. मग ते स्वत:चे अलंकार, कपडे असोत, घराची सजावट असो, बाहेरचे वागणे असो किंवा सहज बोलणे असो. मात्र मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष करतो. किंबहुना त्या कधी लक्षातच येत नाहीत.

पैसा, शिक्षण (पदव्या), पदे, राहणीमान, घरे, घरातल्या वस्तू, दागदागिने या सर्व वरवरच्या बाबी आहेत. या असल्या म्हणजे माणसे माणूस म्हणून मोठी असतातच असे नाही. ती संस्कारसंपन्न असतातच असेही नाही. माणसांच्या अंगभूत सवयी माणसाच्या सहज वागण्यातून व्यक्त होतात, मग ते वागणे घरातले, कामाच्या ठिकाणचे, सार्वजनिक ठिकाणचे कुठलेही असो. चांगली सवय हा स्वभाव बनणे महत्त्वाचे असते. हे जसे व्यक्तींचे, तसेच संस्थांचे, कुटुंबांचे जीवनाच्या सर्व क्षेत्राचे! पण सगळ्या संस्था शेवटी माणसांच्याच! माणसांनीच घडवलेल्या माणसांसाठी घडवलेल्या आणि माणसांसाठीच चालवलेल्या. माणसांचे समूह हे व्यक्तींचे समूह असतात. म्हणून अखेर आणि प्रथम व्यक्तींच्या सवयीतूनच समाजाच्या सवयी घडतात. अनेक ठिकाणी इमारती मोठ्या भव्य सुंदर असतात पण आतले व्यवस्थापन अत्यंत गचाळ, गैरशिस्त असते. अस्वच्छता तर जणु सार्वजनिक जीवनात पाचवीला पुजलेली.

वरवरचे देखावे एखाद्या समारंभासाठी केले जातात. पुन्हा ये रे माझ्या मागल्या. अशा प्रत्येक वेळी वाटते, 'उपरकी टीमटाम, अंदरकी राम जाने!'

# सासू-सून आणि सासरा-जावई

'काय करते आहेस सध्या?'

'कुठे काय? घरात वेळ चाललाय. दोन मुलींचं करण्यात. तशी थोडी मदत करतेय् मुलींच्या वडिलांना. त्यांची नवी फॅक्टरी उभी राहतेय ना! त्या बांधकामासंबंधीचा थोडा पत्रव्यवहार, थोडी देखरेख!'

'हे बरं झालं. दोघंही इंजिनियर आहात ते!'

'छे! मी कुठेय् इंजिनियर?'

'म्हणजे काय? मला वाटलं तू इंजिनियरिंगची पदवीधर आहेस ? मग कुठली पदवी आहे तुझी?'

'मी एल.एल.एम. आहे. लग्नाआधी तीन चार वर्षेप्रॅक्टिस केलीय् मुंबईला. पण आता माझी मीच विसरत चाललेय. सांगायचीसुद्धा लाज वाटते, मी कायद्याची पदवीधर आहे म्हणून!'

'मग या फॅक्टरीच्या कामात तुझ्या शिक्षणाचा उपयोग?'

'काऽऽही नाही. पत्रव्यवहार, देखरेख थोडी इतकंच!'

'पण हे तर कोणीही कारकून किंवा डिप्लोमा वगैरे घेतलेला माणूस करील?'

'हो ना! पण मी काय करू सध्या? मग घराच्या बाहेरच पडायला होत नाही. शिवाय नवऱ्यालाही थोडी मदत!'

'पण तू लॉ कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणूनही काम करू शकशील काही दिवस--मुली

मोठ्या होईपर्यंत. निदान तुझ्या विषयाशी तरी संबंध राहील'

'हे मला इथं सुचवलंच नाही हो कुणी? अगदी निराश व्हायला होतं कधी कधी'

या संवादात मध्येच मुलीचे सासरे म्हणाले, 'पण सध्या नवऱ्याला मदत करतेच आहे ना! त्याची फॅकटरी उभी राहणं महत्त्वाचं! त्याला घरातली मदत असली की बरं! तेवढाच त्याचा त्रास कमी होतो.'

'पण समजा, तिची प्रॅक्टिस चालू असती, तर तुमच्या मुलाने तिचा कारकून म्हणून मदतनीस म्हणून काम केलं असतं?'

'असं कसं होईल? इंजिनियर आहे तो! डिस्टिंक्शनमध्ये आलेला!' स्वरातली नाराजी चढ्या सुरात आली.

'मग तीही एलएल.एम. आहे. कायद्याची सर्वोच्च पदवी घेतली आहे तिने. मुंबईसारख्या ठिकाणी स्वतंत्र प्रॅक्टिस केलीय् तिनं!'

सुनेच्या चेहऱ्यावर जरा प्रसन्नता पाहून सासरेबुवांनी किंचित नरमाईचं धोरण स्वीकारीत म्हटलं, 'नाही. बरोबर आहे ते! करील ती पुढं मागं काहीतरी! पण सध्या त्याच्या फॅक्टरीचं बस्तान बसणं महत्त्वाचं!' आपला मुद्दा न सोडता सासरेबुवांनीच समारोप केला आणि उठून बैठकीत गेले. जेवण झाल्यावर सूनबाईही बाहेर गेल्या. मी स्वयंपाकघरातल्या बायकांची जेवणं होईतो आतच थांबले. बाहेर सासरेबुवा आणि सूनबाईच्या गप्पा सुरू होत्या. सासरेबुवा माझे जवळचे नातेवाईक! स्वत: बुद्धिमान, उदारमतवादी वकील. सून एलएल.एम. मिळाली म्हणून त्यांना मनापासून बरे वाटलेले होते. तरी बाहेर गेल्याबरोबर त्यांनी सूनबाईंच्या डोक्यात काही नव्या, वेगळ्या विचारांची गुंतवळ आली असली तर ती वेळीच झटकून टाकावी, म्हणून घाई गर्दीने सुनेला म्हणाले,

'तू काही ऐकू नकोस तिचं. सध्या तुझं चाललंय तेच ठीक आहे. सगळं घरही त्यामुळं डिस्टर्ब होईल. आता तुला घर सांभाळून त्याला मदत करता येतेय तेच चांगलं आहे.'

मी बाहेर आल्यावर म्हणाले, 'करील ती पुढे तिच्या क्षेत्रात काहीतरी. तशी जिद्दी आहे ती. पण सध्या आहे तेच ठीक आहे.' विषय तेवढ्यापुरता संपला.

आणखी एक प्रसंग कौटुंबिकच!

लहानपणापासून मुलीला नृत्याची, संगीताची आवड! म्हणून आई वडिलांनी हौसेने

मुलीला तज्ज्ञ मंडळींकडे शिक्षण दिलं. मुलीनंही जिद्दीनं मेहनत घेऊन त्यात नाव मिळवलं. स्पर्धांतून पारितोषिकं मिळवली. स्वतंत्र कार्यक्रम केले. मुलीची 'करियर' चालू ठेवण्याच्या अटीवरच तिचं लग्नही ठरलं. सासरी प्रॅक्टीस कशी चालू ठेवता येईल याबद्दल मुलगी आपल्या काही कल्पना सहज गप्पांच्या ओघात सांगू लागली. आईला चिंता वाटत होती. माहेरी निश्चिंतपणे जसा वेळ देता येत होता. तसा सासरी देता येईल की नाही? मुलीचे वडील अस्वस्थ होऊ लागले.

अखेर न राहवून बोलले–आवाज त्यांच्याही नकळत चिडलेला आणि थोडा चढाच लागला.

'हे बघ! गेल्याबरोबर काही नको ते नाच गाण्याचं बघायला. आधी नवऱ्याची मर्जी सांभाळ'

'म्हणजे काय करू? आणि माझी प्रॅक्टिस मध्येच थांबली तर पुढे जुळवून घ्यायला त्रास नाही का हो्णार?

'पण नडलंय् काय म्हणतो मी त्यावाचून?'

'पण बाबा, तुम्हीच आधी सांगितलं होतंत ना त्या लोकांना, माझी मुलगी तिची करीयर सोडणार नाही म्हणून.'

'ते तुझ्यासाठी आणि तुझ्या आईसाठी सांगावं लागलं मला. पण नवीन लग्न झाल्यावर मुलीनं आधी नवऱ्याला सांभाळायला हवं'

मी या प्रसंगाची फक्त मूक साक्षीदार!

आणखी एक प्रसंग. सार्वजनिक सभेचा! विषय स्त्रियांवरचे अन्याय अत्याचार वगैरे! एक उदारमतवादी, परिवर्तनवादी म्हणवणारे सद्गृहस्थ बोलत होते, 'स्त्रियांच्या स्वातंत्र्याला सगळ्यात मोठी आडकाठी त्यांच्याच जातीची आहे. सुनेला सासुरवास सासू करते. भावजयीला जाच नणंद करते. सासरी नम्रतेने वागावे म्हणून आई मुलीला सारखा उपदेश करीत असते. येथे पुरुषांचा प्रश्न येतोच कुठे?' आपण बिनतोड युक्तिवाद करतो आहोत, अशा विजयश्रीचे हास्य वक्त्यांच्या मुखावर तळपत होते.

मनात विचार येत होता. ज्या सासूला जन्मभर घरात मनासारखी भाजी आणायचंही स्वातंत्र्य नसते ती सासू घरातल्या पुरुषाच्या नवऱ्याच्या किंवा मुलाच्या सहकार्याशिवाय उत्तेजनाशिवाय सुनेला एकदम मारहाण करायचे, जाळायचे धाडस करणे शक्य आहे?

हेच सभेतले वक्ते गृहस्थ नंतर चहापाणी चालू असताना गप्पा मारीत होते. नगरपालिकेच्या निवडणुकांचे वातावरण होते. सद्गृहस्थ उभे राहिले होते. आपला आणि आपल्या पक्षाच्या राखीव स्त्री–वॉर्डातल्या स्त्री उमेदवाराच्या प्रचाराच्या निमित्ताने गप्पा निघाल्या.

मध्येच कोणीतरी विचारले, 'तुमच्या सौभाग्यवतींना का नाही उभे केलेत राखीव जागेसाठी? त्या तर महिला आघाडीची बरीच कामे करतात की!' गृहस्थ घाईगर्दीनं म्हणाले 'छे ! छे! निवडणुकीचे राजकारण हे बायकांचे काम नाही. महिला आघाडीचं ठीक आहे. फावल्या वेळात थोडी समाजसेवा करता येते,त्यांच्या त्या कामाचा उपयोग सध्या आमच्या प्रचारासाठी होतोच आहे ना!'

आपलं जाहीर सभेतले बोलणे आणि प्रत्यक्ष वागणे यात काही विसंगती आहे, हेही त्यांच्या लक्षात आले नाही. विसंगतीसुद्धा किती अंगवळणी पडते नाही?

या सगळ्या सुट्या प्रसंगांचा एकत्र विचार केला तर काही गंमतीशीर पण वस्तुत: गंभीर तथ्ये हाती येतात.

सासरी मुलीनं प्रथम आपल्या नवऱ्याची मर्जी सांभाळावी, घराची व्यवस्था सांभाळावी, आपल्या शिक्षणाचा उपयोग नवऱ्याच्या कामासाठी पूरक मदत म्हणून करावा, तसे शक्य नसेल तर आपली करीयर चालू ठेवण्याचा आग्रह तिने धरू नये ही मते मुलींच्या वडिलांची आणि सासऱ्यांची आहेत. मुलीच्या नवऱ्यांची ती तशी असतातच. मुलींच्या आया आणि सासवा वर्षानुवर्षे त्याच संस्कारात वडलेल्या असल्याने त्यांना तसे वाटत असले तर आश्चर्य नाही. पण अलीकडे शिक्षित मध्यमवर्गात तरी मुलींच्या आयाच मुलींची स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं विकासासाठी तुलनेने अधिक पाठिंबा देताना दिसतात. 'आपण घरातच अडकून पडलो आणि जन्मभर सगळ्यांना घाबरत राहून कोंडमारा सहन करीत राहिलो. ओढाताण सहन करीत राहिलो,' तसे आपल्या मुलींचे होऊ नये. अशी जाणीव असलेल्या मध्यमवर्गीय आयांची संख्या वाढते आहे. या आया आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या, स्वातंत्र्यप्राप्तीच्या आसपास जन्माला आलेल्या. पण त्यांच्याच आसपास जन्माला आलेल्या मुलींच्या वडिलांची मने आणि मते मात्र तेवढ्या प्रमाणात बदललेली दिसत नाहीत. त्यांना मुलींची काळजी नसते, प्रेम नसते असे मुळीच नाही. पण मुलीचे सुख म्हणजे तिच्या सासरी मिळणारी सुरक्षितता आणि संरक्षण! आणि ते मिळवण्यासाठी

मुलींनी नवऱ्याची, सासरच्या लोकांची मर्जी सांभाळूनच राहिले पाहिजे, ही वडील मंडळींची भूमिका दिसली.

अशाच गप्पांत एकदा माझे हे निरीक्षण मी नोंदवले तेव्हा आमचा एक तरुण मित्र उत्साहाने म्हणाला, ''म्हणजे बघा आम्ही म्हणतो, तेच खरे आहे की नाही? सासू सून यांचे खटके उडतात. पण सासरा आणि जावई हे मात्र एकमेकांची काळजीच घेतात. सासऱ्याला जावयाची काळजी जास्त वाटते. तशी सासूला सुनेची नाही वाटत. उलट त्या भांडतात. म्हणजे जास्त असहिष्णू कोण? बायका की पुरुष? बायका एकूणच संकुचित मनाच्या, असुया बाळगणाऱ्या, भांडणाऱ्या त्यांच्या स्वभावात उदारपणा आणि समंजसपणा तुम्हाला पुरुषांइतका आढळणार नाही'' हे ऐकताना वाटत राहिले, 'याच्या मुखातून मनुस्मृतीच बोलते आहे की?' तो बोलला हेही आपल्या समाजाच्या मनात घट्ट बसलेले समजच!

खरी गोष्ट आहे ती वेगळीच. सासऱ्याला जावयाचे हितसंबंध जतन करावेसे वाटतात, याची खरी कारणे वेगळीच दिसतात.

एक प्रामाणिक कारण म्हणजे मुलीची जबाबदारी आता त्याच्यावर सोपवली आहे. त्याचा पुन्हा आपल्याला त्रास होऊ नये त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब, म्हणजे जावई असो की, मुलगा त्यांचा 'अहं' जतन होणे म्हणजे पर्यायाने पुरुषी प्रवृत्तीचा 'अहं' जतन होणं होय! जर स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्रपणे महत्त्व दिले तर आपले वैशिष्ट्य ते काय राहिले? सावरकर जसे, एकदा सनातनी प्रवृत्तीबद्दल उपरोधाने म्हणाले होते की, ''मुलाने बापाच्या उणीवा दाखवल्या तर बापाचे बापपण ते काय राहिले?'' तसेच, मुलीने किंवा सुनेने घरात आपल्या नवऱ्यापेक्षा वेगळे, स्वतंत्र क्षेत्र निर्माण केले आणि आपल्या जीवनात आपल्या व्यक्तिमत्त्वाला अग्रक्रम दिला तर मग 'पुरुषाचे पुरुषपण ते काय राहिले?' पुरुष मग तो मुलगा असो की, जावई असो. त्याचे हितसंबंध ते आपले हितसंबंध! शिवाय हे सगळे सहन करणार आपली मुलगी किंवा सून, त्यात आपण सुरक्षित! तिचे दुरून कौतुक करू आपण फार तर!

ही प्रवृत्ती सर्वसाधारण शिक्षित, मध्यमवर्गीय पुरुषांची! सुरुवातीला दिलेले प्रसंग हे विशिष्ट–अपवादात्मक. प्रसंग नसून प्रातिनिधीक प्रसंग आहेत. मला सगळ्यात गंमत वाटली ती गेली तीस वर्षे भारताबाहेर, प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रात राहणाऱ्या, तिकडेच मुलींचे शिक्षण वगैरे केलेल्या एका सद्‌गृहस्थांची! मुलीचे लग्न झाले भारतीय, सजातीय

पण सध्या परदेशात निवास असलेल्या मुलाशी! त्याचे मूळ घर भारतातले अत्यंत सनातनी! मुलीच्या आईला वाटत राहिले ''माझ्या मुलीत काय कमी आहे, म्हणून तिने तडजोडी करीत राहाव्या?'' उलट मुलीच्या वडिलांची मते अगदी ठाम, सासरी राहताना मुलीने थोडी पड खायलाच हवी. नवऱ्याची, सासरच्या माणसांची मर्जी संपादन करायलाच हवी. सगळ्याच मुलींना ते करावे लागते. तुम्ही नसते वारे मुलीच्या डोक्यात भरवू नका. असा बायकोलाच दम देऊन गृहस्थ मोकळे! यांच्या प्रवृत्तीतूनही भारतीय मनुस्मृतीच बोलून गेली.

अशी असंख्य उदाहरणे आपल्या आसपास असतात. पण यातून काही बाबी जाणवतात, त्या या समाजमनाची उकल करण्याच्या दृष्टीनं महत्त्वाच्या वाटतात.

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या सुधारणेचे प्रयत्न काही थोड्या पुरुषवर्गाने केले. सरकारच्या कायद्यांनी त्यांना साथ दिली. खुद्द स्त्रियांच्या जाणीवा वाढत गेल्या. हा प्रवाह अगदी विसाव्या शतकाचा पूर्वार्ध संपेपर्यंत थोड्याफार फरकाने चालू होता. त्यानंतर स्त्रियाच अधिक नेटाने पुढे येऊ लागल्या. विशेषत: गेल्या दहा पंधरा वर्षात! प्रामाणिकपणे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उद्युक्त असणाऱ्या पुरुषांची संख्या आजही बोटावर मोजण्याइतपत आहे. उलट स्त्रियांचे आत्मभान जसजसे जागे होत आहे, तसतसे निरनिराळ्या नात्यांनी पुरुष धास्तावत आहेत की, काय असे वाटावे, अशी परिस्थिती आहे. नेहमी मुलीचे सासर आणि त्यात फार तर नवरा हा आडकाठी करणारा प्राणी चित्रित केला जातो. मुलीची सासू तर खलनायिका म्हणूनच प्रसिद्ध आहे. पण वरवरचे मुलामे खरवडून पहायला लागले की मुलींचे वडील, भाऊ, सासरे, दीर या मंडळींचाच मुलींची अडवणूक करण्यात पुढाकार असल्याचे दिसते. अनेकदा तीर घरातील मोठ्या स्त्रियांच्या पदराआडून मारले जातात.

सुरुवातीच्या प्रसंगात आमच्या तरुण मित्राच्या मताचा उल्लेख केला आहे. त्याचा परामर्श घेणे आवश्यक आहे. सासू सुनांमध्ये द्वंद्व असते, सासरे जावई मात्र एकमेकांचे हितकर्ते असतात हा त्याचा अभिप्राय. वर वर पाहता हे असे दिसते. जावयाचा 'अहं' जतन होणे म्हणजे आपोआप पुरुष जमातीचा 'अहं' जतन होणे, म्हणून सासरेबुवांचा हा उदारपणा! त्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात.

उलट सासू सून संबंधात दोघींच्या नाड्या घरातल्या कर्त्या पुरुषांच्या हाती असतात. त्यांची मर्जी सांभाळणं म्हणजे आपले स्थान सुरक्षित ठेवणे. दोघी

'बाहेरून' या घरात आलेल्या. उभ्या आयुष्याच्या कष्टाचे शिंपण करून सासूनं पन्नाशीच्या आसपास जरा कुठे आपली मुळे घरात रुजवलेली असतात. त्यातही स्वयंपाकघरापुरतीच! ते तिचे साम्राज्य! म्हणून स्वयंपाकघरात राब राब राबून सगळ्यांच्या जिभांचे चोचले पुरवीत, सकाळ संध्याकाळ ताजे गरम पदार्थ करून खायला घालीत. प्रथम सासू सासरे, दीर, नवरा आणि मग मुलगा यांची मर्जी सांभाळीत राहायचे त्यांचा कृपाप्रसाद झाला की स्वत:ला धन्य धन्य मानायचे. त्यांची अवकृपा झाली की, घरातले स्थान संपले. स्वाभाविकच तिचे हितसंबंध घरातल्या राबणुकीशी संबंधित! हे सगळे स्थिरस्थावर होत असते आणि थोडी उसंत मिळते अशातच सून येते. पुन्हा तीही 'बाहेरची' तिलाही मुळे इथेच रुजवायची आहेत. तो मार्ग पुन्हा स्वयंपाकघरातूनच जातो, तिथे तर एक सत्ता आधीच स्थिर झाली आहे. सासऱ्याची, नवऱ्याची मर्जी संपादन करायची तर स्वयंपाकघर सासूच्या ताब्यात. दोघींचे हितसंबंध तिथेच गुंतलेले असतात. त्यातून संघर्षाला तोंड फुटते.

सासरा आणि जावई त्यांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी एकाच सत्तास्थानावर अवलंबून राहायचे नसते. जर सासरा आणि जावई, सासू सुनांसारखे कायमचे एकत्र राहणार असतील तर त्यांच्यातही संघर्ष झाल्याशिवाय राहणार नाहीत आणि दोघांपैकी कोणातरी एकाला पडती बाजू घेऊन आपले अस्तित्व टिकवावे लागेल. विशेषत: सासू सुनांना जसे भौतिक गरजांपुरते अस्तित्व टिकवण्यासाठीसुद्धा एकाच केंद्रावर अवलंबून रहावे लागले, तसे सासरा जावयाला रहावे लागले तर संघर्ष, कुचंबणा अटळ आहे. थोडक्यात म्हणजे दोघांचे उपजीविकेचे साधन एकच असेल तर त्यात नव्याने भागीदार होणारा जावई सासऱ्याला आपला प्रतिद्वंद्वी वाटल्याखेरीज राहणार नाही. अशा स्थितीत जावयाचे कौतुक सासुरवाडीला होणे कठीण आहे. म्हणून तर पुरुषांना घरजावई होणे नको असते, त्यात त्यांना कमीपणा वाटतो. घरजावई होणे म्हणजे परतंत्र होणे.

माहेरचे सगळे बंध सोडून येणाऱ्या मुलीला सासरी नवऱ्याचा आधार सगळ्यात जवळचा, महत्त्वाचा वाटतो. त्याच्या मर्जीमुळे तिची या नव्या अनोळखी जागी रुजवण व्हायची असते. दुसरीकडे, सासूलाही तेच वाटते. पुढच्या काळात मुलगा घराचा कारभारी होणार असतो. त्याची मर्जी संपादणे तिला महत्त्वाचे वाटते. दोघी त्या एका पुरुषावर निरनिराळ्या नात्यांनी स्वामित्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतात.

स्वाभाविकच दोघी त्याचे आपापल्यापरीने लाड करतात त्यात त्याचा 'अहं' विलक्षण सुखावतो. त्याचा त्यात फायदाच असतो. म्हणून तो सहसा कोणाला दुखवीत नाही. त्या दोघींनाही त्याचे दोष दिसत नाहीत. उलट एकमेकींचे दोष काढीत त्या झगडत राहतात, दिसायला दिसते की, सासू सुना भांडतात. खरे तर दोघीही संभाव्य असुरक्षिततेच्या भयाने सत्तास्थान (खरे तर आश्रयस्थान) हातून जाण्याच्या भयाने ग्रस्त असतात. एका अनामिक भयाच्या दडपणाखाली असतात. सासवा तर फारच भयग्रस्त असतात. कारण मुलगा तरुण सुनेच्या आहारी जाण्याची शक्यता जास्त असते. अशा भयग्रस्त अवस्थेत सुरक्षिततेसाठी कोणीही आक्रमक होते. आणि त्याचवेळी ज्याच्या हाती सुरक्षितता आहे असे वाटते, त्या पुरुषाचा परोपरीने अनुनय करीत राहते. यात कधी कधी संवेदनशील पुरुषाचीही फरपट होते. सासू आणि सून या दोघींना त्यांच्या सर्व पातळ्यांवर प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेचे आश्वासन घरात मिळेल असे वाटले तर संघर्ष अर्थातच कमी होईल आणि हे आश्वासन देण्याचे काम आहे, घरातल्या कर्त्या (म्हणवणाऱ्या) पुरुषांचे! सासू सुनांच्या झगड्याबद्दल तुच्छता आणि उपेक्षा बाळगून चालणार नाही.

सरळ सासरी मुलीने कसे वागावे, याचे बाळकडू मुलीला लहानपणापासून पाजले जाते. तिला 'वळण' लावण्याचा घरादाराने अगदी चंग बांधलेला असतो. तिची कर्तव्ये तिला पुन: पुन्हा शिकवली जातात. परंतु आपल्या कुटुंबव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत पुरुषाला मात्र पुरुष म्हणून कधी 'कर्तव्य' शिकवले जात नाही. उलट, पुरुष म्हणून जन्माला येणे हेच मोठे कर्तृत्व असल्याने बेपर्वाई, खोटा अहंकार या मस्तीतच तो असतो. माणूस म्हणून घरातल्या सर्व व्यक्तींना सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि सन्मान मिळेल असे वातावरण घरात ठेवण्याची त्याची जबाबदारी त्याला कधीच कोणीच सांगत नाही. ज्याच्या त्याच्या वृत्ती प्रवृत्तीनुसार तो सद्गुण उचलतो. एरव्ही त्याची बेपर्वाई आणि त्यामुळे गृहिणीला आलेला वैताग ''बायकांचा आक्रस्ताळेपणा'' म्हणून # वर्षानुवर्षे त्याची वासलात लावली जाते,. खरे तर सासू सूनसंबंध सुरळीत राखण्याची सर्वात मोठी जबाबदारी घरातल्या पुरुषांची आहे. ज्येष्ठ आणि तरुण दोन्ही पुरुषांची! पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषांना त्यांच्यावरच्या या जबाबदारीचे कधी कोणी भानच आणून देत नाही. जन्मभर खूप सोसूनही अखेर सगळ्या दोषांचे खापर कुटुंबातल्या स्त्रियांवरच फोडले जाते. कधी सासू म्हणून तर कधी सून म्हणून. कारण कोणाची तरी

मर्जी सांभाळतच जगायचे असते हे तिला पिढ्यान्‌पिढ्या शिकवले आहे. तिचे परावलंबीपणच तिची नियती ठरते. त्यासाठी निरनिराळ्या नात्यांनी तिने पुरुषाची मनधरणी करावी ही अपेक्षा असते. अन्न वस्त्रादी सुरक्षितता आणि मानसिक प्रतिष्ठा दोन्हीही पराभूतच! एका 'मिळून साऱ्याजणी' मासिकाने दिवाळी अंकात 'मी सासरी जातो' वर पुरुषांना लिहिते केले होते. पण अनेकांना त्याचा नेमका आशयच आकलन झाला नाही. बहुतेकजण पठडीबद्ध पुरुषी 'अहं' ने ग्रस्त आहेत. 'सासरी जाणे' याचा अर्थ मागचे सर्व बंध तोडणे. सासरी जाणे याचा अर्थ अर्थोत्पादनाचे स्वामित्व सासरच्यांच्या हाती असणे आणि सासऱ्याच्या मर्जीने ते व्यवहार पाहणे, स्वतःचे स्थान नव्याने निर्माण करणे, अशा वेळी बायको हाच एक जवळचा आधार असणार आहे. तिच्या आई वडिलांचे स्वामित्व असलेल्या घरात आपल्यासाठी एक सुरक्षित आणि प्रतिष्ठेचे स्थान निर्माण करायचे आहे. तेव्हा अर्थातच प्रथम तिची मर्जी संपादन करणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे आपल्या अस्तित्वाची सगळी पाळेमुळे उखडून दुसऱ्या घरात येणे, तेथे आपली उपयुक्तता सिद्ध करणे, एकच हितसंबंध ज्यात गुंतले आहेत, त्या उद्योग व्यवसायात सासरेबुवांचा अहंकार न दुखावता, शिरकाव करून घेणे, हे सगळे सगळे अभिप्रेत आहे. जावई दोन दिवस पाहुणा म्हणून सासुरवाडीला गेला तर त्याचे कोडकौतुक होते  कायमचा गेला तर उपेक्षाच वाटणीला येते, हे लोकपरंपरेतल्या एका कथेतल्या जावयाला उमगलेले सत्य विसाव्या शतकातल्या जावयाला उमगू नये ही त्याच्या आकलनाची मर्यादा किती कोती आहे, याचीच द्योतक आहे, 'सासरी येणे' म्हणजे सासरा आणि जावई या दोघा परक्या पुरुषांनी एका घरात येऊन आपले हितसंबंध सांभाळणे, जेव्हा असे होते तेव्हा सासरा जावयाचे कौतुक करीत नाही. त्याच्याशी सुप्त वैर करतो. सासू सुनेसारखेच!

एकूणच सासू सून संबंधांचा विचार विश्लेषण आपण खूप वरवर आणि एकतर्फी करीत आलो आहोत आजवर! त्याचा व्यत्यास म्हणून आहे याच कौटुंबिक, सामाजिक परिस्थितीत पुरुषाला 'स्त्रीसारखे' सासरी जावे लागले तर काय होईल? याचे एक कल्पनाचित्र रंगवावे. मातृसत्ताप्रधान व्यवस्थेतला जावई सासरी नमूनच वागतो सुनेसारखा, हाही अनुभव आहेच. मग तसे करायचे का?

कालचक्राची गती उलटी पाठीमागे फिरत नसते. अशावेळी खरे तर लग्न झाल्याबरोबर मुलगी किंवा मुलगा कोणीच कोणाच्या घरी जाऊ नये. दोघांनी मिळून

त्यांच्या स्वत:च्या घरी जावे.

अशा वेळी सुधारलेले म्हणवणाऱ्यांपेक्षा एका आदिम जमातीची पद्धती अधिक सुसंस्कृत आणि निरामय वाटते. लग्न झाल्यावर पहिल्याच रात्रीसाठी नवरा नवरी त्यांच्यासाठी स्वतंत्र बांधलेल्या झोपडीत जातात आणि आपल्या सहजीवनाचा शुभारंभ करतात. दोघेही कष्ट करून उपजीविका करतात आणि एकमेकांची संगत नकोशी झाली तर आकस किंवा शरम न बाळगता, समंजसपणे वेगळी होतात. तरी आम्ही त्यांना 'आदिम' असंस्कृत म्हणणार आणि स्वत:ला सुसंस्कृत वगैरे म्हणजे गंमतच आहे.

# श्यामची आई...आजही आदर्श?

''काहीच कळत नाही बाई. प्रत्येकानं सांगितलं की आजच्या आयांनी साने गुरुजींच्या 'श्यामची आई' चा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि आपल्या मुलांना वळण लावावं. पण म्हणजे नेमकं काय करणार? आताची मुलं काय सरळपणाने ऐकणारी आहेत का?'' एक तरुण आई बिचारी मनापासून विचारीत होती.

नुकतीच साने गुरुजींची जन्मशताब्दि संपली होती. वर्षभराच्या विविध कार्यक्रमातून गुरुजींची 'श्यामची आई' चर्चेत आली नाही, असा कार्यक्रम सापडणे कठीण! विशेषत: सर्व आयांच्यापुढे 'श्यामची आई'चे आदर्श मॉडेल आई म्हणून मांडले गेले.

आजच्या संदर्भात शंभर वर्षापूर्वीच्या 'श्यामच्या आई'चा आदर्श कितपत सुसंगत आहे? 'श्यामची आई' या पुस्तकातली केवळ 'आई' सुटी काढून कसे चालेल? सगळ्या पुस्तकाची चिकित्सा करायची झाली तर कोण कोणते 'आदर्श' समोर येतील? त्यातले काय सोडावे लागेल? भूतकाळासंबंधीचे भाबडेपण बाजूला ठेवले तर 'श्यामची आई' आज किती उपयुक्त ठरते?

आजच्या आईला जितक्या आघाड्यांना तोंड द्यावे लागते, तेवढ्या आघाड्यांना श्यामची आई जशी आहे, तशी कितपत पुरे पडू शकली असती? तिच्या कुटुंबातील मुले, पती ही मंडळी ज्या प्रकारची संवेदनशीलता बाळगून आहेत, त्यामुळे तिच्या कर्तृत्वाला उजाळा मिळतो की नाही? ती संवेदनशीलता कुटुंबियांकडे नसेल तेव्हा त्या बाईने काय करायचे?

भाजीत मीठ घालायचे राहिले तरी त्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष कोणतेही लक्षण न दाखवता सहज स्वाभाविकपणे ती भाजी खाणारे श्यामचे वडील आहेत. वडील बोलत नाहीत, म्हणून आपणही न बोलणारी मुले आहोत. दिवसभर घरकामाचे कष्ट उपसणाऱ्या पत्नीच्या गृहीणीच्या मनाचा आदर करणारा पती, कुटुंबप्रमुख म्हणून श्यामचे वडील मुलांसमोर एक आदर्श ठेवतात. खरे तर 'अळणी भाजी'ची घटना ही पुरुषांना बोध करणारी कथा आहे. असे पुरुष कुटुंबात नसतील तर त्या स्त्रीला किती त्रास होत असेल? 'श्यामची आई' घरात हवी असते तेव्हा सुसंस्कृत संवेदनशील असे 'श्यामचे वडील'ही असावे लागतात.

आईने मुलांना घडवले, वळण लावले म्हणून गुरुजी आणि यांची भावंडे कृतज्ञ आहेत. कृतज्ञता हे खरोखर एक श्रेष्ठ मूल्य आहे. पण घडवले म्हणजे त्या आईने नेमके काय केले? आजच्या आया या मुलांना ठाकून ठोकून घडवण्यासाठी कितीतरी कष्ट घेत असतात. पण त्यांच्या घरात काही लोकोत्तर श्याम घडत नाही. फार तर डॉक्टर, इंजिनिअर घडून बऱ्यापैकी पैसे मिळवून चारचौघांसारखे प्रापंचिक होतात. फार तर अमेरिकेत बस्तान ठोकतात. यात ज्याची त्याची सोय असते. त्यात आक्षेप घेण्यासारखे काही नाही. प्रश्न असा आहे की मुले 'घडवण्यासाठी' श्यामची आई आम्हाला नेमके कुठे मार्गदर्शन करते?

मुलांना घडवण्यात त्यांच्याशी प्रेमाने वागणे ही जशी एक बाजू आहे तशी... किंबहुना त्यापेक्षा महत्त्वाची बाजू आहे प्रसंगपरत्वे कठोरपणे वागण्याची कठोरपणे वागत असतानाही मुलांच्या मनातल्या आईविषयीच्या विश्वासाला धक्का लागणार नाही, याची खबरदारी घेण्याची. ही एक तारेवरची कसरत आहे. अन्यथा आईच्या कठोरपणाने वागण्याचा उलट परिणाम होऊन मुले सुधारण्याऐवजी बिघडण्याचीच शक्यता जास्त बहुधा हल्लीच्या आयांना तीच भीती वाटते आणि त्या मुलांना भिऊनच लाडाचा अतिरेक करतात की काय, असे वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण होते.

आजचे आईवडील मुलांना सगळ्या वस्तू त्यांनी तोंडातून शब्द काढताच समोर हजर करतात. त्यांच्या अभ्यासासाठी तर आयाच जिवाचं रान करतात. त्यांना अजिबात कष्ट पडू देत नाहीत.मुलांचा अभ्यास तर लहानपणी आयांनीच करायचा (घ्यायचा नाही) असतो की काय असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती बहुतेक घरात असते. क्लास हे प्रकरण तर माझ्या पिढीच्या समजशक्तीच्या बाहेर आहे. १०वी, १२वीत पाल्य असेल तर घरात अत्यंत गंभीर वातावरण असते. एरव्हीही मुलांचा 'सर्वांगीण विकास' करण्यासाठी आया नाना गोष्टींचे क्लास लावीत असतात आणि मुलांच्या भोवती नाचत असतात. मुलांनी फक्त करीयर करावी, 'व्यक्तिमत्त्व विकास'

करावा याबाबतच्या पुस्तकी कल्पनेने आई वडील, त्यात जास्त करून आयाच इतक्या झपाटलेल्या असतात की विचारता सोय नाही.

त्यामुळे घरात आपण म्हणजे कोणी 'विशेष' आहोत हा 'अहं' नकळत मुलांमध्ये पोसला जातो. इतका की, ती मुलं, मुली लहानपणीच नितान्त अहंकेंद्री होतात आणि मग एखादेवेळी त्यांच्याशी कठोर वागण्याचा प्रसंग आलाच तर पालकच साशंक होतात. मुलांना ते कठोरपण सहन करता येईल की नाही? त्या मागचा सद्हेतू मुलं समजून घेतील की नाही? याबद्दल पालकच डळमळीत असतात.

येथे 'श्यामची आई' मार्गदर्शक ठरते. सर्व मुलांबरोबर पोहण्यासाठी न जाणाऱ्या श्यामला आईच अडगळीतून शोधून काढते आणि पाण्याला भिऊन पोहणे टाळणाऱ्या श्यामला ती अक्षरश: छडीने बडवून काढते. श्याम पोहायला जातो जाणे भागच असते. मुले त्याला यथेच्छ पाण्यात बुडवतात. त्याची पाण्याची भीती बुजवतात.

आणि मग रात्री झोपताना तीच आई हळुवारपणे श्यामच्या अंगावरच्या छडीच्या वळांवर आंबेहळद लावताना माराचे कारणही सांगते. श्याम भित्रा होऊ नये. भय घालवण्याचा रोकडा मार्ग एकच. ज्याचे भय वाटते, त्या प्रसंगाला सरळ सामोरे जायचे. श्यामची आई त्यासाठी कठोर होते. भविष्यातल्या दूरवरच्या भल्यासाठी आज कठोर होणे भाग आहे, हे भान सुजाण आईला वडिलांना असावे लागते. आज एकदा भयापोटी पाठीशी घातले तर मूल शरीर मनाने दुबळेच होणार! पुस्तकी शहाणपणाबरोबरच शरीर मानसिक शक्तींनिशी अनेक अनुभवांना सामोरे जाण्याची सवय मुलांना वेळीच लावायला हवी, याचाच अनेकदा विसर पडतो आणि कधी कधी वाजवीपेक्षा जास्त सुरक्षा कोशाचा कोट पालक मुलांभोवती उभारतात असे वाटते.

मुलांना मग लहान सहान नकार पचवणेही कठीण जाते. आयुष्यात यशाबरोबर अपयशही येत असते. सतत स्पर्धात्मक वातावरणात अनेकदा मुलांची कुवत नसतानाही केवळ आकांक्षा जागवल्या जातात आणि त्या आकांक्षा पूर्ण करण्याची कुवतच निर्माण केली जात नाही. अनेकदा ती मुळातच नसते, त्या वास्तवाचेही भान आणून दिले जात नाही. मग लहानसहान नकार पचवता न आल्याने एक तर मुले घुमी तरी होतात किंवा उग्र आक्रमक होऊन आपण सगळ्यांच्या डोळ्यात भरायचा, अहं तृप्तीचा सोपा मार्ग शोधून काढतात. त्यातून हिंसाचारी तरुण निर्माण होण्याची शक्यता असते.

लहानपणीच्या चुकांवर, अपराधावर पांघरुण घालता घालता मुलगा हाताबाहेर जाऊन चोर दरोडेखोर बनला आणि त्याला तुरुंगवासाची शिक्षा होताच मायेच्या ओढीने त्याला भेटायला जेव्हा आई गेली तेव्हा मिठी मारणाऱ्या आईच्या कानाचा चावा

घेऊन मुलगा म्हणाला, 'आता कशाला रडतेस? जेव्हा मी पहिला अपराध केला तेव्हाच तू मला कठोर शिक्षा का केली नाहीस?' ही गोष्ट बहुधा सर्वांना माहीत असते. ही कथा बालकांसाठी नसून पालकांसाठी बोधकथा आहे, याचे वेळीच भान बाळगले तर 'या (चांगल्या–सुसंस्कृत वगैरे(?) घरात असं झालंच कसं?' हा शोकान्ताकडे नेणारा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता कमी होईल. 'श्यामची आई' पेक्षा आजच्या आईसमोरची आव्हाने खूप मोठी आहेत. मुलांच्या भोवती माहितीचे महाजाल पसरलेले आहे. ते वाढतच जाणार आहे. त्यांच्यापुढे आई वडीलच अनेकदा लहान ठरतात आणि गोंधळून जातात. तेही स्वाभाविक आहे.

श्यामची आई निर्माण करणारे साने गुरुजी यांचे संमग्र व्यक्तिमत्त्व आईपणाचा पुनर्विचार करायला लावणारे व्यक्तिमत्त्व आहे.

प्रत्यक्ष मुलाला जन्म देणे म्हणजेच आई होणे असते का? साने गुरुजींचे व्यक्तिमत्त्व सांगते की 'मुळीच नाही'. आई होण्यासाठी मूल जन्माला घालण्याची गरज नाहीच पण शरीराने बाई असण्याचीही गरज नाही. खुद्द साने गुरुजीच आपल्या अमळनेरच्या वसतिगृहातील मुलांची प्रेमळ आई नव्हते का? मुलांची सेवा सुश्रूशा करून त्यांना भाकरी करून खाऊ घालण्याचे आईचे काम ते जितक्या तळमळीने करीत होते, तितक्याच तळमळीने मुलांना शालेय शिक्षण देण्याचे गुरू म्हणूनही काम करीत होते. जीवनातल्या उघड्या अनुभवांना थेट सामोरे जाण्यासाठीचे धाडस मुलांमध्ये निर्माण करून वडिलांचीही भूमिका पार पाडीत होते. साने गुरुजी स्वत: एकाच वेळी आई, वडील, गुरु तिन्ही भूमिका समर्थपणे निभावीत होते.

नर नारींचे देह भिन्न असले तरी मनोधारणा भिन्न असतातच असे नव्हे. पुरुषाचा कठोरपणा हा गुण समजला जातो पण तो श्यामची आई अमलात आणते आणि वात्सल्य, हळुवारपणा हे बाईचे गुण समजले जातात ते गुरुजींसारख्या पुरुषामध्ये असतात. किंबहुना नरामध्ये नारीगुण आणि नारीमध्ये नराचे गुण असण्यातच व्यक्तिमत्वाची समृद्धी आहे हेच साने गुरुजी आणि त्यांची श्यामची आई आम्हाला सांगते.

त्या वर्षभरातल्या शताब्दी कार्यक्रमाच्या निमित्ताने देवरूखच्या मातृमंदिरात श्यामची आई वरच्या एका चर्चेच्या निमित्ताने जावे लागते. 'आई' असणे म्हणजे काय? अशी चर्चा चालू असताना त्या आश्रमात लहानाची मोठी झालेली एक मुलगी जेव्हा आईपणाचे रहस्य सांगू लागली तेव्हा तिची प्रगल्भता पाहून कौतुक वाटले. ती म्हणाली, 'आम्हाला जन्म देणारी कोणीतरी आई असणारच. पण मला मात्र लहानपणापासून या आश्रमानेच आईची माया दिली, आश्रय दिला. जगण्यासाठी विश्वास दिला आणि

आत्मीयताही दिली. आईने जे जे द्यायचे ते आश्रमाने दिले. त्यामुळे  हे आश्रमच समाजात मोठ्या आईचे काम करतात.

आपले आईपण किती मोठे करायचे की देहाने अपत्य जन्माला घालण्याइतकेच संकुचित ठेवायचे? याचा निवाडा ज्या त्या व्यक्तीच्या मानसिक प्रगल्भतेशी निगडीत आहे. साने गुरूजींचे व्यक्तिमत्व ही प्रगल्भता विकसित करण्याचा आदर्श समोर ठेवते.

नराला नारीपण मिळणे हा अनमान नव्हे तर सन्मान आहे याचे भान आणवून देते. नारीपणाची प्रेम करण्याची प्रतिपाल करण्याची, माणसे फुलविण्याची असीम शक्ती म्हणजे आई होणे. म्हणून तर पुरुषदेही असूनही गुरु 'माऊली' होते. ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर 'माऊली' होतो, फार काय पंढरीचा राणाही विठोबा 'माऊली' होतो तेव्हाच भक्ताच्या मनाला शांती, समाधान मिळते. सानेगुरुजी आणि श्यामची आई आम्हाला असे प्रगल्भ करतात.

# आपली वाट आपणच शोधू

''ऐकतच नाही बाई कुणी! किती समजून सांगितलं तरी प्रौढ शिक्षणाच्या वर्गाला बायका येतच नाहीत.''

''मुळीच येत नाहीत?''

''तसं नाही. मधून अधून येतात पण नियमितपणे येत नाहीत. आज चारजणी येतात, त्या उद्या येत नाहीत. उद्या दुसऱ्याच चारजणी येतात त्यामुळे सलग काही शिकवताच येत नाही.''

''काही नाही. या बायकांना शिकायलाच नको असतं.''

प्रौढ शिक्षणाचं काम सुरवातीला हौसेने अंगावर घेतलेल्या महाविद्यालयातल्या मुली आता महिन्याभरातच निराश होऊन तक्रारी करायला लागल्या होत्या. त्यांचा अनुभव त्या बोलून दाखवीत होत्या हे खरंच! पण मग दुसरी बाजूही समजून घ्यायला हवी होती. तशी संधी लौकरच आली.

ग्रामीण महिलांच्या एका मेळाव्याला गेले होते. कार्यक्रमाला वेळ होता. बायका पोरांना घेऊन कधीच्या ताटकळत बसल्या होत्या. पोरांचा कालवा चालला होता. बायकाही गप्प थोड्याच बसणार? मीही त्यांच्यातलीच एक होऊन गप्पात सामील झाले. मधून अधून प्रश्न विचारून त्यांचं मन चाचपडून पहात होते. मुली म्हणतात. तसं या बायकांना शिकायलाच नको होतं की काय? प्रथम बिचकत आणि मग हळू हळू सगळ्याच मोकळेपणाने बोलायला लागल्या.

''आता या वयात शिकून काय करायचं बाई? आई बापानं लहानपणी शाळेत नाही घातलं आता प्रपंच मागं लागला'' एकजण म्हणाली.

''म्हणून काय झालं? तेव्हा जे मिळालं नाही, ते आता मिळतं म्हणून आपण घेतोच की नाही? आपल्या लहानपणी टी.व्ही नव्हता. आता मिळाला तो आपण पाहतोच की नाही? त्यावेळी नायलॉनची, टेरीकॉयची कापडं मिळत नव्हती. आता मिळतात. मग आपण वापरतोच की नाही? तसंच हे शिक्षणाचं म्हणायचं. तेव्हा मिळालं नाही हे खरं पण आता तरी मिळतय ना! मग ते का नाही घ्यायचं?'' परस्परच कुणीतरी बिनतोड युक्तिवाद केला होता.

''तू म्हणतीयस ते खरं ग! पण दिवसभरच्या कामाच्या रामरगाड्यात उसंत तरी कुठं मिळती?''

''तसं कां? आत्ता नाही का आपण आलो? दिवसभराची कामं उरकून रात्रीची जेवणंखाणं करून आलोच ना! तसंच यायचं!''

''तुझं बरंय ग अजून! दोघंच्या दोघं आहात इथं. त्यात तुझा नवरा नोकरदार. तुला कुठं आमच्यासारखं बाहेर रानात कामाला जायला लागतंय! परत घरात सासू सासरे म्हातारे, दिर–जाऊ, नंदेची आवक जावक चालू, स्वत:ची दोन कच्ची बच्ची परत! पाणी किती लांबून वहायला लागतय! शेण गवऱ्यांचा बंदोबस्त करायला लागतोय. चांदणी मावळायआधी उठावं तर राती चंद्र डोईवर चढला तरी काम उरकत नाहीत. आन् दिवसभर इतका उठारेठा झाला की हात पाय पार गळून जातात बघ. डोळ्यावर झोप साचून येती. येवढा वेळ पाटी घेऊन इथं बसावं तेवढाच देहाला विसावा. येवढा जरा विसावा मिळावायपेक्षा वाटतं लौकर आडवं होता आलं तर बरं! कमरेची कळ तरी मोडेल.'

तिचं म्हणणं शंभर टक्के खरं होतं. ग्रामीण काय अन् शहरी काय? कोणत्याही भागातल्या बायकांची परिस्थिती एकच असते. सकाळपासून रात्रीपर्यंत एकच असते. सकाळपासून रात्रीपर्यंत इतक्या प्रकारची कामे ओढावी लागतात ना की जरा स्वस्थ वाटले की डोळे आपोआप पेंगायला लागतात. अगदी शहरात नोकऱ्या करणाऱ्या आम्हा बायकांचे अनुभवही यापेक्षा वेगळे नाहीत. शहरातल्या बाईला खेड्यातल्या बाईपेक्षा थोड्या जास्त सोयी आहेत. खऱ्या, पण तिच्या घरातल्या नोकरी धंदा करणाऱ्या पुरुषांपेक्षा कमीच!

नळाला पाणी वेळेवर आले नाही तर धावपळ बाईनेच करायची. गॅस रॉकेल वेळेवर मिळाले नाही तर बाईचेच हाल! फार काय जेमतेम घरात भरलेलं पाणी असेल तर पुरुष माणसं धडाधडा आंघोळी करून संपवून टाकणार. बाईनं स्वत:साठी पाण्यातही काटकसर करायची. खाण्या पिण्यात तर काटकसर चालूच असते. हा सगळा अनुभव माझ्या मनात एका क्षणात गोळा झाला आणि त्या प्रौढ साक्षरता वर्गातल्या बाईशी माझं आतड्याचंच नातं जुळून गेलं एकदम! म्हटलं, ''खरं आहे मावशी तुमचं! दिवसभर एवढं काम ओढल्यावर जीव दमणारच!''

''तर हो ताई! आमचा काय जीव आहे का जिवडा?''

''पण मग काय शिकायचंच नाही?''

''त्यापेक्षा ताई दुसरीच वाट शोधली तर?'' त्यांच्यातलीच मघाची चुणचुणीत तरूण बाई बोलली. माझ्या उत्तराची अपेक्षा न करता तिच्याच मनातलं ती मोकळेपणाने बोलू लागली.

''अग, असं सारखं कुथत बसून कसं होणार? त्यापेक्षा पाण्याचा तरास कमी करायसाठी एकदा न्याटच लावायला पायजे, आपल्या नशिबानं गावाला बाई सरपंच हाय आता. सरपंचाना आन् पंचायत समितीला भेटून गावाची पहिली पाण्याची पक्की वेवस्था करायला लावायची. त्यासाठी सगळ्या बायांनी पदर बांधून मोरचा न्यायचा! त्यांन्ला सांगायचं आम्ही टी.व्ही.त बघतोय की खेड्यात पाण्याचा कायमचा बंदोबस्त करण्याच्या काय काय योजना हायत म्हणं! पाऊस काळात पाणी अडवायसाठी गावाच्या खालाटीला बांध बांधतात. त्यामुळं गावातल्या विहिरींना बारा म्हैनं बक्कळ पाणी भरतय् म्हणं! मग तसली बांध बंदिस्ती करायला भाग पाडलं पायजे. एक पाण्याची बैदा मागची गेली की बायांच्या मागचा शनीचा फेरा कायमचा जाईल बघ किती सुख व्हईल ग मग!''

'तर ग! आता आपण बाया बायाच आहोत म्हणून मोकळेपणानं बोलायला हरकत नाही. पण रोज सक्काळच्या पारी तांब्या घेऊन कुठं आडोसा शोधत बसणं पण दिवसान्दिवस त्रासाचं व्हायला लागलंय. पूर्वीसारखा काही झाड व झाडोरा राह्यला नाही. गाव पार वैराण राखुंडीगत झालय. पाण्याची सोय झाली तर सरकारी मदतीनं संडासपण बांधता येतील ग! आता काय होतय पाणी नसल्यानं घराजवळ ती घाण पण नको वाटती गं!''

''खरं आहे बाई, असलं काही डोक्यातच आलं नाही याच्यामुळं वेळ वाचेल. सोय हुईल आणि मुख्य म्हणजे दमणूक कमी हुईल.''

''खरं तर बाया माणसान्ला आंघुळी पांघुळीसाठी जरा जास्त पाणी लागते. पण आपलं आपणच पाणी वाहून कमरेचा काटा ढिला पडतो मग आपल्यासाठीच काटकसर करायची अन चु बुक डुबुक दोन तांबे घेऊन बुचकळून निघायचं.''

''आन् त्यामुळं होतय काय तर जिच्या तिच्या कमरेला खरूज आन नायटे! कराकरा अंग खाजिवत्यात बाया. ते तर जन्मभर सहनच करत बसायला लागतय!

पाणी आलं ना सोयीनी दारात, तर चार झाडं झुडपंही लावता येतील. एखादी गाय, शेरडीही बांधता येईल. पाला काटक्याचं थोडं जळण होईल. आताची वणवण जरा मागची सुटंल''

''अग गाय दारात आली तर गोबर गॅसच करता येईल की! जळणाचा आन् धुराचा कारच जाईल मागचा!''

''आन मग रात्री पाटी हातात घेऊन शिकायला हुशारी वाटेल की नाही?'' मोका पाहून मी मध्येच मुद्याला हात घातला.

''येईल की हो! मग आम्हाला पण लिहायला वाचायला येईल आणि मग या नव्या शिकलेल्या मुलींसारखं काही चांगलं शहाणपणही येईल''

''तर ग! नायतर आजकाल शाळेला जाणारा यवढासा पोरगाही आईला सहज म्हणतोय, 'गप ए! तुला काय कळतय त्यातलं!' आजकालची शिकलेली पोरं आईचा आई म्हणून काही मान ठेवत नाहीत. त्यांना अडाणी आईची लाज वाटती.''

''मास्तरीणबाई, तुमची पोरं नसतील ना हो असं वागत?'' एकीनं अगदी निरागसपणे विचारलं.

''छे हो! उलट मुलांनाही शिकलेल्या आईचा थोडा धाकच वाटतो. आपण वेडं वाकडं वागलो तर ते आईला कळतं, हे पाहून मुलंही नीट वागतात.''

''होय हो ताई. म्हणून शिकावं वाटतं खरं! अडचणीही आहेत, पण आपली आपणच वाट शोधायला हवी ना? शिक्षणच सोडून कसं चालेल? दमणूक होते कामानी हे खरं! पण ती कमी करायसाठी थोडा प्रयत्न करायला हवा. पाण्याचा प्रश्न आधी सोडवायला हवा.''

''आणि आता पंचायत समितीत बायकांना पण घेतलय नव्हं. त्यांनी सगळ्या

पंचांच्या  बायकांनाही हाताशी धरावं. गरज पडली तर गावच्या सगळ्या बाया बाप्यांनी एका उन्हाळ्यात हातात कुदळ फावडी घेऊन बांध बांधायचं काम हाती घ्यावं की पावसाळ्यात पाणी साचेलच आणि दोन चार वर्षात गावाचा पाण्याचा प्रश्न हलका होईल. दर उन्हाळ्यात टँकरवर किती अवलंबून राह्यचं! त्यामुळं माणसांना काय अवकळा आलीय बघा!''

''बगा काय? आता बायकांनीच पुढं व्हायचं! पाण्याचा पाझर गावात आणायचा! झाडा झाडोरा वाढवायचा! आपली वणवण कमी करायची. घर शिवार हिरवंगार शांत करायचं. पाटी पुस्तक घेऊन लिहाय वाचायला शिकायचं. लक्ष्मी शिवारात, सरस्वती घरात आली की घराघरात गोकुळ नांदायला लागेल.

मी थक्क होऊन पहात होते. बायकांचे चेहरे उजळले होते. कारण वाट शोधायची कल्पना त्यांच्यातल्याच एकीला आली होती. सगळ्यांच्या मनात आशेची वात तेवली होती. मनातलं जनात आणण्यासाठी त्यांना अनेक हातांची मदत हवी आहे. ती मिळाली तर उत्तम! नाही मिळाली तर आज ना उद्या आता त्या आपल्या वाटा आपणच बांधणार आहेत. याची खात्री वाटत होती!

'सयांनो, आपणही आपल्या गावात हे करू! हात पाय गाळून कसं चालेल?'

# माती आणि पाणी

गौरी गणपतीच्या उत्सवाचा उत्साह दरवर्षी तोच असतो आणि तरीही दरवर्षी नवीनही असतो. म्हणून तर त्याचा कंटाळा येत नाही. कारण दरवर्षीच्या गौरी गणपती नवीनच असतात. तरीही माझ्या बालपणीच्या गौरीगणपतीच्या उत्सवाच्या आठवणी मला अधिक सुखावतात. त्यामागे केवळ स्मरणरंजनच आहे असे नाही वाटत.

गौरी गणपतींची पूजा ही पार्थिव पूजा म्हणून प्रसिद्ध आहे. पार्थिव म्हणजे मातीची– मातीची महती त्या काळी अनंत अंगांनी माणूस अनुभवीत होता. विशेषत: बायका! बाई आणि माती याचे नाते मानवी संकृतीच्या तळात घट्ट रुजले आहे. दोघीही सर्जनाची आणि पोषणाची आदिकारणे आहेतच. पण त्या गंभीर चर्चेत न शिरता बायका किती तरी प्रकाराने मातीशी जोडल्या गेल्या होत्या. त्याच्या आठवणी सांगण्याचा हा प्रयत्न.

अजून दर गावी बाळंतपणाचे दवाखाने झाले नव्हते. दर घरात एक स्वतंत्र बाळंतीणीची खोली खेडेगावात हमखास बांधलेली असायची. बाळ जन्माला आले की, नाळ–वार खोल मातीत पुरायची काळजी घेतली जायची. कुत्र्या–मांजरांनी ती उकरू नये हा व्यावहारिक हेतू असला तरी सृजनाचे मातीशी असलेले नाते पुन:सर्जनाच्या भावनेशीही जोडलेले असावेसे वाटते.

चूल मातीची. चूल आणि चुलीतून मंद जाळ देणारे जुळे वैल घडवणे हे बायका घरोघरी करीत आणि नेटका जाळ पोचवणारी चूल वैल घडवणे हे बाईचे मोठे कौशल्य

मानले जाई. काही ठिकाणी कुंभार खरे तर कुंभारीण हे काम करी. रोज पांढऱ्या मातीने नेटकी चूल सारवणे गृहिणीच्या नित्य कर्माचा भाग असे.ती चूल केवळ स्वयंपाकाचे साधन असलेली वस्तू नव्हती. सारवण झाले की अंगणातल्या सडा रांगोळीबरोबर चुलीसमोरही रांगोळीची दोन बोटं उमटायची आणि हळद कुंकू वाहून जणू दिवसभर घराच्या पोटापाण्यासाठी जळत राहणाऱ्या चुलीविषयी कृतज्ञता म्हणून तिला हात जोडून मग पेटवण घातले जायचे. बाई आपलेच घरादारासाठी जळणारे रूप 'सखी' चुलीत पाहत असावी. म्हणून तिच्याशी नाते कृतज्ञतेचे!

सण आले की, पांढऱ्या भेंडाच्या मातीने घराच्या उभ्या भिंती कपड्याच्या पोतेऱ्याने सारवण्याचे काम अगदी परवापरवापर्यंत चाळीस वर्षांपूर्वीपर्यंत बायका खेडेगावात करीत. घरातल्या भिंतीच्या कणाकणाशी बाईच्या स्पर्शाने नाते जुळलेले असे. विकतचे रंग तुलनेने अलीकडचे!

नागपंचमीची नागपूजा करायची झाली तरी अशा घोटून सारवलेल्या भिंतीवर आपल्या हातांनी चित्रे रेखाटून! लाल रंगाची काव आणि पांढरा चुना यांनी शोभीवंत नाग भिंतीवर रेखाटायचे किंवा श्रावणातल्या आदित्य राणूबाईच्या मंडलाचे रेखाटन नागवेलीच्या पानावर व्हायचे.

हरतालिकाही पार्थिव पूजाच! पाणवठ्यावरची स्वच्छ वाळू आणून त्याचेच शिवपार्वती चौरंगावर स्थापन करून पूजा व्हायची. पूजा संपली की पुन्हा उत्तरपूजा होऊन ती पार्थिवपूजा जलार्पण व्हायची. निसर्गाचा तोल कायम रहायचा.

गौरीच्या नैवेद्याला हमखास पुरणपोळी हवी. तिच्यासाठी खास तयारी व्हायची ती लोखंडी पसरट तंव्याच्या तळाशी माती (चिखल) थापण्यापासून. बेताचा मधोमध पसरट चिखलाचा थर थापला तरच पोळी मंद खरपूस भाजली जायची आणि तीही मऊसूत. 'निर्लेपवर' थोडी जास्त आच झाली की येणाऱ्या कडकपणाची भीतीच नसायची. सणाच्या दिवशीचा स्वयपाक थोडा जास्त, चुलीवर. तर रोजच भांडीही स्वत:लाच घासायला लागायची. मग सगळ्या मोठ्या पितळेच्या पातेल्यांच्या बुडावर आणि बाहेरून काठापर्यंत असाच मातीच्या सारवणाचा हात फिरायचा. गाई गुरे असल्याने मोठ्या पातेल्यांतून तापणाऱ्या दुधाच्या पातेल्यांवर रोजच असा मातीचा हात लागायचा. दूध मंद खरपूस तापण्यासाठी त्याचा उपयोग होतच असे, पण नंतर जळकी भांडी घासण्याचे घासणारीचे कष्टही कमी होत. आपलेच कष्ट कमी

करण्यासाठी बायकांची कल्पकता किती अंगांनी मातीचा उपयोग करून घेई हे पाहिले की त्यांचे कौतुक वाटतेच.

भांडी घासायला पुन्हा मातीच. पण वाटेल ती माती चालत नाही. अगदी चिकण शेतातली माती इथे निरूपयोगी. थोडी भुसभुशीत हवी. गोवरीची राख जास्त चांगली. भांडी घासून धुतली की पुन्हा डागही सहसा नाही यायचे. साबण पावडरीच्या रासायनिक घटकांचे दुष्परिणाम हातावरही नाही आणि पाण्यातही नाही. प्लॅस्टिकच्या आणि धातूच्या घासण्यांपेक्षा नारळीचा काथ्या मोठ्या प्रमाणावर वापरला जायचा.

आमच्या गावी ओढ्याच्या काठच्या एका दरडीची कपार म्हणजे चक्क शाडूच्या मातीची खाण होती. बायका धुणी धुवायला गेल्या की तेलकट कपडे (बाळंतीणीचे) असले की चक्क शाडूची माती काढून कपड्यावर घासायच्या. तेलकटपणा गायब होई. ज्यांना डोके धुवायला घरी नीट तेलपाणी मिळत नसे, अशा श्रमकरी वर्गातल्या बायका ओढ्याकाठची शाडूची माती डोक्याला लावायच्या आणि बाजूच्या झाडाखालचे चार रिठे खडकावर ठेचून त्याने डोके धुवायच्या. केस मऊशार झाले की खुश व्हायच्या.

तेलकट भांडी आधी कोरड्या मातीने राखेने घासून मग ओल्या मातीने घासून लख्ख करायचा उद्योग तर नेहमीचाच होता.

घरात उन्हाळ्याचा त्रास नावाची गोष्ट तेव्हा कधी झाल्याचे आठवतच नाही. कारण घरं तीन चार फूट जाड मातीच्या भिंतींची आणि लाकडाच्या पटईच्या धाब्यावर पुन्हा मातीचाच थर! उष्णता येईलच कोठून! बारा महिने घरात जणु एअर कंडिशनिंग असे. याच मातीमुळे हिवाळ्यात घरे उबदार रहात.

म्हणून तर गावाशी नात्याची नाळ पक्की होती. गावात वेशीच्या आतल्या घरा वस्तीचे गाव म्हणजे 'माय पांढरी' होती. पांढऱ्या मातीच्या घरांचा आसरा होता तर वेशीबाहेरच्या रानाशेताकुरणांतून येणाऱ्या पिकांवर पोसणाऱ्या शिवाराला 'काळीआई'च म्हटले जाई. निर्माण करणारी माती–माता एकरूपच, पोसणारी माती–माता एकरूपच आणि आसरा देऊन रक्षण करणारी माती–माता एकरूपच! त्यासाठी पार्थिवाची पृथेची (पृथा=माती=पृथ्वी) पूजा करण्याचे सगळे उत्सव!

मातीतून जन्म, मातीवर पोषण आणि अखेरही मातीत जाणे खेड्यातल्या मराठीत वाक्प्रचार आहे और्ध्वदेहिक विधीसाठी 'मातीला जाणे' माती असशी, मातीत मिळशी याचे नित्य स्मरण राहवे याची अनेकांगांनी सोय या परंपरेने केली आहे.

कृष्णाष्टमीला सगळे 'गोकुळ' बायका घडवीत. कृष्ण–राधा, घुसळण करणारी यशोदा, गाई गुरे, कालिया नाग, गोप–गोपी एक की दोन! शेतातल्या मातीतून सगळे गोकुळ बायका घडवीत, सजवीत, हौसेने त्यात रंगून जात आणि कृष्णाष्टमी सरली की सगळी पार्थिव पूजा पुन्हा पाण्यात अर्पण करीत.

सृजन आणि विसर्जन या सृष्टिचक्राचे हे एक परीने प्रतीकच! सगळा संसार गोकुळासारखा मांडायचा, त्याचा विस्तार करायचा, सजवायचा, त्यात रंगून जायचे आणि तितक्याच सहजपणाने त्याचे पाण्यात विसर्जनही करायचे. मातीला साकार करायचे मूर्ती करायच्या आणि पुन्हा पाण्यात विसर्जन करून माती पाण्यात निराकार व्हायचे. पाण्याने जीवनाचा प्रवाह तरीही वाहता ठेवायचा. पुढे पुढे पाण्याने वहातच रहायचे. पाण्याची गती थांबता उपयोगी नाही.

सगळ्या पार्थिवाच्या पसाऱ्याचे मातीशी आणि पाण्याशी असे सर्वात जवळचे, ओले ओले आणि प्रवाही नाते असते. त्याची आठवण देणारे सगळे चातुर्मासातले पाणकाळातले सण उत्सव आहेत. माणसाचे अखिल सृष्टीशी, ऋतुचक्राशी असलेल्या एकजीव नात्याचे ते प्रतीक आहे. मातीचे हे नाते परंपरेतील बाईने अनेक अंगांनी सांभाळले होते. तिला ते प्राकृतिक ओढीने जाणवले होते, असे वाटते.

शुद्ध माती आणि पाणी यांच्यामध्ये माणसाने विकासाच्या नावावर, सुधारणेच्या नावावर किती अडसर उभे केले आहेत! मातीच्या जागी शुभ्रके (डिटर्जंट) प्लॅस्टर ऑफ पॅरिस, रासायनिक रंग, कर्कश वाद्यमेळांचे आवाज, डोळे दिपविणारा चकमकाट, डोळे फिरवणाऱ्या सजावटी, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक सदृश साहित्याच्या नानाविध देखण्या वस्तू यातून माणसाने अनंत परीने प्रदूषण निर्माण केले आहे. हे प्रदूषण हवेचे, पाण्याचे, मातीचे आहेच. पण त्याहीपेक्षा अधिक मनांचे आणि बुद्धीचे आहे असे वाटते.

सरळ साध्या माती पाण्यावाचून वंचित करणारे आहे. मूळ आधार असलेल्या माती पाण्याचेच विसर्जन करणारे आहे. पण हे वि–सर्जन वि–विशेष सर्जन करणारे नसून वि–विपरीत असे (प्रदूषणाचे) सर्जन करणारे आहे, हे आपण कधी समजून घेणार आहोत का?

आणि शब्दातून समजले तरी कृतीत उतरवणारं नसू तर आपण स्वत:ला प्रगत बुद्धिमान मानव म्हणवून घेण्याला पात्र आहोत का? मग आपल्यापेक्षा परंपरेतली बाई

अधिक शहाणी म्हणायची. सर्जनानंतर विसर्जन तितक्याच सहज अलिप्तपणे करण्याचे शहाणपण असेल तर तथाकथित अतिप्रगत उपभोगवादी, चंगळवादी माणसांनी केलेले नवे उत्सव हे मूलभूत तत्त्वांचे विडंबन आपले आपणच करणे नव्हे का?

आपणच आपल्या शुद्ध सात्त्विक परंपरांचे विडंबन करीत आहोत, रूढी परंपरांमागचे मूलार्थ आपण कधीच गतार्थ करून टाकले आहेत.

# जात्यातल्या आणि सुपातल्या

कौरव पांडवांमधील महाभारतीय युद्ध संपले तरी सूडाग्नी पूर्णपणे निवला नव्हता. युद्धात नेहमी होते तसेच झाले होते. ऐन उमेदीतले तरुण योद्धे म्हणून युद्धात मारले गेले होते. दोन्ही पक्षातले! दोन्ही पक्षात तरुण विधवांचे वृद्ध आयांचे करूण विलाप ऐकू येत होते. कोणत्याही युद्धामध्ये क्षात्रमरण आले म्हणून मरणारांचा काही काळ गौरव होतो. त्यांच्या पुरुषार्थाचे पोवाडे गायिले जातात आणि त्यांच्या विधवा, अनाथ मुले, परावलंबी वृद्ध आईबाप विकल, निराधार अगतीक होत आपल्या खडतर आयुष्याला सामोरे जातात. त्यासाठी आपल्या उमेदीच्या चिंध्या गोळा करीत राहतात. त्यांना कधी फारसे जमेस धरलेले नसते. महाभारत युद्धानंतरही तेच झाले.

पण त्या विधवांचे नष्टचर्य तिथेच संपले नाही. त्यापैकी काहींच्या उदरात त्यांच्या पतीच्या वंशाचे अंकुर वाढत होते. ते उगवत्या प्रकाशाकडे झेपावू पाहत होते. त्यांच्यासाठी जिवंत असलेले आपली उमेद गोळा करीत होते.

अजूनही सूडाग्नी शमलेला नव्हता. शत्रूपक्षाचा नायनाट करायचा म्हणून धुमसत असलेल्या द्वेषाग्नीच्या दृष्टीने शत्रू पक्षाचा निर्वंश करणे हेच परमउद्दिष्ट होते. त्यांच्या दृष्टीने शत्रू पक्ष हा सर्पासारखा असतो. विषारी, घातक. म्हणूनच सर्पाची पिल्लेही ठेचून मारल्याखेरीज शत्रूचा पूर्ण नायनाट केल्याचे समाधान मिळत नाही.

मग कौरव पक्षाचे पूर्वसेनापती द्रोणाचार्य यांच्या पुत्राने अश्वत्थाम्याने पांडवांच्या पक्षातील गर्भवती स्त्रियांच्या उदरातील कोवळ्या गर्भांवरच शस्त्र चालवले आणि सूडाचे समाधान मिळवले, असे महाभारत सांगते.

पण खरेच अश्वत्थाम्याला ते समाधान मिळाले? मृत्यूभय नसलेल्या चिरंजीव अश्वत्थाम्याच्या मस्तकावरची जखम भळभळतच राहिली. वेदनेने भगभगत राहिली. अस्वस्थ चिरंजीव अश्वत्थामा वेडापिसा होऊन भटकत राहिला.

अखेर जिच्या लेकीसुनांच्या गर्भावर क्रूर हत्यार अश्वत्थाम्याने चालविले होते. ती द्रौपदी दु:खाने व्याकूळ झालेली असून, संतापाने तगमगत असूनही तिनेच अश्वत्थाम्याच्या भगभगत्या जखमेवर तेल घातले. त्याची आग शांत केली.

पण महाभारतकारांच्या दृष्टीने ही कथा संपली असली तरी माणसाच्या जातीच्या जगण्याच्या अखंड महाभारतात ही कथा कधीच संपत नाही असे वाटते. क्रूर इतिहासाचीही पुन्हा पुन्हा आवृत्ती होत असते. माणूस इतिहासापासून काही शहाणपण शिकत असेल असे वाटत नाही.

दुसऱ्या महायुद्धात पुन्हा तीच आवृत्ती झाली. स्थळ काळ तेवढे बदलले. माणसांची, वंशांची नावे तेवढी बदलली. आता पांडवकुळाऐवजी 'ज्यू' वंश 'शत्रू' स्थानी होता. म्हणून मग केवळ ज्यू तरुणांची, वृद्ध पुरुषांचीच हत्या करून हिटलरचे समाधान झाले नाही. तर ज्यू बालकांनाही आगीत फेकून संपवले आणि ज्यू गर्भवतींच्या उदरावर वार करून त्यांच्या गर्भासह स्त्रियांनाही संपवले. हा इतिहास अगदी ताजा आहे.

पुन्हा एकदा माझ्या पिढीला अशाच एका क्रूर आवृत्तीचे साक्षी व्हावे लागले होते.

भारत पाकिस्तान फाळणीच्या काळातल्या अशाच कहाण्यांनी तेव्हा सामान्य माणसांना मुळापासून हादरवून टाकले होते. १९४७–५० या काळात निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे भारतात आले आणि त्यांनी सांगितलेल्या उद्ध्वस्ततेच्या कथांनी माणसाच्या क्रूरतेचा संताप शिगेला पोचला.

यातली काही युद्धे प्रत्यक्ष रणमैदानावर घडलेली. काही जातीय, वंशीय विद्वेषातून हिंसकतेचा डोंब उसळणारी. पण सगळीकडे तत्त्व एकच. 'शत्रू'चा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनाही 'लक्ष्य' करणे!

स्त्रियांना 'लक्ष्य' करणे अनेक अंगांनी असते. 'शत्रू' पक्षाची स्त्री म्हणजे जणू त्या पुरुषांची 'मालमत्ता' म्हणून तिचा विध्वंस करणे म्हणजे शत्रू पक्षातील पुरुषांचा विध्वंस करणे. हा विध्वंस प्रत्यक्ष भौतिक स्तरावर असतोच. स्त्री देहाची विटंबना करणे, बलात्कार करणे आणि अखेरीस गर्भवती स्त्रियांची पोटे चिरून गर्भासह स्त्रियांचीही हत्या करणे. लैंगिक आक्रमणाच्या बळी ठरतात त्या स्त्रियाच!

दुसरीकडे असे केल्याने शत्रू पक्षाच्या पुरुषांची मानखंडना होते. कारण दोन्ही पक्षांच्या दृष्टीने आपआपल्या स्त्रिया मालमत्तेच्या वस्तूच असतात म्हणून शत्रूपक्षाच्या या मालमत्तेचा विध्वंस करणे आणि लैंगिक विटंबना करणे हा पुरुषार्थच मानला जातो मग ती कधी शिव्यांतून असेल तर कधी कृतीतून असेल.

सगळी युद्धे, संघर्ष, दंगली यांच्या मुळाशी असलेले सत्ता आणि संपत्तीचे संघर्ष पुरुषी अहंच्या एकांगी विकृत वृत्तीचे आविष्कार असतात, हे एकदा शांतपणे समजून घ्यायला हवे. त्यासाठी वंश, जात जमात, धर्म, पंथ ही सगळी उकरून काढलेली निमित्ते असतात. शिवाय हे सत्ता संघर्ष समाजाच्या शीर्षस्थानी असलेल्या पुरुष घटकांच्या स्वार्थाचेच पोषण करणारे असतात. मात्र मोठ्या खुबीने आणि मानभावीपणाने एरव्ही उपेक्षित समाजस्तरातील पुरुषांच्या 'अहं'ला फुलवून त्यांना युद्धात किंवा दंगलीत मरण्या मारण्यासाठी प्रवृत्त केले जाते. मग अशा तरुणांची शारीरिक – मानसिक उर्जा त्या काल्पनिक अहम्‌च्या केंद्राभोवती एकत्र केली जाते. युद्धात दंगलीत (दोन्ही पक्षांच्या) तेच तरूण मरतात आणि मारतात आणि एरव्ही स्त्रीच्या देवत्त्वाचा गौरव गाणारे हे समूह पुरुषी अहंकाराच्या विकृतीतून शत्रू पक्षातील स्त्रियांचा विध्वंस, विटंबना करतात. त्यातच आपल्या पौरुषांचे सार्थक मानतात.

स्त्रीचा लैंगिक बळी घेण्यात पौरूषाचे झेंडे फडकविण्याची ही वृत्ती खरे तर एक पुरुषी विकृती आहे. पण तिचे इतके उदात्तीकरण केले गेले आहे की त्याच्या मुळांचा निर्लेपपणे शोध घ्यावा असेही वाटत नाही. सर्वच स्त्रियांच्या डोक्यावर ही अदृश्य टांगती तलवार असते. मग संघर्ष कोणत्याही गटात होवोत.

शत्रू पक्षाची व्याप्ती आणि परीघ नेहमीच बदलतो पण त्यात स्त्रीला लक्ष्य करण्याची वृत्ती आणि कृती मात्र कायम असते. दरवेळी शत्रू अन्य धर्माचाच असतो असे नाही. शत्रूच्या अन्यत्वाच्या कसोट्या बदलत असतात इतकेच!

म्हणूनच मग रामाच्या मानखंडनेसाठी रावण सीतेचे अपहरण करतो आणि तिची सुटका झाली तरी ही समाजधारणा तिच्या उभ्या आयुष्याचे वाळवंट करते. पांडवांच्या मानखंडनेसाठी भरदरबारात रजस्वलावस्थेतील द्रौपदीच्या वस्त्राला हात घातला जातो आणि वेश्या म्हणून तिची हेटाळणी होते. हेटाळणी करणाऱ्या दुर्योधन–दु:शासन प्रवृत्तींना आपल्या पौरुषाचा झेंडा मिरवल्याचे विकृत समाधान मिळते.

सीता, द्रौपदी यांचे पती समाजाच्या सहानुभूतीचे स्वामी असल्याने त्यांच्यावर अन्याय झाला असे तरी वाटते पण ज्यांचे पुरुषसहकारी बाप, भाऊ, पती सामजिक

आर्थिकदृष्ट्या दुबळे असतात किंवा शत्रूस्थानी असतात अशा स्त्रियांच्या विटंबना, बलात्कार झाले तरी त्यांना तेवढा शाब्दिक सहानुभूतीचाही न्याय मिळत नाही. मग ती गावातली एखादी दलित भंवरीदेवी असो, आदिवासी असो की कोठेवाडीच्या अश्राप आबालवृद्ध स्त्रिया असोत.

पुरुषी पुरुषार्थ म्हणजे परक्यांच्या स्त्रियांची लैंगिक विटंबना, बलात्कार आणि गर्भहत्या हे पुरुषी अहंचे मॉडेल सर्वच स्त्रियांनी नीट समजून घ्यायला हवे. कारण त्यांच्या स्त्रियाच दरवेळी बळी पडतील असे नाही. पुरुषांच्या दृष्टीने ते आणि आपण सतत बदलते असतात. आज सुपात असलेल्या आपण स्त्रिया या यंत्रणेत कधी त्या होऊन जात्यात भरडल्या जाऊ ते सांगता येत नाही.

द्रौपदीने अश्वत्थाम्याच्या जखमेवर तेल घातले. क्षणभर त्याची वेदना शमली. पण मानवी जीवनातल्या विकृत पौरुष कल्पनेच्या बळींची स्त्रियांची वेदना कोण संपवणार? सर्व स्त्रियांनीच हे नीट समजून घ्यायला हवे. एरव्ही गुजराथमधील दंगलीतल्या त्यांच्या स्त्रियांच्या विटंबनेतून ध्वनित होणारी समस्त स्त्रीजातीवरील विटंबनेची प्रवृत्ती उमगणार नाही.

गुजराथमधील दंगलीच्या वृत्तपत्रांतील बातम्यांतून स्त्रियांच्या विटंबनेच्या कितीतरी कहाण्या पुढे आल्या आहेत. निर्वासितांच्या छावण्यांपर्यंत ज्या स्त्रिया पोचल्या त्या बहुतेक वस्त्रविहीन किंवा जेमतेम लक्तरे अंगावर वागवीत पोचल्या होत्या. त्यावरून त्यांना कोणत्या शारीरिक विटंबनेला तोंड द्यावे लागले असेल त्याची कल्पना येते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रूपक्षातील कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचाही स्त्री म्हणून आदर करून चोळी बांगडीचा आहेर करून तिला सन्मानाने परत वरी पाठवल्याच्या कथा आपण अभिमानाने सांगतो. त्याच छत्रपतींचे अभिमानी म्हणवणारे मात्र आपल्याच देशातील नागरिक असलेल्या स्त्रियांशी अमानुषपणे वर्तन करतात यातला विरोधाभास सुजाण स्त्री पुरुषांनी तरी समजून घ्यायला हवा.

# धर्म आणि संस्कृती

''अगं या कुंकवाच्या करंड्यात मोती कसला? कुणाची कानातली कुडी तुटली कां?''

''नाही. मुद्दामच ठेवलाय. कुंकवाच्या करंड्यात मोती ठेवायचा असतो ना!''

ऐकणाऱ्या सगळ्या एकमेकींकडे पहायलाच लागल्या. एकतर शमशादबीकडे 'वास्तु' आहे आणि त्यासाठी तिने बोलावले आहे, याचेच काही प्राध्यापक मंडळींना आश्चर्य वाटत होते. त्यात कोणी काही आणलेल्या भेटवस्तू आपल्या रीतीप्रमाणे कुंकू लावून द्याव्यात की नाही? अशी आपसात कुजबूज चालू असताना शमशादनेच कुंकवाचा करंडा समोर ठेवला होता. त्याच्या रूपावरून तो लाकडी करंडा रोजच्या वापरातला दिसत होता. करंडा पाहून माझ्यासह सगळ्याजणी आश्चर्याने गोंधळून गेल्या होत्या.

ही घटना सुमारे वीस तीस वर्षांपूर्वी प्रत्यक्ष घडलेली. सगळे घर कौतुकाने दाखवताना शमशादबी सांगत होती की ह्या फरशीखाली चांदीचा वास्तुपुरुष ठेवला आहे. तांब्याच्या, पितळेच्या कळशांतूनच चारी दिशांना वास्तुशांतीचे पाणी ओतले. सोने चांदी कोठून परवडणार? म्हणून खंतही व्यक्त केली.

धर्म आणि संस्कृती यातले अंतर शोधणाऱ्या माझ्या मनाला आणखी एक उदाहरण मिळाले होते.

तसे माझ्या लहानपणी कल्याणला आमच्या शेजारी असलेले मुजावर काका 'दाते पंचांग' बाळगून असत आणि चतुर्थीच्या चंद्रोदयाचीवं वेळ ते आमच्या आईला सांगत असत.

सुमारे चाळीस एक वर्षांपूर्वी सांगलीला आले, तेव्हा अनेक इस्लाम बांधव चतुर्थीचा उपवास करताना आढळले आणि चतुर्थीच्या दिवशी सांगलीच्या सुप्रसिद्ध गणेश मंदिराच्या शिखराचे दर्शन घेत असल्याची माहिती मिळाली होती.

सांगलीला आल्याआल्या महत्त्वाची एक व्यक्ती भेटली होती ती म्हणजे सय्यद अमीनभाई! अमीनभाई हे मोठे सात्त्विक, अभ्यासू आणि समाजाभिमुख वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी उपनिषदांवरही लेखन केले होते आणि ते पुस्तक त्यांनी मला भेट दिल्याचेही आठवते. पण त्याचे महत्त्व तेव्हा लक्षात आले नव्हते. आज 'सय्यद अमीन चौक' अशी पाटी फक्त एका रस्त्यावर आहे. पण तेव्हा लेंगा, सदरा आणि पांढरी टोपी असा साधा पोषाख असलेले सय्यदभाई सायकलवरून सांगलीभर फिरत आणि कुठेही भेटले तरी आवर्जून सायकल थांबवून दोन शब्द बोलून पुढे जात.

'माझ्या लहानपणी गावोगावच्या पीरांचे उरुस ह्या सर्व जातीधर्मीयांसाठी उत्साहाच्या जत्रा असत आणि हिंदू मुस्लीम सर्वच स्त्रिया नवस करण्यासाठी आणि फेडण्यासाठी आवर्जून हजेरी लावीत असल्याचेही मी क्वचित अनुभवले आहे. सांगली जवळच्या कडेगावचे शोभिवंत ताबूत आणि त्यांची मिरवणूक यांच्या तयारीपासून मिरवणुकीपर्यंत सर्व गाव उत्साहाने आजही सामील होत असते. त्याचबरोबर दसऱ्याच्या शोभेच्या दारूकामाची आतिशबाजी करण्यात कवठे एकंद च्या हिंदू मुसलमानांच्या एकजुटीच्या उत्साहाने विलोभनीय दर्शन आजही घडत असते.

महाराष्ट्रातील मुस्लीम स्त्रियांची जीवनसरणी तर कोण्याही सर्वसामान्य ग्रामीण स्त्री सारखीच असते. लग्नकार्यात हिरवा चुडा आणि हिरवी साडी नवरीसाठी अपरिहार्य असते. हळदी समारंभ तर परवापरवापर्यंत धूमधडाक्याने होत. गेल्या काही वर्षांपासून मात्र चित्र थोडे बदलू लागलेले दिसते. तरी लग्न झाल्याची खूण म्हणून बहुतेक स्त्रियांच्या गळ्यात काळ्या मण्यांचे डोरले असते. सार्वजनिक ठिकाणी हळदी कुंकू समारंभात इस्लाम भगिनी कपाळाला कुंकू लावून घेत नाहीत हे खरे पण पूर्ण अव्हेरही करीत नाहीत. त्या गळ्याला –हनुवटीखाली हळदकुंकू लावून घेतात. अशा एक की दोन कितीतरी वर्तन विशेषांतून भारतातील हिंदू मुस्लीम समाजात सतत चालू

असलेल्या सांस्कृतिक अभिसरणाची, पिढ्यान्‌पिढ्या रुजलेल्या चाली, रीती, रूढींची एकरसता आढळते. याचे कारण त्या रूढींचे आचरण करणाऱ्या समाजाचे मन हे येथील मातीत, येथील वातावरणात जडण घडण झालेले आहे. त्यांच्या भावभावना या येथील कोणत्याही सर्वसामान्य माणसांच्या भावभावनांपेक्षा मूलत: भिन्न नाहीत.

म्हणूनच अजूनही मिरजेच्या दर्ग्याच्या उत्सवात नामवंत हिंदू गायकांची हजेरी लागते आणि आपली 'सेवा' रुजू करणे हे कलावंताला आपले धर्मकर्तव्य वाटते.

या सगळ्याला गेल्या ८–१० वर्षात तडे जातानाही दिसतात. मधूनच तरुण मुलींचा घोळका काळे बुरखे घालून जाताना दिसतो. पण त्याचवेळी वर्षानुवर्षेभाजीव्यवसाय करणारी 'बागवान' मावशी नेहमीच्याच मराठमोळ्या पोषाखात बाजारात भेटते. एखाद दुसरा हिंदी उर्दू शब्द गुंफत मराठी बोलते. एखादी शाळेत जाणारी विद्यार्थिनी मात्र अलीकडे बुरख्याचे समर्थन करतानाही भेटते. पण तिचीच आई बुरख्याशिवाय वावरत असते.

संस्कृती संगमाच्या, संस्कृती संकराच्या, संस्कृती एकीकरणाच्या खुणा स्त्रियांच्या वर्तनात, पोषाखात, बोलण्या चालण्यात नेहमीच प्रकर्षाने जाणवतात, मग त्या कोणत्याही संस्कृतीतल्या स्त्रिया असोत. भारतीय मुस्लीम स्त्रिया या आधी भारतीय आहेत आणि मग इस्लाम आहेत याच्या दृश्य खुणा आजही जाणवतात. महाराष्ट्रात त्या अधिक मोकळ्या आहेत. मग ते मोकळेपण 'दगडापेक्षा वीट मऊ' या प्रमाणात का असेना!

आणि परवाच ८ मार्चला त्याचा सुखद प्रत्यय आला. एका बचतगटाच्या वार्षिक सभेच्या निमित्ताने बहुसंख्य मुस्लीम स्त्रिया एकत्र आल्या. नसीमा महात या कार्यकर्त्या भगिनीने प्रयोग म्हणून हे गट स्थापन केले आहेत. आयुष्यात एकदाच 'निकाह' नाम्यावर सही करण्याखेरीज लेखणी हाती न धरणाऱ्या बचत गटाच्या या सदस्य भगिनींना दरमहा सही करतानाही 'मी'पण गवसल्याचे समाधान त्यांनी मोकळेपणाने मान्य केले.

मुस्लीम पुरुषांना जरी एकाधिक विवाहासाठी प्रतिबंध नसला, तरी आपल्या परिवारात असा विवाह होत असेल तर रोकण्याचा प्रयत्न करण्याचा निर्णयही या सभेत घेण्यात आला. 'अल् अमान' संघटनेच्या या इस्लाम भगिनींनी पुरोगामी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वसा घेतल्याचे दिसते.

मतलबी शक्तींनी समाजाची एकसंघता उद्ध्वस्त करण्याचे क्रूर खेळ खेळले जात असता इस्लाम स्त्रियांच्यामधून येणारा हा समंजस सुसंस्कृतीचा अनुभव त्यांच्या स्वत:च्या त्यांच्या कुटुंबांच्या कल्याणाचा आहेच. पण तो भारतीय समाजाच्या दृष्टीनेही एक आशेचा किरण आहे.

# रिकामा वेळ

अलीकडेच एका मैत्रिणीने स्वेच्छा निवृत्ती घेतली. त्याच सुमारास तिच्या नवऱ्याने रीतसर नोकरी पूर्ण झाल्याने निवृत्ती घेतली. अनेक वर्षांची ओढाताण, धावपळ संपल्याने सुरवातीचे काही दिवस मुक्ततेचा आनंद भोगण्यात गेले. आग्रह करणाऱ्या मुला–मुलीकडे जाऊन आले. तेथे सुरवातीचे दोन चार दिवस यांच्यासाठी त्यांनी दिले. सगळेच बाहेर नोकरी व्यवसाय करणारे असल्याने यापेक्षा जास्त दिवस देणे त्यांनाही शक्य नव्हते. या दोघांना त्या घरात परके वाटू लागले. परत ते आपल्या घरी आले. दोघांच्या तब्येती अजून चांगल्या आहेत. मग मैत्रिणीने आपल्या समवयस्क मैत्रिणींच्या बरोबर आत्तापर्यंत जे जे करायचे राहून गेले होते, ते उपक्रम सुरू केले. त्यात ती चांगलीच रमत गेली.

एक तर दोघांची का होईना घरात बरीच कामं असतात. नवरा प्रामाणिकपणे मदत करायचा प्रयत्न करतो. पण जमत नाही. म्हणजे भाजी आणायला जरी गेला तरी चांगली भाजी फळे यांची पारख नसल्याने काहीतरी घेऊन येतो. कारण लहानपणापासून कधी भाजी बाजार माहीतच नाही.

याउलट माझा एक भाऊ त्यात तज्ञ! त्याला इतर कोणी भाजी फळे आणलेली पटतच नाहीत. चांगली भाजी निवडण्यातले अनेक बारकावे त्याला माहीत आहेत. लहानपणी शेतकरी असलेल्या आजोबांबरोबर तो भाजी बाजारात जाऊन तज्ञ झाला आहे. पण या मैत्रिणीच्या नवऱ्याला घरसामानातल्या बऱ्या वाईटाची पारख करण्याची

कधी सवयच नाही. आता एकदम आयुष्याच्या दुसऱ्या टोकाला पोचल्यावर हे सगळे कसे जमणार? तात्पर्य काय तर घरकामासाठी मदत होऊ शकत नाही आणि सगळा दिवस रिकामा. त्याचे काय करायचे?

मैत्रिणीची घरची आघाडी चालूच असते. नोकरीचा वेळ आता ती तिच्या मनाजोग्या उपक्रमांसाठी देते. गाण्याची राहिलेली हौस भजनी मंडळात जाऊन दुधाची तहान ताकावर भागवून घेते. वाचनाची तिला अतोनात ओढ होती. आता एका पुस्तक भिशी मंडळात जाऊन मनाजोगे एखादे पुस्तक आणणे, वाचणे, मैत्रिणींशी चर्चा करणे यात ती रमून जाते. घरकाम करतानाही वाचलेल्या पुस्तकाचा विचार तिच्या डोक्यात असतो किंवा ताज्या अभंगाची चाल ती गुणगुणत राहते. तिच्या हातात बऱ्यापैकी कलात्मक गुण आहेत. 'नंतर कधीतरी करू' म्हणून तिने कापडांचे तुकडे, मणी, झालरी असे बरेच काय काय जमवून ठेवले होते ते आता विविध वस्तू करून कारणी लावते. एका अनाथ आश्रमात मुलींना हस्तकला शिकविण्यासाठी आठवड्यातून एकदा जाते. पण उरलेले सहा दिवस पुढच्या आठवड्यात काय शिकवायचे? याची योजना नकळत तिच्या मनात आकार घेत असते.

नोकरीतून निवृत्त झालेल्यांना हमखास एक प्रश्न विचारला जातो, 'वेळ कसा घालवता तुम्ही?' तिलाही कोणीतरी विचारलं. ती म्हणाली, 'अहो वेळ पुरत नाही. कसा वेळ घालवता म्हणून काय विचारता?'

आणि उलट तिचा नवरा मात्र दिवसेंदिवस वैतागलेला दिसतो. तिच्या बाहेर जाण्यावरून चिडचीड करतो. 'तुम्हीही जात जा' तर 'कुठे जाऊ?' हा प्रश्न. कारण नोकरीपलीकडे त्याचे काही माणसांशी संबंधच नाहीत. वृत्तपत्रापलीकडे वाचन नाही. पोहणे, व्यायाम, पायी चालणे याचीही आवड नाही. नाटक सिनेमा बायको बरोबर कधी गेला तर! पण त्याचेही काही विचारपूर्वक विश्लेषण, चर्चा नाही. 'पाहिले, संपले'. घटकाभर करमणूक. आता कशाला काथ्याकूट? अशी काहीशी वृत्ती!

मग घरी कोणी आले तर बायकोला उद्देशून तिरकस, कडवट शेरे मारणे सुरू. काही दिवसांनी स्वत:च्या प्रकृतीच्या तक्रारी ज्याच्या त्याच्याकडे सुरू. 'माझ्याकडे कोणी लक्ष देत नाही' ही भुणभुण! बायकोचे म्हणणे 'चांगली भूक लागते, झोप लागते मग काय होते? मन रमवण्यासाठी काही करीत जा' असा सगळा गुंता.

हे एकच घर असे नाही. अलीकडे अनेक मध्यमवर्गीय घरातून थोड्याफार फरकाने हीच परिस्थिती आहे. पुरुषाचे काम म्हणजे घराबाहेरचे, नोकरी व्यवसाय करून पैसे

मिळवणे एवढेच असते. ही मानसिकता लहानपणापासून रूजलेली असते. त्याचे फलित म्हणजे आयुष्याच्या अखेरच्या पर्वात रिकामपणाने ग्रासले जाणे! उलट मुली लहानपणापासूनच विविध प्रकारची कामे करताना दिसतात. शिवाय शिक्षण, नोकरी व्यवसाय हेही करीत असतात.

माणूस स्त्री असो की पुरुष जितक्या विविध पातळ्यांवर काम करीत आलेला असतो. तितक्या विविध प्रकारे त्याची सर्जनशीलता कार्यरत रहाते आणि सर्जनशीलता जितकी कार्यरत रहाते तितकी जीवनाभिमुखता वाढते. जगण्याची उमेद वाढते. आयुष्य असेल तितका काळ जगावे तर सगळ्यांनाच लागते. मग ते जगणे हसत हसत जगायचे की, तक्रारी करीत रडत कुढत जगायचे? हे ज्याचे त्याने किंवा जिचे तिने ठरवायचे असते.

मात्र या जगण्याची तयारी बालपणापासून करावी लागते. त्यासाठी आई वडिलांचे पालकत्त्व अधिक सुजाण असावे लागते. मुला मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी हल्ली मुलांना अनेक वर्ग, संस्कार शिबिरे, परीक्षा यांच्या चरकात घालणारे पालक एकीकडे आहेत. पण व्यक्तिमत्त्वविकास म्हणजे नेमके काय करायचे आहे? या सर्वांतून स्वयंपूर्ण, आनंदी, समाधानी जीवन जगण्याची क्षमता मुलांमध्ये यावी, याचे भान कितपत असते? अनेकदा त्या त्या वर्गांसाठी मुला मुलींनी जी कामे करणे अपेक्षित असते ती कामे (हस्तकला इ.) पालकच पूर्ण करतात. मग मुलांचा 'व्यक्तिमत्त्व विकास'(?) कसा होणार? एखादी स्पर्धा जिंकणे, पारितोषिक मिळवणे किंवा वर्ग पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळवणे एवढाच त्या त्या वर्गाचा किंवा शिबिराचा उद्देश असतो का? की जन्मभरासाठी जीवन अधिक सर्जक, कलात्मक, सकारात्मक आणि सुंदर पद्धतीने जगण्याची शिदोरी म्हणूनही पूर्व तयारी असते! याचे भान जेवढे असावे तेवढे दिसत नाही. म्हणूनच मग अनेक छंद वर्ग आणि शिबिरे करूनही दहावीला किंवा बारावीला अपेक्षित गुण मिळाले नाहीत तर प्रचंड निराशेने मुले खचतात. कारण पालक आधी खचतात. या परीक्षा हे सर्वस्व नव्हे हे व्यक्तीला उमगणे म्हणजे व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली पायरी ओलांडणे, हे लक्षात घ्यावे.

एरव्ही सुद्धा आपले दैनंदिन पोटापाण्याचे व्याप सांभाळून इतर अनेक उपक्रम करणारीही तरूण मंडळी दिसतात. संगीत, नाटक, लेखन, एखाद्या मासिकाचे किमान वार्षिक अंकाचे संपादन, बागकाम, पक्षीनिरीक्षण, पर्वतारोहण, जंगलातली भटकंती एक की दोन अनेक प्रकारच्या उपक्रमात आपआपल्या अभिरूचीनुसार माणसे कार्यरत

असतात. त्यात आनंद मिळवतात. पण हे प्रमाण फार कमी आहे.

विद्यार्थी दशेत छंद जोपासनेबरोबर अर्थार्जन करणारेही विद्यार्थी विद्यार्थिनी तुरळक का होईना दिसतात. पालकांची आर्थिक कुवत नसेल तरच विद्यार्थीदशेत अर्थार्जन करावे अशी मानसिकता अजूनही आपल्या समाजात मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे की काय विद्यार्थी दशेत काम करणाऱ्यांना न्यूनगंड वाटतो. खरे तर उलट असायला हवे. पालकांच्या जिवावर उच्च शिक्षण घेणारांना शरम वाटायला हवी. मेहनत करून जगणारांना अभिमानवाटायला हवा. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करून विविध दिवस (डे) साजरे करण्यापेक्षा तिकडचे तरुण कोणत्याही श्रमात कमीपणा न मानता आपला खर्च स्वकमाईवर करतात, याचे अनुकरण करायला हवे. अशी मानसिकता पालकांनी निर्माण करायला हवी.

यंत्र तंत्र युगात दैनंदिन जगण्यासाठीची श्रमाची कामे आणि वेळ यात खूप बचत होते आहे. त्या श्रमाचा आणि वेळाचा विनियोग किती सर्जक आणि सकारात्मक कामांसाठी करण्याचे वळण समाजाला आहे, यावरून इथून पुढे त्या समाजाची सांस्कृतिक प्रत ठरणार आहे, याचे भान फार कमी आहे. सगळीकडे तरुणांच्या (विशेषत:) पुरुषांच्या रिकामटेकड्या झुंडी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. शहरात तर आहेतच. खेड्यातही वाढत आहेत. सर्वात चिंताजनक बाब अशी की, सर्वच स्तरावर तरुणांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते आहे. कालपरवापर्यंत पापभिरू, सत्शील, समजला जाणारा ग्रामीण तरूण फार झपाट्याने गुन्हेगारीकडे वळतो आहे. काम करून जगण्यापेक्षा दुसऱ्याच्या (कोणाच्याही) जिवावर जगण्यात तरूणांना कमीपणा वाटत नाही, ही चिंताजनक बाब आहे. आपला रिकामा वेळ सत्कारणी कसा लावावा? यासाठी कोणत्याच स्तरावर कृतिशील मार्गदर्शन होत नाही की काय?

अनेक प्रश्न एकमेकात गुंतले आहेत. पण या रिकामपणापोटीच अनेक तरुण एकीकडे व्यसनाधीन होत आहेत. तर त्याच घरातील स्त्रियांची सर्व नात्यांनी आणि सर्व स्तरावर होरपळ वाढत आहे. रिकाम्या वेळेचा प्रश्न केवळ सेवानिवृत्तांचाच नाही. सर्वांचा आहे. त्याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

# वाटणी कामांची

बी.ए.ची वार्षिक परीक्षा अगदी तोंडावर आली होती. नोकरी करीत बहिस्थ म्हणून परीक्षा देणाऱ्या आम्ही चारपाचजणी मार्गदर्शनासाठी 'सरां'च्या घरी गेलो होतो. तसा पहिल्या वर्षापासून आमचा शिरस्ताच होता. ठराविक विषयांसाठी आमचे काही 'सर' आपल्या हातातली कामं बाजूला ठेवून आमच्यासाठी ऐनवेळी वेळ द्यायचे. नोकरीच्या वेळा संपल्यावर संध्याकाळी आम्ही सरांच्या बैठकीत जमलो होतो. सरांचे विवेचन सुरू होते. आमच्या लेखण्या वह्यांमध्ये कुरकुरत होत्या. संध्याकाळी साडेसातचा टोला घड्याळाने दिला आणि 'सर' एकदम थांबले. सहजपणे म्हणाले, 'जरा थांबू या आपण. मी कुकर लावून येतो' सर उठून आत गेले आणि आम्ही एकमेकींच्याकडे 'हे काय आक्रित?' म्हणून बघतच राहिलो.

सर शांतपणे बाहेर आले आणि पुन्हा अगदी सहजपणे म्हणाले, ''काय आहे की, कुकर लावायची आज माझी पाळी आहे. घरात आम्ही संध्याकाळच्या कुकरच्या पाळ्या लावल्या आहेत. दोन दिवस मी, दोन दिवस मुलगा आणि दोन दिवस मुलगी तुमच्या बाईंना संध्याकाळची तेवढी सुट्टी. सकाळचा स्वयंपाक रोज त्याच करतात. दिवसभर शाळेची नोकरी. संध्याकाळ त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे निश्चिंत घालवता यावी म्हणून मीच हा पायंडा पाडला आहे.''

आजही खरं वाटू नये अशी हकीकत आहे की नाही? पण ही अगदी अनुभवलेली घटना आहे चाळीस वर्षांपूर्वीची, नाशिकला प्रा. वि. बा. आंबेकर यांच्या घरातली.

तसे आमचे वडील तेव्हाही आमच्या घरात लहानपणापासून आमची अंथरुणे घालीत काढीत असत. त्यामुळे पुरुषांनी असं एखादं काम घरात करण्याचं नवल नव्हतं. तरीपण मराठीतले एक ख्यातनाम समीक्षक, लोकप्रिय विद्वान वक्ते, नाशिकच्या हं. प्रा. ठा. कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख, हरि नारायण आपट्यांच्या घरात बालपणी घरोब्याचा संबंध असलेले 'ज्ञानप्रकाश' या नावाजलेल्या वृत्तपत्राच्या सहसंपादकांचे पुत्र आणि नाशिकच नव्हे तर महाराष्ट्रात विलक्षण आदरयुक्त दबदबा असलेलं व्यक्तिमत्व म्हणजे आमचे हे सर प्रा. विष्णु बापूजी आंबेकर! सहज एखाद्या गृहिणीसारखे कुकर लावताहेत. हे पाहिल्यावर विशीच्या उंबरठ्यावर असलेल्या आम्हा मुलींना तेही चाळीस वर्षांपूर्वी एक आश्चर्यच होतं.

पुढे सरांचा सहवास जसा वाढत गेला आणि समजही वाढत गेली तशी सरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्येही उलगडत गेली. स्वच्छता, टापटीप, नेटकेपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होता आणि त्यासाठी ते स्वतःच आचरण करीत. चहाच्या कपाचे कान थोडे किटलेले दिसले की एखाद्या रविवारी सकाळी टूथब्रश घेऊन ते स्वतः साफ करीत आणि आठवडाभराचे आपले बाहेरचे कपडेही बगळ्याच्या पंखासारखे स्वच्छ धुवून टाकीत.

न्या. म.गो. रानडे आणि नंतरचे गोपाळ कृष्ण गोखले यांचा वैचारिक वारसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मुरला होता. आगरकर आणि हरि नारायण आपटे यांचा उदारमतवाद यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अंग बनून गेला होता. 'ज्ञानप्रकाश'चा लोकप्रबोधनाचा वारसा घरातच होता. 'आधी केले मग सांगितले' हे उदारमतवादाचे, प्रबोधनाचे सूत्र अंगात भिनले होते. केवळ स्त्रीविषयीचाच नव्हे तर एकूणच माणसाचा माणूस म्हणून आदर करण्याचा तो वस्तुपाठ होता.

नंतर आणखी एक अनुभव आला तो घरातच! आमची एक आजी त्या काळातल्या सर्वसामान्य बायकांसारखीच श्रद्धाळू, उपास व्रते करणारी होती. आजोबा मात्र साफ नास्तिक. कट्टर बुद्धिनिष्ठ, विवकेवादी. एरव्ही आजीच्या व्रतवैकल्यांची, समजुतींची आम्ही नातवंडांसमोरही चेष्टा मस्करी करणारे.

आजीची सत्तरी उलटून गेल्यावर तिने एकदा सोळा सोमवारचे व्रत केले होते. खरे तर आता दिवसभर पाण्याचा घोटही न घेता उपवास तिला झेपत नव्हता. पण तिचे व्रत निष्ठेने चालू होते. संध्याकाळी ती अगदी मरगळून जायची.

संध्याकाळी आजोबांनी देव्हाऱ्याजवळ पाट मांडलेला असायचा. आरतीची तयारी, वाटीत खडीसाखर, भांड्यात पाणी ठेवलेलं असायचं. कशीबशी आरती करून खडीसाखरेचा एक खडा, घोटभर पाणी तोंडात टाकून आजी झोपून जायची.

पहाटे पाचलाच अंगणात बंब पेटवला जायचा. आजोबांनीच तो पेटवून स्वत:ची आंघोळ उरकून पुन्हा भर पेटवणं घातलेले असायचे. आजी उठून स्नान करून देवपूजा करायची तोवर आम्ही उठून तोंड धुवायच्या आत आजोबा कुकर शिजवून चुलीजवळ आजीच्या ताटात गरम भात वरण वाढीत असायचे.

हे दृश्यही खूप काही संस्कार करून गेले. श्रद्धा हा वेगळा भाग आणि घरातल्या माणसाविषयी प्रेम, आस्था, जिव्हाळा, माणुसकी हा वेगळा भाग तिथे पुरुष स्त्री या सीमाच संपून जातात.

आमचे आजोबा ही त्यांच्या काळातली नाशिकमधली एक कर्तबगार, दबदबा असलेली असामी होती. शिक्षण, न्याय, वैद्यक, शेती, व्यापार, यंत्रे यासर्वांभोवती मूलभूत विचार आचार करणारी व्यक्ती. शिक्षणाधिकारी 'डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन) म्हणून नोकरी, नंतर शेती खरेदी करून स्वत: राबणारे, शेतीमालाची प्रदर्शने हा प्रकार सत्तर वर्षांपूर्वी अमलात आणणारे, चंदनाच्या आणि मोत्यांच्या व्यापाराचा प्रयोग करणारे आणि भात सडण्याच्या यंत्राची गिरणी नाशिकमध्ये साठ सत्तर वर्षांपूर्वी सुरु करणारे, वैद्यकात मौलिक लेखन संशोधन करीत असतानाच धर्मानंद कोसांबी या बौद्ध पंडितासमवेत पाली भाषेचा अभ्यास करून त्यांच्याबरोबर सीलोनच्या प्रवासात साथ करीत बुद्ध तत्त्वज्ञानाची चिकित्सा करणारे माझे हे आजोबा म्हणजे आईचे काका रावसाहेब नारायण गोविंद पिंगळे! त्यांच्या सहवासात जी वर्ष दोन वर्षेसंस्कारक्षम वयात राहण्याचा योग आला, त्याचा खूप फायदा झाला असं वाटतं.

आणखी एक अनुभव तसा खूप उशीराचा. १९७५ नंतरचा. इस्लामपूरच्या जावडेकर कुटुंबियांनी अंतरंग स्नेह झाल्यानंतरचा! अर्थात आचार्य शंकरराव जावडेकर (मृ. १९५५) यांची भेट शक्य नव्हती. पण त्यांच्या पत्नी श्रीमती सुशीलाबाई (मामी) जावडेकर त्यांच्या उत्तरायुष्यात खूप जवळच्या झाल्या. त्यांच्या स्वभावात विलक्षण संकोच; प्रसिद्धीपराङ् मुखता तरी त्यांच्या भूतकाळाविषयी अनौपचारिक गप्पा मारताना सहज म्हणून सांगितलेल्या घटना प्रसंगांतून आचार्य जावडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि उभयतांच्या दांपत्य जीवनातील सौहार्दाचे अनेक

पैलू उलगडत गेले. काही भागासाठी त्यांना आग्रहाने लिहितं केलं. त्यातलाच हा एक अंश! (संदर्भ–आचार्य जावडेकर पत्रे आणि संस्मरणे – संपा. तारा भवाळकर, लोकवाङ्मय प्रकाशन)

''लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २ एप्रिल १९१८ला माझी वार्षिक परीक्षा होती. दोन्ही घरच्या मंडळींच्या संमतीनेच मी परीक्षेसाठी शाळेत गेले. आदल्या दिवशी संध्याकाळी लग्नाला आलेले लोक दुसऱ्या दिवशी सकाळीच मी शाळेत आलेली पाहून थक्क झाले व तीसुद्धा एक चर्चाच झाली. जे सरळ असेल ते करायचे. लोकमताला भिऊन चालायचे नाही, असा धडा मला पहिल्याच दिवशी मिळाला'' (पृ.४९)

आणखी एक आठवण मामी लिहितात –

''मी इंग्लिश सहावीत गेले होतेच. तेव्हा माझाही ६वी, ७वीचा अभ्यास घरी करून मी परीक्षेला बसावे असा बेत ठरला. पण १९१८च्या ऑक्टोबरमध्ये आलेल्या एन्फ्लूएंझाच्या साथीत सगळीच आजारी पडलो व सगळ्यांचेच अभ्यास मंदावले. शेवटी पुढच्या वर्षी आम्ही पुण्यास आलो व तेथे अभ्यास करू लागलो. त्यावेळी आमच्याबरोबर दोन विद्यार्थी रहात होते. सर्वांनी मिळून स्वयंपाक वगैरे कामे करायची व सर्वांनीच अभ्यास करायचा हे सुरू झाले. ह्या वेळेपर्यंत मला भाकरी नीट करता येत नसत. रोजच्या भाकरी दोन्ही वेळा श्री. जावडेकर स्वत:च स्टोव्हवर करीत व त्या पाहून पाहून नंतरच मी भाकरी शिकले. पुरुष जातीला अगर स्त्री जातीला कोणतीही गोष्ट शिकल्यावर अशक्य आहे असे नाही. ती साध्य होण्यासाठी प्रयत्न मात्र हवेत असे ते सांगत.'' (पृ. ५२)

ही घटना घडली तेव्हा मध्ये खंड पडल्यानंतर आचार्य स्वत: एम.ए. (इतिहास)चा अभ्यास करीत होते. त्या आधीच त्यांची सार्वजनिक व राजकीय कामे सुरु झाली होती. स्वतंत्र लेखनही चालू होते.

स्त्री स्वातंत्र्याचा विचार इंग्रजोत्तर काळात जेव्हा जेव्हा चर्चेला आला तेव्हा तेव्हा स्थितिप्रिय सनातनी पुरुषप्रधान व्यवस्था फार अस्वस्थ झालेली दिसते. त्या अस्वस्थतेपोटी 'बायका आता संसार सोडून जातील आणि पुरुषांना घरकामाला जुंपतील' अशी हाकाटी सुरू केली होती. यात 'बायांचे कार्यक्षेत्र घर आणि घरकाम हेच आहे. पुरुषांनी घरकाम करणे... बायकांची कामे करणे हे कमी दर्जाचे आहे'' हा भाव निहित असतोच. या धारणेच्या पलीकडे जाऊन विचार करण्याचा विचारही ही प्रवृत्ती

करू शकत नाही. अजूनही नाही. अशावेळी प्रत्यक्षातले  हे सुमारे पन्नास वर्षापूर्वीचे अनुभव खूप मोठ्या क्षितिजांना स्पर्श करतात. याच देशात, याच समाजात स्त्री पुरुष भेदातीत असा नित्य कौटुंबिक कामांचा विचार आणि सहज आचारण करणारी ही (विशेषत: पुरुष) माणसे फार पूर्वीच पाहिली तेव्हा कौटुंबिक आणि सामाजिक सुसंस्कृततेचे हे मानदंड वाटले.

स्त्रिया जुन्या  काळापासूनच समर्थपणे आणि अप्रतिष्ठा न मानता पुरुषांची कामे करीत आल्या आहेतच. युद्ध, शस्त्रसंधान, राजकारण, तात्त्विक चर्चा ही खास पुरुषी क्षेत्रं मानली जातात. त्यातली कैकयी, गार्गी, मैत्रेयींपासून ज्ञात इतिहासातील चांदबिबी, झाशीची राणी ही तुरळक उदाहरणे प्रतिबंधाच्या सर्व भिंती उल्लंघून समोर ठाकली आहेत. पुरुषी वृत्तीला मात्र स्त्रियांचं घरकाम नेहमीच क्षुद्र कमी दर्जाचं वाटत आलं आहे.

इंग्रजोत्तर यंत्रयुगात आणि विशेषत: अर्थकेंद्री युगात एक महत्त्वाचा बदल झाला आहे. एरव्ही ज्या कामांचा समावेश 'बायकांची कर्तव्ये' म्हणून होतो, तीच कामे अर्थनिर्मितीची महत्त्वाची साधने होतात, त्यावेळी तीवर पुरुषसत्ता प्राप्त होते. घरात जुन्या लुगड्यांची दुपटी शिवणं, फाटके तुटके कपडे (फुकट) शिवणं हे बायकांचं कर्तव्य ते पुरुष कधी घरात करणार नाही. पण शिवणयंत्र आल्यावरचा सर्व शिलाई व्यवसाय हा पुरुषांचा झाला आहे. सर्व लेडीज टेलर्स मात्र जेण्टस असतात.

मोठमोठ्या हॉटेलांची निर्मिती झाली. पैसेवाल्यांचे ते साम्राज्य झाले तेव्हा तेथे फडकी मारण्याचे आणि उष्टी उचलण्याचे कामही 'बैरा' पुरुष कडक गणवेशात करणे प्रतिष्ठेचे मानू लागला कारण तेथे प्रत्येक वेळेला 'टिप' मिळते. शिवाय पगार असतोच. याच हॉटेलमध्ये स्वयंपाकपाणी करणारी सगळी 'शेफ' मंडळी कडक इस्त्रीतली पुरुष मंडळीच असतात. तेथे स्त्रियांना जणू मज्जाव आहे. पुन्हा अशा हॉटेल्समध्ये स्त्रिया असतात त्या नाच गाणी आणि अन्य मार्गाने  पुरुषरंजन करण्यासाठीच!

पिढ्यान्‌पिढ्या स्वयंपाक हे स्त्रियांचे क्षेत्र ही प्रतिमा असताना आता नवीन पदार्थांची प्रात्यक्षिके दाखवणारे कडक 'शेफ' पुरुष आणि शेजारी हाताला हात लावून 'मम' म्हणणारी माना वेळावत शोभेची बाहुली म्हणून उभी असलेली एखादी 'नटवी' हे दूरदर्शनचे एक आकर्षण ठरू पाहत आहे,. याचा सरळ अर्थ असा की घरात फुकट करायची कामे हे स्त्रीचे कर्तव्य तर बाहेर भरमसाठ पैसे घेऊन करायची तीच कामे  ही पुरुषांची कर्तबगारी! या वळणावर आता आपण पोचलो आहोत.

या पार्श्वभूमीवर प्रा. आंबेकर, रावसाहेब पिंगळे, आचार्य जावडेकर ही माणसे खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष नातेसंबंध, कुटुंबातील सौहार्द यांचे मर्म जाणणारी संस्कृतीची शिखरे वाटतात. खऱ्या लोकशाही प्रवृत्तीचे आधारस्तंभ वाटतात. (अशा आणखीही काही व्यक्ती असतील) समाजातल्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाचा परस्पर आदर, सहानुभाव आणि उच्च नीचभाव विरहित सौहार्दाचे आचरण कुटुंबापासून सुरु होणे हा खऱ्या लोकशाही प्रवृत्तीचा गाभा आहे. खऱ्या उदात्त संस्कृतीचा आशय आहे. हे असेल तर कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त होण्याची धास्ती बाळगायची गरजच उरणार नाही.

# मातृत्वाच्या बलिवेदीवर पातिव्रत्य ?

घरात पतीचे कलेवर आहे. पत्नीने सती जाण्याचे ठरविले आहे. तिला कोणी आडकाठी करणे शक्यच नाही. उलट तिच्या या धीरोदात्त सतीधर्माची सादर चर्चा चालू आहे. त्यासाठी सर्व पातळ्यांवर तयारी चालू आहे.

परसदारी तीन दगडांची चूल 'सती' ने पेटवली आहे. एका बधीर अवस्थेतच चुलीवर भाताचे आधण तिने चढवले आहे. आजूबाजूला चार पाच वर्षांचा तिचा मुलगा व्याकूळ गोंधळलेला घोटाळतो आहे. काहीतरी गंभीर घडले आहे, घडणार आहे याची चाहूल त्या बालकाच्या अंतर्मनाला लागली असावी. तरी अजून आपली आई आपल्याजवळ आहे, हा दिलासा त्याला आहे.

शिजलेला गरम भात तिने ताटलीत वाढून घेतला आहे. त्यावर तूप मीठ घालून कालवला आहे आणि आपल्या बाळाला अखेरचा घास ती भरवीत आहे. तोंडाने म्हणते आहे, ''आता सगळं उरकायला मध्यरात्र उलटून जाईल. तुला भूक लागेल. कोण लक्ष देणार तुझ्याकडे या गडबडीत! म्हणून तुझ्यासाठी हा भात शिजवला आहे. खाऊन घे. माझ्या हातचा, शेवटचा!'' भुकेल्या बाळाला सगळेच कळते आहे असे नाही. तरी काहीतरी खोल तुटलेपणाची जाणीव होते आणि भुकेपोटी भातही पोटात जातो आहे. दमून गेलेला बाळ गरम भात पोटात गेल्यावर तिथेच झोपी गेला. आईने अखेरचा हात त्याच्या चेहऱ्यावरून फिरवला. कुणी आयाबायांनी हळहळत बाळाला उचलून घरात नेले. आईने निग्रहाने त्याच्याकडे पाठ फिरवली. सतीच्या न्हाणाच्या सोहळ्याची तयारी

बायकांनी केली होती, त्याला दृढ संकल्पाने ती सामोरी गेली.

पुढे काय झाले असेल? सकाळी बाळ उठला तेव्हा त्याला आई कुठे?' या प्रश्नाचे काय उत्तर मिळाले असेल? सरणावर पतीचे मस्तक मांडीवर घेताना तिच्यातली 'आई' कुठे गेली असेल? की, तिच्यातली केवळ पतिव्रताच त्याक्षणी शिल्लक राहिली असेल? आई आणि पत्नी यांच्यात थोडाही संघर्ष झाला नसेल? ओढाताण झाली नसेल?

नक्कीच झाली असणार. एरव्ही सतीची तयारी एकीकडे चालू असताना तिने त्याही अवस्थेत भात शिजवून बाळाला भरवला नसता की त्याही वेळी केवळ गृहिणीची भूतदयाच फक्त जागी होती?

आज सतीप्रथा संपली असली तरी त्यामागची मानसिकता संपली आहे का?

सर्जकता, प्रतिपालकत्व हा स्त्रीचा प्रकृतिधर्म म्हणून एकीकडे संस्कृतीने, परंपरेने तो आदरणीय मानला आहे. या प्रकृतीधर्मातून येणारे मातृत्व हे स्त्रीत्वाचे गौरीशंकर म्हणून पिढ्यान्‌पिढ्यांना आदरणीय झाले आहे. फार काय सर्व स्त्री देवतांची निर्मितीही माणसाने 'मातृरुपात' अनुभवली आणि मूर्त केली. मातृत्वाचा अव्हेर करणारी स्त्री परंपरेने निंदनीय ठरवली आहे.

अपत्यनिर्मितीची ओढ ही प्राकृतिक मानली जाते. त्या सर्जनशक्तीचा गौरव म्हणजे स्त्रीत्वाचा गौरव! त्या सर्जनशक्तीच्या अनुषंगानेच येणारे पोषण आणि रक्षण हे स्त्रीत्वाचे मूलभूत, वंदनीय, पूजनीय गुण म्हणून परंपरा तिचा गौरव करते. सर्व स्त्रीदेवतांमध्ये सर्जन, पोषण आणि रक्षणसामर्थ्य आहे म्हणून त्यांचा गौरव होतो. परंपरा स्त्रियांसमोर सतत अशा मातृत्वाचा आदर्श ठेवते. अगदी इंटरनेट युगातले भारतीय चित्रपट आणि दूरदर्शन मालिकाही क्षणोक्षणी अपत्यप्राप्तीसाठी तळमळणाऱ्या स्त्रिया दाखवीत आहेत.

आणि दुसरीकडे आपणच जन्माला घातलेल्या अपत्याच्या पोषणाची, प्रतिपाळाची चिंता न करता सती जाणाऱ्या स्त्रीचा गौरवही करतात. तिच्या पतिव्रताच्या गदारोळात मातृत्वाचा गळा घोटतात.

या सगळ्यात काही विसंगती आहे असे नाही वाटत? संपूर्ण पातिव्रत्य संकल्पना ही मातृत्वाच्या बलिवेदीवर उभी करणारी ही व्यवस्था गौरवास्पद मानावी? मातृत्व नैसर्गिक आहे. विवाहसंस्था आणि अनुषंगिक पातिव्रत्य कल्पना मानवनिर्मित, म्हणूनच कृत्रिम आहे. एखाद्या व्यवस्थेला सोयीस्कर व्हावे म्हणून प्रकृतींचा गळा मुरगळून संस्कृतीच्या नावाखर ही विकृती निर्माण केली आहे, असे नाही वाटत?

इतकेच नव्हे तर त्या विकृतीलाच सुप्रतिष्ठीतपणाचे, मांगल्याचे, गौरवाचे तोरण बांधून पिढ्यान्‌पिढ्या त्याचे गुणगान केले जात आहे. यात मातृत्वाची पायमल्ली होत नाही का? की परंपरा म्हणजे विसंगती हेच सत्य आहे?

प्रारंभी दिलेली हकीकत एका स्नेह्यांनी काही दिवसांपूर्वी मोठ्या अभिमानाने सांगितली होती. ही घटना त्यांच्याच कुळात काही पिढ्यांपूर्वी घडलेली आहे. ती ऐकल्यापासून कितीक वादळे माझ्या मनात उठली. स्त्रीजवळ असलेली निष्ठा, निश्चय, जिवावर उदार होऊन समर्पण करण्याची वृत्ती असे कितीतरी लोकोत्तर गुण केवळ विशिष्ट क्षेत्रातच वापरले गेल्याने या परंपरेचे खऱ्या अर्थाने स्त्रिया आणि पुरुष दोघांचीही मानसिकता अधिक संकुचित, कुंठित बंदिस्त करून टाकली आहे, असे नाही वाटत? आमच्या नाटक (एकच प्याला–सिंधू) चित्रपटांनीही पुन:पुन्हा हे आदर्श उगाळण्यामागे एक खंडित मानसिकता तर नाही?

सिंधूचे वाक्यच असे आहे, 'पतीव्रतेला नाती नसतात. ती बापाची मुलगी नसते, भावाची बहीण नसते, मुलाची आई नसते' म्हणजे ज्या वंशसातत्याची निरामय व्यवस्था व्हावी म्हणून विवाहसंस्था अस्तित्वात आली असे सांगितले जाते, त्या विवाहसंस्थेच्या आदि आणि आद्य हेतूलाच सिंधूच्या या वाक्यातून व्यक्त होणारे मूल्य सुरूंग लावते आहे.

हे टिपण वाचताना वाचकांचा कदाचित आक्षेप येईल की, 'आता कोठे इतकी पराकोटीची पातिव्रत्य परीक्षा घेणारी सतीप्रथा चालू आहे?' पण याला उत्तर म्हणून की काय मागच्याच महिन्यात एका स्त्रीच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिला उकळत्या तेलातील नाणे काढण्याची कसोटीची परीक्षा (सत्यक्रिया) घेतल्याची बातमी आठवडाभर वृत्तपत्रातून गाजत होती. म्हणजे सीतेची अग्निपरीक्षा रामायणापुरतीच राहत नाही. (म्हणे) रामराज्य येऊ घातले आहे. त्यातले कल्याणकारी काही संकेतसुद्धा दिसत नाहीत. पण सीतेची अग्निपरीक्षा आणि वनवास मात्र अखंड चालू असल्याची साक्ष पटते.

आणखी एक योगायोग! हे लेखन चालू असतानाच 'सकाळ'च्या ६ आणि ७ ऑगस्टच्या अंकात मध्यप्रदेशातल्या एका 'सती'ची सविस्तर वार्ता आली आहे. म्हणजे देवराळाचे सतीप्रकरण अजून स्मृतीमधून पुरते पुसले जाण्यापूर्वीच नव्या 'सती'वार्तेने जिवंत परंपरेची साक्ष पटविली आहे.

या ताज्या प्रकरणात तर वृद्ध मातेला सतीत्त्वाच्या मखरात बसवण्यासाठी (आणि बहुधा नंतरचे भौतिक लाभ पदरात पाडून घेण्यासाठी) मुलांनीच पुत्रांनीच पुढाकार घेऊन मृत बापाच्या चितेवर आईला बसवून अग्नी दिला आहे. खरे तर हा सदोष मनुष्यवध आहे. पण 'तपासात' (?) काय निष्पन्न होईल कोण जाणे!

वृद्धमातेलाच 'सती'च्या चितेवर चढविणाऱ्या या पुत्रांनी पुन्हा परशुरामाची परंपराच पुढे चालवलेली दिसते. किंबहुना त्याच्याही पुढचे पाऊल टाकलेले दिसते. परशुरामाच्या पित्याला जमदग्नीला आपल्या पत्नीच्या रेणुकेच्या स्खलनाचा संशय तरी आला होता. येथे तसेही काही नाही. अर्थात स्त्रीला स्खलनाचा अधिकार या व्यवस्थेत नाहीच. मग ती माता असली, माता म्हणून पूजनीय असली तरी आधी केवळ मादी म्हणूनच पुत्रही तिच्याकडे पाहणार आणि पातिव्रत्य रक्षणासाठी पित्याला सामील होऊन तिचा शिरच्छेद करणार! एका वेगळ्या अर्थाने तिच्या शिरापेक्षा (बुद्धीपेक्षा) धडच (केवळ स्त्रीत्वाची इंद्रिये) या व्यवस्थेला महत्त्वाचे वाटत असल्याचे सिद्ध करणार!

एकूण काय तर पती असो की पुत्र असो स्त्रीकडे माणूस म्हणून कोणी पाहणार नाही.

सुरवातीला सांगितलेल्या घटनेतील स्त्रीची मानसिकता पारंपरिक गौरव कल्पनेतून घडलेली होती, हे खरे आहे. पण तिच्या मातेच्या कर्तव्यापासून ती दूर गेली की नाही? 'सती' म्हणून तिचा जसा पिढ्यान्‌पिढ्या गौरव झाला तसा तिने सती जाणे नाकारून मुलाचा प्रतिपाळ केला असता तर गौरव झाला असता का?

फार तर मुलाच्या मनातली कृतज्ञता त्याच्याबरोबरच संपली असती. त्या वंशातल्या पुढच्या पिढ्यांना ती काही सती इतकी स्पृहणीय गौरवगाथा वाटली नसती.

कायद्याने एखादी प्रथा संपली तरी स्त्रीविषयक धाणांच्या भूतकालीन संकल्पनांची भुते पूर्णपणे नष्ट होत नाहीत, हेच खरे!

# एका लोककथेचे तात्पर्य !

जन्माच्या आधीपासून स्त्रियांचे आणि पुरुषांचे जगणे निरनिराळ्या नात्यांनी एकत्रच असते. त्यामुळे त्यांच्या  समस्यांचा खरे तर एकत्रच विचार व्हायला हवा. पण तसे होताना दिसत नाही.

स्त्री पुरुषांच्या स्वत:विषयीच्या आणि एकमेकांविषयीच्या परंपरेने घडलेल्या धारणा हा मोठाच अडसर आहे. समाजातील धर्म, परंपरा, सांस्कृतिक धारणा या भावात्मक बाजूंबरोबरच समाजातील उत्पादन व्यवस्था, अर्थव्यवस्था, शिक्षण यासारख्या भौतिक संस्थातील व्यवस्थाही  अडसर होऊन राहतात. या सर्वांविषयी मोकळेपणाने विचार होणे आवश्यक आहे. तसे प्रयत्न होतही असतात.

स्त्रीच्या परावलंबनाच्या अनेक कारणांपैकी काही कारणे हे परंपरानिर्मित भ्रम आहेत. पण ते भ्रमच वास्तवाची जागा होऊन बसले आहेत.

स्त्री निसर्गत: दुबळी आहे, हा असाच एक भ्रम आहे. अलीकडच्या वैज्ञानिक अभ्यासातून त्या भ्रमाला उत्तरे दिली आहेत. शारीरिक बळाच्या दृष्टीनेही पुरुषाचे सबलत्त्व निर्विवाद नाही. श्रमकरी वर्गातील पुरुषाच्या तुलनेत मध्यमवर्गीय पुरुषाच्या आहारातील घटक अधिक उष्माकांचे असूनही तो दुबळा ठरतो. एखादे धान्याचे पोते श्रमकरी पुरुष जितक्या सहजपणे वाहून आणतो, तसे मध्यमवर्गीय पुरुषही करू शकत नाही. बौद्धिकदृष्ट्या तर पुरुषाच्या समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात संधी मिळताच स्त्रियाही बरोबरीची पात्रता सिद्ध करीत असल्याचा अनुभव येतो.

शारीरिक बळाबाबत स्त्री पुरुषांच्या आहारातील फरक हे महत्त्वाचे कारण आहे. स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने कमी उष्मांकांची गरज असते हे ही आजवरच्या पुरुषप्राधान्याच्या समजुतीखाली असलेल्या आहार शास्त्रज्ञांची 'मिथक' (भ्रम) आहे, असे अलीकडेच जागतिक ख्यातीचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी सांगितले आहे. स्त्री ही शरीराने पुरुषापेक्षा लहान (चणीची) पर्यायाने दुबळी असावी या धारणेतून पिढ्यान् पिढ्या स्त्रिया अपुऱ्या अन्नावर, कुपोषित रहात आल्या आहेत. आशियाई (भारतासह) राष्ट्रात याचा प्रत्यय येतोच. उलट गेल्या दशकात जपानी मंडळींच्या आहारात बदल झाल्याने तेथील स्त्री पुरुष अधिक उंच आणि सुदृढ झाले आहेत. पाश्चिमात्य युरोपीय देशातील मुली आणि स्त्रिया वजन उंचीसह भारतीय पुरुषापेक्षाही काकणभर सरस आहेत.

श्रमकरी वर्गातील स्त्रिया असोत की नोकरीपेशा वर्गातील स्त्रिया असोत, त्या त्या वर्गातील पुरुष घटकांपेक्षा कितीतरी विविध स्तरावर त्या कामे करतात. उंबऱ्याबाहेर राना, शेतात किंवा रस्त्यावर खडी फोडण्यासारख्या कामात श्रमकरी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने कष्ट उपसते, तशी नोकरीपेक्षा स्त्रीही आपआपल्या व्यवसायातील पुरुषांच्या बरोबरीने कामे करते. शिवाय या दोन्ही स्तरातील स्त्रिया सर्व प्रकारची घरकामे नित्य नियमाने वर्षानुवर्षेकरीत असतात. सर्व पुरुष घटकांपेक्षा सर्व स्त्री घटक अधिक काळ आणि अधिक प्रकारची कामे करीत असूनही तिच्यावरचा दुबळेपणाचा शिक्का कायम असतो.

याखेरीज अपत्यजन्म, त्याचे संगोपन, घरातील पाहुणे, आजारी, वृद्ध या सर्वांसाठी स्त्री पुरुषापेक्षा जास्त श्रमत असते. तरी तिला दुबळी ठरवणे पुरुषसत्तावादी मानसिकतेला सोयीचे असते. स्त्रीविषयी गौणत्त्वाची, कमीपणाची भावना पुरुषांच्याच काय पण स्त्रियांच्याही मनातून जात नाही. त्यामुळे स्त्रिया पुरुषावलंबी असतात, हेही एक गृहित असते. या समजुतीचा प्रतिवाद करणारी भूमिका ही आधुनिक पुरोगाम्यांची 'फॅशन' किंवा 'फॅड' समजले जाते. पण हे तरी कितपत खरे आहे?

भारतभरच्या शेकडो बोलींमध्ये हजारो लोक कथा पिढ्यान् पिढ्या प्रचलित आहेत. त्यापैकी बंगालमधील 'संताळ' जमातीच्या संताळी बोलीतली एक पारंपारिक लोककथा या संदर्भात लक्षणीय आहे.

एक जोडपे होते. नवरा मोठा तापट आणि संतापी होता. बायको बिचारी घरात

रात्रंदिवस निरनिराळ्या कामात व्यग्र असायची. पण हा घरात आला रे आला की तिला तडातडा बोलायचा. घालून पाडून बोलायचा. तिचा पाणउतारा करायचा. जणू ती आळशी आणि बिनकामाची ऐदी बायको आहे, असे त्याला वाटायचे. तीही एकदा त्रासली. म्हणाली, ''सारखे सारखे असे बोलत जाऊ नका. मी किती तरी प्रकारची कामे अखंड करीत असते. मीही माणूस आहे. मीही दमते.'

बायको आपल्याला उलटून बोलली, म्हणून तो जास्तच संतापला, ''बरं, बरं! उद्या मी घरी येईन तेव्हा तुझ्या कामांचा हिशेब ठेव. मीही माझ्या कामांचा हिशेब ठेवीन. एक काम झाले की, एक काडी बाजूला ठेवायची. पाहू कोणाच्या काड्या जास्त होतात?''

दुसऱ्या दिवशी हिशेबाची वेळ आली. नवऱ्याने आपल्या काड्या मोजून कामे सांगायला सुरवात केली. ''मी रेडे मळणीसाठी नेले, त्याची ही एक काडी, भात खळ्यात पसरून मळणी केली त्याची ही काडी, भाताचे तूस बाजूला केले, त्याची ही काडी, भाताची रास करून घरी आलो, त्याची ही काडी...''

''अहो, हे तर सारं एका भाताचंच काम झालं की, आता माझी कामं बघा...'' म्हणून एकेक काम उच्चारीत ती एकेक काडी बाजूला ठेवू लागली. ''पहाटे उठून भात कांडून पाखडलं, अंगण झाडून सडा घातला, पाणवठ्यावर जाऊन पाणी आणलं, भांडी घासली, धुणी धुतली, गुराख्याचं खाणं केलं, चुलीला सारवण घातलं, विस्तव पेटवला, भात शिजवला,. रानातून भाजी आणली, ती निवडून शिजवली, मुलांची अंथरूणं, घाण काढली, त्यांना पेज शिजवून दिली...'' तिची यादी वाढतच चालली आणि काड्यांची संख्याही कितीतरी जास्त झाली. अखेर ती म्हणाली, ''पहा बरं, माझं एक काम तरी दुसऱ्या सारखं आहे का? प्रत्येकाची पद्धत, वेळ, काळ वेगळी. तुमची कामं एकाच कामाची अंगं असतात. आम्हाला नांगरायची, बाहेरच्या कामांची पूर्वजांनी बंदी केली म्हणून. नाहीतर तीही कामं आम्ही केली असती. तरी तुम्ही आमचा सारखा पाणउतारा करता...''

नवरा मनातून उमगला.

ही लोककथा जुनी. एका आदिवासी समाजातली, तरी त्यातून ध्वनित होणारा आशय कोणत्याही स्थळ काळातील स्त्री पुरुषांच्या कामाचे स्वरूप स्पष्ट करणारा आहेच. तपशीलात थोडा फार फरक असेल.

स्त्रिया एकाच वेळी विविध स्तरावर शरीराने आणि मनाने कामे करीत असतात. कमीत कमी वेळात अधिकाधिक कामांचे नियोजन करीत असतात. ही सगळी मॅनेजमेंट त्या पिढ्यान् पिढ्या करीत असतात. परंतु एखाद्या कंपनीच्या किंवा फर्मच्या मॅनेजमेंटवर स्त्रिया अजूनही नगण्यच असतात. कारण ते उच्च अर्थाजनाचे क्षेत्र झाले की अधिक प्रतिष्ठेचे होते आणि स्वाभाविकच त्याचे स्वामित्व बहुधा पुरुष घटकाकडे जाते.

स्त्री पुरुष धारणांबाबत आदिम अवस्थेतून आपण खरेच प्रगतीकडे सरकलो आहोत का?

# ५
# चौथा कमरा

इतिहासातील थोर व्यक्तींची चरित्रे सगळीकडेच सांगितली जातात. त्यांचे वंशवृक्ष साक्षेपाने शोधून त्यांची आवर्जून नोंद केली जाते, हे सगळे अगदी स्वाभाविक आहे. मात्र सर्व वंशवृक्षात केवळ पुरुष पूर्वजांची आणि पुरुष वंशजांचीच नोंद असते. जणु काही हे सर्व पुरुष केवळ पित्याचीच संतती असते. त्यांना केवळ जन्मदाताच असतो. जन्मदात्रीची आवर्जून नोंद असलेले वंशवृक्ष करण्याची कुठेच प्रथा नाही. जणु काही स्त्रीला भूतकाळ नाहीच. केवळ पितृसत्ताकताच येथे दिसते.

एकूण जीवनातील (कौटुंबिक आणि कुटुंबांबाहेरील) स्त्रीचे स्थान लक्षात घेतले तर स्त्रीचा हा अनुल्लेख स्वाभाविकच आहे. तिने ज्या कुळात जन्म घेतलेला असतो त्या कुळांला तिची फारशी अपूर्वाई नसते आणि विवाहानंतर ज्या कुळात ती जाते त्या कुळाला ती परकीचँ (आऊट सायडर) असते. केवळ 'पुत्र' जन्माला घालून पतीचा वंश वाढविण्याचे 'साधन'एवढेच तिचे काम आणि स्थान असते. याखेरीज त्या कुळाला तिची ऐतिहासिक दखल घ्यावीशी वाटत नाही. पिता कितीही सामान्य वकुबाचा असला तरी तो ऐतिहासिक दस्तऐवजात नोंदवला जातो. आई मात्र जिजाऊसारखी असामान्य कर्तृत्वाची असेल तरच इतिहास तिची नोंद घेतो, तीही 'वंशवृक्ष' काढताना नाहीच. एकूण जिच्यामुळे वंशाचे मूळ रुजते तिला कुठेच रुजू दिले जात नाही. तिची 'नोंद'च

घेतली जात नाही.

परवा मात्र एका स्नेह्यांनी एक माहिती पुरवून सुखद धक्का दिला आहे. 'आपटे' आडनावाच्या कुळातील वंशनोंदीत मातांचा आवर्जून उल्लेख करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले. अर्थात अगदी प्रारंभापासून हे शक्य झाले नाही कारण पूर्वीच्या नोंदी केवळ पितृसापेक्षतेनेच होत्या. पण ह्या नवीन पिढीला मातांची ऐतिहासिक नोंद करावीशी वाटली, हेही नसे थोडके!

जी गोष्ट स्त्रीच्या भूतकाळाची, तीच भविष्याची. कुणाचा तथाकथित ज्योतिषावर विश्वास असो की नसो पण वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी वार्षिके या सर्वांतून येणाऱ्या राशिभविष्यात स्त्रियांबाबत एखाद दुसऱ्या वाक्यात बोळवण केलेली असते आणि तेही ती स्त्री विवाहित प्रापंचिक आहे असे गृहित धरून. फार तर 'अविवाहितांचे विवाह जमतील' असे एखादे वाक्य! जणु घराबाहेर आणि विवाहाखेरीज स्त्रीला भविष्य नाहीच.

'भविष्य' महत्त्वाचे नाही. पण त्यातून व्यक्त होणारी स्त्रीविषयीची समाजाची उपेक्षितवृत्ती महत्त्वाची आहे. म्हणजे स्त्रीला स्वतंत्रपणे भूतकाळही नाही, भविष्यही नाही. तिने सतत फक्त वर्तमानाला सामोरे जात रहायचे.

स्त्रिया शिकल्या, अनेक क्षेत्रात स्वतंत्रपणे कर्तबगारी दाखवून उभ्या राहत आहेत, सर्व बाजूंनी कुटुंबाचा आधार म्हणून खंबीरपणे वाटचाल करीत आहेत, तरीही स्त्रीचा अनुलेख करून तिच्याविषयीची उपेक्षा करण्याची मानसिकता इतकी अंगवळणी पडली आहे की अशा बाबी दैनंदिन जीवनात सहजासहजी स्त्रियांच्याही लक्षात येत नाहीत, मग पुरुषांच्या लक्षात येणे दूरच.

आपल्याकडे शहरातून जरी एरव्ही विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात येऊन दीर्घकाळ लोटला असला तरी अगदी चिमूटभर अपवाद वगळता निदान लग्न मुंजीसारख्या शुभप्रसंगाच्या निमंत्रणपत्रिका छापताना मोठ्या कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे निमंत्रक म्हणून छापली जातात, तीही ज्येष्ठताक्रमानुसार! म्हणजे ज्येष्ठ भावाचे नाव सर्वप्रथम, त्याच्यासमोर त्याच्या पत्नीचे याप्रमाणे! मग त्या भावाशी

एरव्ही फार प्रेमाचे किंवा जिव्हाळ्याचे संबंध असतीलच असे नाही. खेड्यात तर सर्व भाऊबंदांची नावे असतातच! मात्र एखादा भाऊ दिवंगत झाला असेल तर त्याच्या विधवा बायकोचे नाव छापले जात नाही. भावजय नसली तरी विधुर किंवा अविवाहित भावाचे नाव असते.

फार काय मोठ्या भावांच्या लहान मुलांचीही (मुलींची नव्हे) नावे असतात पण एखादी अविवाहित किंवा विधवा वा परित्यक्ता मोठी बहीण त्याच घरात असेल तरी तिचे नाव घातले जात नाही. जणु काही ती त्या कुटुंबाचा घटक नसतेच. उलट अनेकदा अशा एखाद्या बहिणीने ते कुटुंब सावरलेले असते, पण तिच्या नावाची निमंत्रण पत्रिकेत उपचार म्हणून सुद्धा नोंद करण्याची गरज कुटुंबियांना वाटत नाही. नव्हे ते त्यांच्या लक्षातच येत नाही इतकी स्त्रीसदस्यांची उपेक्षा अंगवळणी पडलेली असते. अलीकडे वधूवरांपैकी कोणाची आई विधवा असेल तर तिचे नाव क्वचित निमंत्रकांच्या यादीत असते. पण मूळ निमंत्रक मात्र कुटुंबातील पुरुष सदस्यच असतो. मुले लहान असतानाच वैधव्य आलेल्या आणि स्वत:च्या कर्तृत्वावर मुलांना वाढविलेल्या एका मैत्रिणीने मात्र मध्यंतरी कोणाही नात्यागोत्यातील मंडळींच्या नावे पत्रिका न काढता केवळ स्वत:च्या नावे निमंत्रक म्हणून मुला मुलींच्या लग्नाची पत्रिका काढली. आमच्यासारख्या काही संबंधितांना ते योग्य वाटले तरी काहींना ते अघटितही वाटले. पण अशांकडे दुर्लक्ष केले तरच उपेक्षेचे अनुल्लेख कमी होऊ शकतील.

कायद्याने स्त्रीला वडिलार्जित संपत्तीत वाटा दिलेला असला तरी सहजपणे किती स्त्रियांना तो मिळतो, हा संशोधनाचा विषय आहे. अनेकदा भाऊ बहिणीची 'नाहरकत' म्हणून सही घेऊन मोकळे होतात. सरळपणे दिली नाही तर दबाव आणला जातो आणि तरीही ती आपला हक्क प्रस्थापित करू लागली तर ती खलनायिका ठरते. एक वकील मध्यंतरी म्हणाले होते की, ''या कायद्यामुळे बहीण भावांच्या पवित्र नात्याला नाट लावला आहे'' मग भांऊबंदकी वर्षानुवर्षेचालली आहे, त्या भावाभावांचे नाते पवित्र नसते, असे म्हणायचे का?

जी गोष्ट माहेरच्या संपत्तीतील वाटणीची, तीच सासरच्या संपत्तीतील वाटणीची!

एरव्ही नवऱ्याच्या सगळ्या उपद्व्यापात 'अर्धांगी' म्हणून पत्नीने साथ द्यावी, हे जितके स्वाभाविक समजले जाते, तितक्या स्वाभाविकपणे संपत्तीची ती भागीदारीण म्हणून मान्य करणे जिवावर येते.

ज्या स्त्रिया नोकरी व्यवसाय करून अर्थार्जन करीत असतात त्यांचा तरी आपल्या अर्थार्जनावर पूर्ण हक्क कोठे असतो! अगदी शिक्षित जोडप्यांमध्येही पती जितक्या स्वतंत्रपणे आपल्या मिळकतीच्या विनियोगाचे गुंतवणुकीचे निर्णय घेऊ शकतो, तितक्या सहज स्वतंत्रपणे तेच निर्णय किती स्त्रिया घेऊ शकतात? किती जणींना तशी मुभा असते? हाही संशोधनाचा भाग आहे. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ अर्थार्जन नव्हे तर अर्थविनियोगाचे हक्क म्हणजे स्वातंत्र्य! हे ही फार खोलात जाऊन लक्षात घेतले जात नाही.

याचाच एक पुढचा टप्पा म्हणजे खरेदीचा! घरातील, घरासंबंधीच्या सर्व खरेदीच्या पावत्या बहुधा घरातील पुरुष घटकाच्या नावावर असतात. अगदी स्त्री अर्थार्जन करीत असली तरी! फार तर घरातल्या भांड्या कुंड्यांसारख्या स्वयंपाकघरातल्या खरेदीवर बायकोचे नाव असते. पण (टॅक्स संबंधी भानगड नसेल तर) घर, जमीन–जुमला, सोने–नाणे अशा मौल्यवान स्थावर जंगम खरेदीची कागदपत्रे मात्र पुरुषाच्याच नावे असतात आणि त्यात सहसा कोणाला काही गैर वाटत नाही, कारण तशी परंपरा आहे.

पण अशामुळेच अनेकदा कष्टाने उभे केलेल्या वर्षानुवर्षाच्या प्रपंचाला स्त्रीला जेव्हा मुकावे लागते तेव्हा प्रत्यक्ष तिच्या पैशाने खरेदी केलेल्या घर वस्तूवरही तिचा कायदेशीर ताबा राहत नाही. ती अक्षरशा रस्त्यावर येते. अर्थार्जन करूनही ती उपेक्षित राहते.

स्त्री गौरवाची मिथके विषेशत: मातृगौरवाची मिथके समाजात खूप मोठ्या प्रमाणात असतात आणि त्या शाब्दिक गौरवाच्या समाधानात स्त्रियाही असतात. पण जर आई आजारी असेल तर किती घरातून मुलगे अडीअडचणीला आईची वस्त्रे धुणे, तिची वेणी फणी करणे अशी 'मातृसेवा' सहज उत्स्फूर्तपणे करतात? वडिलांच्या अशा सेवा मुली सुनाही सहज करतात. पुरुषांच्या दृष्टीने मातृगौरवही बहुधा 'बोलाचीच कढी'

स्वरूपाचाच असतो. एखादा अपवाद हा नियम सिद्ध करणाराच असतो.

पिढ्यान्‌पिढ्या स्त्रीची अनेक नात्यांनी उपेक्षा स्त्रिया आणि पुरुष सर्वांच्याच इतकी अंगवळणी पडली आहे की तीच स्वाभाविक वाटते. ती लक्षात आणून देणे, हाच विक्षिप्तपणा ठरण्याची शक्यता असते. असे असले तरी आपल्या सर्वच समाजाचा सुजाणपणा वाढण्यासाठी ते आवश्यक आहे. अनेकांमध्ये त्या जाणिवेनंतर अनुकूल बदल होण्याचीही शक्यता आहे.

नवीन घर बांधताना सर्वांच्या सर्व सोयी बहुधा पाहिल्या जातात. मुलांना खोली, आजी आजोबांना (असले तर बहुधा) खोली, बाबांना स्टडी! अशा सोयी सुखवस्तू कुटुंबे आवर्जून करून घेतात. पण गृहिणी अर्थार्जन करणारी, शिक्षित असली तरी तिच्यासाठी स्वतंत्र खोली असावी असे तिच्यासह सहसा कोणालाच वाटत नाही. माजघर, शेजघर आणि स्वयंपाकघर हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र! या बाहेरच्या कार्यासाठी तिची तिला स्वतंत्र अशी खोली असावी, असे का वाटू नये? हाही उपेक्षा अंगवळणी पडल्याचाच परिणाम का? अमृता प्रीतम यांच्या भाषेत असा 'चौथा कमरा'' (चौथी खोली) बाईला नसावी का? निदान केवळ तिचा असा एक शांत घराचा कोपरा तरी का नसावा?

# या उत्सवांचा अर्थ तरी काय ?

''आई मी नाही त्या शेजारच्या काकांबरोबर जाणार?''

''अग पण कां? ते मावशीकडे सोडताहेत ना तुला! सकाळीच म्हणत होतीस मावशीकडे जायचंय म्हणून!''

''हो, पण तू सोड!''

''काही तरी तुझे हट्ट! ऐकत म्हणून नाहीस. जा तू त्या शेजारच्या काकांबरोबर मुकाट्याने!''

मग ती छोटी कधी जाते, कधी रडते. कधी गप्प होते. का?

''मॅडम, मला सुट्टीत हॉस्टेलवरच रहायची परवानगी द्या.''

''अग पण दिवाळीची सुट्टी आहे. मी सुद्धा रहाणार नाही. आणि घरी आई वडील आहेत ना तुझे!''

''तरी मी हॉस्टेलवरच राहते.''

''अग पण गेल्या वर्षीपर्यंत जात होतीस ना! यंदा तर तुझे वडील सेवानिवृत्त होऊन आले आहेत ना!''

''म्हणूनच नको''

''म्हणजे काय?'' म्हणजे काय? हे ती नाही सांगू शकत. का?

मैत्रिणींकडून तिच्या मॅडमना जे कळते, त्यावर मॅडमचे संस्कारशील मन विश्वासच नाही ठेवू शकत. जन्मदाता पिता मुलीकडून 'अशी' काही अपेक्षा करू शकतो? तेही

चांगला शिकला सवरलेला!

अखेर ती सुट्टीत मैत्रिणीच्या घरी गेली. पण त्यामुळे मूळ प्रश्न सुटला का?

◆ उगीच एकत्र कुटुंबाचं कौतुक करतात हे सिनेमावाले आणि टी.व्ही.वाले!

''उगीच कसं? आपल्या भारतीय संस्कृतीचं ते वैशिष्ट्य आहे! किती फायदे असतात. शिवाय सगळी भावंडं चुलत, मावस, मामे एकत्र कुटुंबात किती हसत खेळत गुण्यागोविंदानं राहतात.

ते सगळं दुरून डोंगर साजरे! एकत्र राहणारांना खरं काय ते माहीत असतं. विशेषत: बायकांना! मला विचार!

''हो ग! हरिभाऊ आपट्यांच्या कादंबरीत नाहीत का, धोंडू भावजी आणि शंकर मामंजी?''

''ते सासरी एखाद्या ठिकाणी! पण लग्न न झालेल्या मुलींनां काय त्रास असतो? सगळी तर भाऊ बहीणच असतात ना!''

''हे बघ! तुला अनुभव नाही. अगदी चुलत, मावस, मामे, आत्ते सगळे भाऊ सारखे! माहीत नाही तुला बहिणींचा कसा छळ होतो ते! परत बोलताही येत नाही कुणाकडे!''

आणि ती हिरमुसली झाली. तिच्या चुलत भावाचा अनुभव तिने आपल्या सख्ख्या मैत्रिणीला सांगितला तेव्हा ती हादरून गेली. पण घरातल्या कोणत्याही बाईजवळ बोलायची तिची हिंमत झाली नाही. चाळीशी उलटली तरी!

◆ एका महिला मंडळाच्या सहलीच्या वेळी काही प्रौढ बायका थोड्या मोकळेपणाने गप्पा मारीत होत्या.

''मी हल्ली तिथे तीर्थ घेणंच सोडून दिलय. काय भक्तिभाव असेल तो आपल्या मनात ठेवायचा!''

''कोणत्या...'त्या' मंदिरात ना! मला वाटलं माझाच तो अनुभव आहे. तो भटजी असतो उंच ओट्यावर बसलेला. आपण तीर्थ घेण्यासाठी हात पुढे करून उंच करायच्या आधीत तो पळी घेऊन वाकतो आणि कुठेतरी पदराशी...'' आणि मग आणखी काहीजणींनी 'त्या' विशिष्ट मंदिरातल्या विशिष्ट तीर्थदात्याबद्दलचा आपला सारखाच अनुभव एकमेकींना सांगितला. पण तेवढाच! त्याबद्दल घरी सुद्धा बोलणं कठीण होतं. मग मंदिरातल्या ट्रस्ट्रींकडे जावं, एवढं काही सुचणे आणि करणे दूरच!

◆ आणखी एका बायकांच्या गप्पाष्टकातले कुजबुजणे! ''नाही राहत मी

बहिणीकडे एक रात्र सुद्धा! खूप रागावते ती! आकांडतांडव करते. मेहुणाही मानभावीपणाने बोलतो. ऐकून घेते अन् गप्प बसते. मला काय करायचे तेच करते''

''बहिणच आहे ना ती! मग सांगायचे तिला एकदा स्पष्टपणे!''

''काय सांगायचं? तुझा नवरा माझ्या अंगचटीला येतो म्हणून! आणि तिचा विश्वास बसणार! बसला तरी ती कबूल करणार! उलट माझ्याच नावाने वाणं वाटत हिंडेल. नवरा नाही ना माझ्या डोक्यावर! तो मरून गेला, हा काय माझा दोष! या मेव्हण्यापेक्षा मी दोन वर्षाने मोठी! पण त्याची नियत ही अशी! बहिणीला नवऱ्याचाच पुळका येणार! अग, आईजवळ सुद्धा कधी सांगता येणार नाही. तिला माझ्यासारख्या विधवा मुलीपेक्षा श्रीमंत जावई प्रिय! गप्प बसते झालं.''

◆ ''देवळात तरी कुठे बाई मोकळेपणाने जाता येतं! मधे कीर्तनाचा महिना होता! नावाजलेले बुवा म्हणून जात होते. तर हा बुवा आपला मधून अधून मधाळ नजरा टाकीत बोलायचा.

''पण बायकांना म्हणे फार आवडतं त्याचं कीर्तन!''

''चहाटळ मेल्या. आहेत दोघी तिघीजणी 'तशा' काय काय चटक पदार्थ करून नेऊन देत असतात त्यांना! पण सगळ्यांनाच नाही आवडत ती नजर''

कळत्या नकळत्या वयात मंदिरांनी वेढलेल्या परिसरात असताना कानावर पडलेल्या संवादाचा हा आशयही आठवला.

◆ शेतावर, मजुरीवर काम करणाऱ्या बायकांना त्यांच्या 'मुकादम' साहेबाकडून होणारी 'अशी' जाचणूक सर्वांना माहीत आहे. नोकरीपेक्षा बायकांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी एखादा असा नाठाळ सहकारी किंवा 'साहेब' भेटत असतो. बाजारहाट, गर्दीच्या ठिकाणी सर्व स्तरातल्या, सर्व वयातल्या स्त्रियांना सभ्य दिसणाऱ्या पुरुषांकडून अशा पुरुषी लैंगिक विकृत स्पर्शांचे अनुभव येतच असतात. कोणत्याही बाईला आयुष्यात असा एकही अनुभव आला नसेल तर ते दुनियेतलं एक आश्चर्य म्हणावं लागेल. प्रकट कोणी मान्य करणार नाहीत, हा भाग वेगळा! कारण मान्य करणारीचीच मानखंडना आणि अप्रतिष्ठा होणार! कुटुंबातही! समाजातही!

साठी उलटेपर्यंतच्या काळातले बायकांच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकलेले अनुभवलेले हे काही प्रसंग केवळ मासला म्हणून नोंदवले आहेत. काही बायकांना यातले अनुभव अतिशयोक्ती वाटण्याचा संभव आहे. पण मी फार सौम्य शब्दात ते नोंदवले आहेत.

वास्तव जास्त दाहक आहे. स्त्रीचा अर्थ इतकाच असतो का? असे वाटण्यासारखी परिस्थिती भोवताली आहे.

स्त्रियांवरचे लैंगिक अत्याचार म्हटले की, एकदम लैंगिक बलात्कारच अभिप्रेत असतो. पण सर्वसामान्यपणे अगदी उच्चभ्रू पांढरपेशा स्तरापासून ते श्रमकरी स्त्रियांपर्यंत सर्वांना सर्रास अशा प्रकारच्या नजरांच्या, स्पर्शांच्या, शब्दांच्या बलात्कारांना सामोरे जावे लागते. त्या जखमा दिसत नाहीत. आतल्या आत सलत पाझरत राहतात. त्या वागवतच पिढ्यान् पिढ्या बायका या देशात (जग तूर्तास बाजूला ठेवू) जगत आहेत.

आणि तरीही आम्ही म्हणणार की आमची संस्कृती स्त्रियांचा आदर करते. स्त्री देवतांची उपासना भारतात जेवढी होते तेवढी इतरत्र क्वचितच होत असेल. सुफलनाच्या देवता म्हणून स्त्रियांमध्ये तर स्त्री देवतांच्या उपासना फार मोठ्या प्रमाणावर होतात. वर्षातला एकही महिना असा नसेल की कोणत्या ना कोणत्या स्वरूपात स्त्री देवतेचा लहान मोठा उत्सव कुटुंबात साजरा होत नाही. प्रत्यक्षात मात्र आपल्या कुटुंबात मुलीला गर्भातूनच खुडून टाकण्याची मनोवृत्तीही वाढते आहे.

संस्कृतीच्या प्रवासात मानवी मनातील सुप्त श्रद्धांचे व्यवहारात कृतिरूप दर्शन घडते, असे म्हणतात. देवतांच्या श्रद्धेच्या मुळाशी प्रत्यक्ष भौतिक जीवनातील अनुभव असतो असेही म्हणतात. कुमारी, माता, वृद्धा सर्व अवस्थेतील स्त्रीदेवतांची येथे उपासना होते. आणि व्यवहारात पराकोटीची अवहेलना होते. या खंडित मानसिकतेचे भानही नसते. विद्येच्या अधिष्ठात्री 'सरस्वती'ची पूजा होते. पण प्रत्यक्षात तिचे मानवी रूप असलेल्या स्त्रीला विद्येपासून, ज्ञानापासून दूर ठेवण्याचाच प्रयत्न दिसतो.

'लक्ष्मी'ची पूजा तर फारच प्रिय! पण प्रत्यक्ष स्त्रीला लक्ष्मी संपत्तीवरच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचा खटाटोप होतो.

'दुर्गा' आणि काली'च्या उग्र संहारक रूपांच्या आकर्षणातून उत्सव आणि तिच्या नावाच्या 'दौडी' गावोगाव काढण्यात पुरुष भक्तांचा उत्साह शिगेला पोचतो. पण आपल्यावरच्या अन्यायाला प्रतिकार म्हणून एखाद्या माय बहिणीने 'दुर्गावतार' धारण केला तर 'दौडी'तले किती बांधव तिच्या पाठीशी राहतात? उलट (मानवी) दुर्गेने स्वत:च्या अधिकाराबद्दल 'ब्र' ही काढू नये अशी सर्वसामान्य अपेक्षा असते. मात्र पुरुषी हिंसेच्या गदारोळात त्यांचे हेतू साध्य करण्यापुरत्याच स्त्रियांच्या दुर्गा वाहिन्या

असाव्यात असेही राजकारण होते. घराघरातल्या अन्यायाबद्दल सोशीकतेने त्यांनी भूमिगत सीतेचीच भूमिका घेणे आदर्श मानले जाते.

नवरात्रातील मातृदेवतांच्या उपासनेचा गदारोळ चालू असताना शांतपणे आपल्या मनात डोकावून या विसंगतीचा विचार करण्याची बुद्धी भक्तांना होईल का? मातृदेवतांच्या सर्वतंत्र स्वतंत्र प्रतिमेत या देशातील सर्वसामान्य स्त्रीच्या स्वतंत्र माणूसपणाचा आदर आणि सन्मान करण्यासाठी समस्त देवीभक्त कृतिशील होतील का? की नुसताच उत्सवी गदारोळ होत राहील?

# मानवी नातेसंबंध आणि विज्ञान

एक राजपुत्र होता. एकदा प्रवासात वाट चुकून तो एका गावात गेला. एका घरी त्याला आसरा मिळाला. गृहिणी रूपसुंदर होती. राजपुत्र तिच्यावर आसक्त झाला. ती जेवण वाढण्यासाठी समोर येऊन वाकली, तोच आश्चर्य घडले. तिच्या स्तनातून दुधाच्या धारा उसळून राजपुत्राच्या तोंडावर उडाल्या. क्षणात त्याची कामासक्तीची धुंदी उडाली.

हे मूल जन्मताच या मायलेकरांची ताटातूट झाली होती. सुदैवाने हा मुलगा एका निपुत्रिक राजाला सापडला आणि याला राज्यपद मिळाले होते. पण या सगळ्या कहाणीचा इत्यर्थ काय? काही झाले तरी जन्मदात्रीशी असलेले रक्ताचे नाते प्रबळ असते. प्रयत्नपूर्वक ते तोडायचे म्हटले तरी आंतरिक ओढीने ते ताटातुटीवर मात करते.

दुसरी अशीच एक कहाणी आहे. गर्भवती सीतेचा रामाने त्याग केल्यामुळे लव–कुश या आपल्या पुत्रांच्या जन्माची रामाला खबरच नव्हती. अश्वमेघाचा घोडा मुलांनी अडवला आणि रामासमोर मुले योद्धे म्हणून आली. पण रामाच्या मनात मात्र शत्रुत्वाची भावना निर्माण न होता त्यांच्याविषयी ममत्त्वच वाटले.

या कथेचाही इत्यर्थ काय? पिता पुत्रांची जन्मजात ताटातूट झालेली असली तरी रक्ताच्या नात्याची ओळख आंतरिक ओढीने आपोआप पटते.

दोन्ही कथा जनक आणि जननी यांच्याशी अपत्यांचे रक्ताचे नाते किती दृढ असते,

हे सांगतात. अशा आशयाच्या कथा जगभरच्या लोकसाहित्यात कमी अधिक फरकाने आढळतात.

सजीव प्राण्यांची वंशसातत्याची प्रवृत्ती ही सर्वाधिक प्रबळ अशी प्राकृतिक प्रवृत्ती आहे आणि माणूस हा सर्वाधिक प्रगत सजीव असल्याने त्याची तर वंशसातत्यासाठी अखंड धडपड चालू असते. नर मादींची प्राकृतिक ओढ, आकर्षण, लैंगिक संबंध या सर्व बाबींना माणूस सतत संस्कृतीच्या मखरात बसवून आकर्षक करीत आला आहे.

एक स्त्री व एक पुरुष यांचा विवाह, त्यांची अपत्ये, त्यांचा संसार ही विवाहसंस्थेच्या वाटचालीतील आजची सर्वात प्रगत अवस्था समजली जाते आणि स्त्री पुरुष दोघेही अपत्यसंभवाच्या बाबतीत नैसर्गिकपणे सक्षम असतील पण बहुधा विवाहाचा वंशसातत्याचा उद्देश सुरळीतपणे चालू राहतो.

पण विवाहित जोडप्यांमध्ये एकात जरी काही दोष असला तरी वंश सातत्यात अडथळा येतो आणि प्रश्न निर्माण होतात. हे प्रश्न दुहेरीच नव्हे तर अनेकपदरी असतात.

आपण वंश चालवू शकत नाही. हा मूळ आदिम वंशसातत्याच्या प्रेरणेला खो असतो. त्या आदिम प्रेरणेतून येणारे नैराश्य हा मूळ पदर!

मानवी समाज आणि संस्कृतीच्या घडणीत नुसती क्षमता पुरेशी नसते. ती सिद्ध करणे हे जास्त महत्त्वाचे असते. स्त्रीला आपले नारीत्व सिद्ध करण्यासाठी नर हवा असतो आणि पुरुषाला आपले पौरुष सिद्ध करण्यासाठी मादी हवी असते. विवाहित नर नारींनी अपत्यसंभव करण्यालाच समाजमान्यता, संस्कृतीमान्यता आणि म्हणूनच धर्माची आणि कायद्याचीही मान्यता असते. म्हणूनच विवाहित जोडप्याला एकमेकांपासूनच अपत्यसंभव ही सहज रूढ बाब आहे.

अडचण येते ती दोघांपैकी एकजण किंवा दोघेहीजण अक्षम असतात तेव्हा! स्त्री अक्षम असेल पुरुषाने दुसरा विवाह करणे द्विभार्या प्रतिबंधक कायदा होईपर्यंत सर्वमान्य होते.अजूनही आपसातील समजुतीने किंवा क्वचित जबरदस्तीने हा मार्ग स्वीकारला जातो.

पुरुष अक्षम असेल तर धर्माने, कायद्याने अशी उघड सवलत (घटस्फोटाखेरीज) स्त्रीला दिलेली नाही. तरीही पुरुषाचे (पतीचे) वैगुण्य उघड होऊ नये म्हणून आडमार्गाने अन्य पुरुषाकडून संतती प्राप्त करून घेतली जाई. अजूनही अशा घटना

घडत नसतीलच असे नाही.

प्राचीन काळी निपुत्रिक अवस्थेत पती मेला तर पत्नीने 'नियोग' पद्धतीने पुत्रप्राप्ती करून घेण्याची मुभा महाभारतापर्यंत तरी समाजमान्य, धर्ममान्य होती.

या सगळ्यात पुन्हा 'पुत्र' महत्वाचा. कारण त्याखेरीज 'पित्याचा वंश' चालत नाही. पितृसत्ताक, पुरुषप्रधान व्यवस्थेतली ही मानसिकता आजही प्रबळ आहेच. वंशसातत्याबरोबरच सांपत्तिक वारसा महत्त्वाचा. किंबहुना मुळात 'वारसाहक्क' म्हणजेच पुत्राचा पैतृक संपत्तीवरचा हक्क! बायकांना जसे सगळेच हक्क झगडून मिळवावे लागतात तसा पैतृक संपत्तीवरचा वारसा हक्कही झगडूनच मिळवावा, लागला, ही अलीकडची बाब आहे.

थोडक्यात म्हणजे काहीही करून वंश वारशासाठी विवाहित जोडप्याने पुत्र जन्माला घातला म्हणजेच कुटुंबात, समाजात ते सुप्रतिष्ठित होतात, ही मानसिकता कायम आहे.

माणूस बुद्धिमान प्राणी आहे. त्याने विज्ञानाच्या शोधांनी आपले जगणे सुसह्य करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच मग अपत्यसंभवातले प्राथमिक अडथळे दूर करून परीक्षानलिका बालक (टेस्ट ट्यूब बेबी) जन्मापर्यंतची मारलेली मजल तशी फारशी खळखळ न करता समाजमान्य झाली. कारण या प्रयोगात विवाहित जोडपेच जैविक माता पिता राहते. गर्भाचे फलन तेवढे कृत्रिमपणे होते. त्याचा पुढचा टप्पा म्हणजे पुरुष याही मार्गाने गर्मसंभवाला अक्षम असेल तर अन्य (अज्ञात) नराच्या शुक्राणूंच्या दानाद्वारे पत्नीने गर्भसंभव करून घेणे. यात पतीची लैंगिक उणीव सामाजिक स्तरावर उघड होत नसल्याने किंबहुना ती झाकली जाऊन प्रतिष्ठा कायम राखली जात असल्याने हा मार्गही गुप्तपणे आचरण्यात आणण्याचीही सवय झाली आहे.

हे सगळे टप्पे पार करून आता आणखी एका टप्प्याकडे विज्ञान गेले आहे. पती–पत्नी खेरीज तिसऱ्याच स्त्रीचे गर्भाशय गर्भधारणा आणि गर्भसंभवापुरते भाड्याने घेण्याच्या टप्प्यावर वाद सुरु झाला आहे.

गर्भाशयाबाहेर सुफलन घडवणे किंवा अन्य पुरुषाचे शुक्राणू स्वीकारणे या प्रयोगात पती–पत्नी दोघांचाच जैविक संबंध कायम राहतो. शुक्राणूंचे कृत्रिमपणेच गर्भाशयात रोपण होते. तो पुरुष अज्ञात असतो. त्यामुळे कोणाच्याच भावनिक गुंतागुंतीचा प्रश्न रहात नाही.

पण जेव्हा तिसरीच एखादी स्त्री (सरोगेट मदर) अपत्य संभवाचे सगळे देह –मनाचे भले–बुरे अनुभव घेऊन अपत्यसंभव घडवील तेव्हा त्या नात्यांची गुंतागुंत किती आणि कशी असेल? सुरवातीच्या लोककथांतून सांगितल्याइतकी ती एकरेषीय नक्कीच नसेल. फारच समजुतदारपणाने नात्यातल्याच एखाद्या स्त्रीने हे काम केले तर गुंतागुंत कमी होईल. पण ती पूर्णपणे नाहिशी होईल का? कारण अपत्यसंभवाच्या बाबतीत स्त्रीची गुंतवणूक पुरुषापेक्षा कितीतरी प्रकारे जास्त असते. आपल्या देहात एक जीव नऊ महिने वाढवणे, त्यानंतरही कदाचित मूल स्तनपानावरच अवलंबून असते तोवर सांभाळणे यातून त्या स्त्री ही भावनिक गुंतवणूक अधिक होणार. प्रारंभी आर्थिक मोहापोटी कदाचित तिने मान्यता दिली असली तरी नंतर तिचे मन कशावरून बदलणार नाही अमेरिकेत अशा घटना घडत आहेतही.

या सगळ्या स्त्रीदेहाचा वापरही केवळ विकत, भाड्याने घेण्याची वस्तू म्हणूनच होणार. म्हणजे परंपरेने स्त्रीचे व्यक्तिमत्त्व जसे फक्त तिचे जनेंद्रिय आणि गर्भसंभवाची 'चामड्याची पिशवी' एवढ्यातच मोजले त्याचा रोकडा प्रत्यय या कायदेशीर तरतुदीमुळे येतो आहे. मग माणूस खरेच सुसंस्कृत झाला आहे का?

माणूस संस्कृती निर्माण करतो म्हणजे काय? तर अन्य प्राण्यांसारखा केवळ शरीर पातळीवरच जगत नाही. आहार, निद्रा, भय, मैथुन या शुद्ध प्राण्याच्या प्राकृतिक प्रेरणा माणसाच्याही आहेत. परंतु तो वैयक्तिक आणि सामूहिक संयमाद्वारा केवळ शरीर प्राधान्य मानीत नाही. शरीरासह मन आणि बुद्धी यांचा विचार संस्कृती अग्रक्रमाने करते. म्हणूनच 'भूक' या आदि प्रेरणेसाठी संयमाचा बांध घालून !'सहभोजना'चे संस्कार केले. निद्रेचे स्थलकाल अवस्था नियत केली. भयनिराकरणासाठी कुटुंब, समाज अस्तित्वात आले आणि मैथुनाला विवाह मर्यादेत ठेवले. याचा अर्थ शरीराच्या सर्व आदिप्रेरणा मन बुद्धीच्या छायेखाली आणल्या.

असे असेल तर ज्या स्त्री पुरुषांना निसर्गाने अपत्य संभवाबाबत काही उणीव ठेवली असेल तर त्यांनी त्यावास्तवाचा मुक्तपणे स्वीकार करण्याची तयारी ठेवणे अधिक रास्त ठरेल. तिसऱ्या कोणा व्यक्तीचे स्वातंत्र्य, भावना यावर आक्रमण न करता वैद्यकीय प्रगत उपायांचा अवलंबही सर्वमान्य झाला आहे. मात्र स्त्रीगर्भाशय भाड्याने देण्या घेण्याच्या व्यवहारात स्त्रीचे केवळ शरीरच गृहित असते. मन, भावना नाही.

जर तिसऱ्या स्त्रीच्या देहात तिच्या रक्तावर पोसलेले मूल स्वीकारले जात असेल

तर दत्तक मूल घ्यायला काय हरकत आहे? गर्भधारणा करणाऱ्या स्त्रीच्या रक्तातले तथाकथित गुणदोष बालकात येणारच नाहीत याची खात्री काय?

एकीकडे सर्व संस्कृतींचे सर्वोच्च तत्त्व म्हणून सर्व माणसे समान आहेत. एकाच सत्‌चे/ईश्वराचे अंश आहेत, म्हणून मान्य असेल तर केवळ गर्भबीज आपल्या देहाचे असणे/नसणे याला सुसंस्कृत म्हणवणाऱ्या माणसाच्या जातीने किती महत्त्व द्यायचे?

''पिंडी ते ब्रह्मांडी!'' हे तत्त्वज्ञान फक्त बोलण्या ऐकण्यापुरतेच रहाणार असेल तर आपणच मान्यता दिलेल्या तत्त्वज्ञानाचा आपणच पराभव करीत आहोत. खरे तर विश्वातली सर्वच मुले आपली वाटायला हवीत.

सर्वात महत्त्वाचे... जन्मजात ''रक्ताची ओढ'' हे जैविक वास्तव आहे की 'मिथक' (मानीव सत्य) आहे? याचाही एकदा धांडोळा घ्यायला हवा. रक्तसंबंधापलीकडे जाऊन स्वीकार करण्याची वृत्ती हा संस्कृतीचा सर्वोच्च बिंदू मानला जातो आणि रक्तसंबंधीयांमध्येच परस्परांचे घातपात, खून करण्याची वृत्तीही दिसते. माणसाचे नातेसंबंध इतके गुंतागुंतीचे मुळातच आहेत. त्यात सशुल्क मातृत्त्वाने (सरोगेट मदर) आणखी भर पडणार आहे. यात संशय नाही.

# जागतिकीकरण आणि स्त्रिया

जागतिकीकरणाच्या दुष्परिणामांविषयी अलीकडे बरीच उलटसुलट चर्चा चालू असते. शिक्षण, उद्योग व्यवसाय, अर्थव्यवहार या संदर्भात तर चर्चा होणे स्वाभाविक आहे. पण भारतासारख्या विकसनशील देशातील प्रत्येक दृश्य अदृश्य घटकांवर जागतिकीकरणाचे परिणाम होत आहेत, याची जाणीव त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांना आहे.

उघडपणे नव्वदीनंतरच्या काळात जागतिकीकरणाचा स्वीकार भारतीय अर्थव्यवस्थेने केलेला असला तरी अप्रत्यक्षपणे ही प्रक्रिया कितीतरी आधीच सुरू झाली आहे. आधुनिक यंत्रयुगाचा प्रभाव पाश्चिमात्य राष्ट्रांच्या व्यापार हेतुतून भारतात प्रथम आला आणि दिवसेंदिवस यंत्रयुगाच्या वाढीतून तो दृढ होत गेला. यंत्रातून अतिशय मोठ्या प्रमाणावर, सुबक उत्पादने सुरू झाली आणि उत्पादक देशांची गरज भागून अतिरिक्त झालेल्या उत्पादनांसाठी आपआपल्या देशाबाहेरच्या बाजारपेठा काबीज करण्याच्या चढाओढी सुरु झाल्या तेव्हाच नकळत आजच्या जागतिकीकरणाचे बीजारोपण झाले.

माणसाच्या विलक्षण जिज्ञासू वृत्तीतून नवनवीन उत्पादने वाढत गेली. प्रथम गरजेतून सुरू झालेल्या व्यवहारात गरज तसा पुरवठा किंवा मागणी तसा पुरवठा हे

अर्थशास्त्रीय सूत्र पुढे आले. नंतर मात्र एकच गरज किंवा एकाच मागणीची निर्मिती करणारे अनेक निर्माते पुढे येत राहिले आणि बाजारपेठेत स्पर्धेचे युग सुरू झाले. या स्पर्धेत गिऱ्हाईक हे 'लक्ष्य' बनले. पुढच्या टप्प्यात तर स्वाभाविक गरजेचा विचारही मागे पडला आणि कृत्रिम गरजांचा माहोल उभा करण्याचे युग आले. स्पर्धात्मक बाजारपेठेत गिऱ्हाईक–ग्राहक हा कळीचा घटक असतो. त्या ग्राहकाच्या मनात उत्पादित वस्तुबद्दलची अपरिहार्यता निर्माण करणे हा महत्त्वाचा उद्योग झाला आणि त्यातून विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जाहिरात ह्या नवीन कलेचा उदय झाला. विसावे शतक संपताना आलेल्या दूरदर्शनसारख्या दृश्य माध्यमाने तर उत्पादित वस्तूची प्रत्यक्ष पात्रता आणि जाहिरातीतून दाखवले जाणारे गुण यांचे प्रमाण म्हणजे 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' अशी झालेली दिसते.

तशी तर अगदी प्राथमिक अवस्थेतील बाजारपेठेतही 'जाहिरात' हा शब्द नसूनही सुप्तपणे जाहिरातकलेच्या प्रभावाची जाणीव होतीच. म्हणून तर ग्रामीण बाजारात म्हण होती, 'बोलेल त्याचे जोंधळे विकतील, न बोलेल त्याचे चणेही विकले जाणार नाहीत' बाजारात ओरडाआरडा करून आपल्या विक्रेय वस्तूचे गुण गिऱ्हाइकाच्या मनात ठसवून माल खपवणारा बाजी मारून जाताना दिसतो.

प्रारंभापासूनच घरगुती गरजेच्या वस्तूंचा ग्राहक प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे स्त्री असते. ती फारशी बाजारात जात नव्हती तेव्हाही घरात आणलेल्या वस्तूबद्दल बरे वाईट मत–अनुभव व्यक्त करायची आणि त्यानुसार घरातल्या खरेदीवर परिणाम व्हायचा.

स्त्री शिकली स्वत: बाजारहाट करू लागली तेव्हापासून तर दैनंदिन गरजेच्या बहुतेक वस्तूंची ग्राहक स्त्री–गृहिणी आहे, हे जाणूनच जाहिरातकला विकसित होत गेलेली दिसते. अगदी प्रारंभ काळात त्या मुद्रित माध्यमांतील जाहिरातींपासून आज दूरदर्शनमधील माध्यमांपर्यंतच्या जाहिरातींचा कोणी साक्षेपाने अभ्यास केला तर मनोरंजन आणि सामाजिक स्थितीगतीचा पट मांडणारी माहिती उपलब्ध होईल.

तात्पर्य इतकेच स्पर्धात्मक बाजारकेंद्री जीवनात स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर सर्वात मोठा प्रभाव हा जाहिरातींचा असतो.

तसा तर स्त्रीचा स्वत:वर पूर्ण अधिकार कधीच नव्हता. पण तिने केवळ स्वत:च्या

गरजेसाठीच्याही कोणत्या वस्तू वापराव्यात हे ती कधी मुक्तपणे ठरवू शकलेली दिसत नाही. आधीच्या काळात परंपरेने, घरातल्या वडीलधाऱ्यांनी ती निवड केली असेल. नंतरच्या यंत्रयुगोत्तर वस्तूंनी तिचा ताबा घेतलेला दिसतो. अर्थात त्यात अनेकदा तिची सोय झाली, कष्ट कमी झाले, सुबकपणा आला हे सगळे झालेच. पण ते तिच्या घरच्या घटकांच्या संमतीने आणि इच्छेनेच होत आले आहेत.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे बदल होण्याचे मूळ कारण बहुधा नव्हे कधीच लक्षात न घेता नवीन पिढीची फॅशन हा टीकाविषय ठरतो. हे स्त्रीपुरुष दोघांच्याही बाबत होते हे खरे! पण स्त्रीच्या पोषाखातील बदलाच्या दर टप्प्यातल्या संघर्षाच्या ठिणग्या थोड्या अधिकच तेज असतात.

हातमागाच्या लुगड्यांना मागे टाकीत मिलची बारीक काठाची तलम (नऊवारीच) पातळे आली तेव्हा यंत्रयुगीन फॅशनचा प्रारंभ झाला. मग नऊवारीची जागा पाचवारीने साडीने घेतली तेव्हा तर क्वचित अश्लीलतेच्या पातळीपर्यंतची टीका स्थितिशील पिढीने केली. पण हे बदल झाले कशामुळे? यंत्रमागांमुळेच नां! यंत्रमागच आले नसते, गिरण्याच निघाल्या नसत्या तर तलम साड्या तरी कशा आल्या असत्या? तीच गोष्ट पुढच्या सगळ्या टप्प्यांची!

रेडीमेड कपड्यांची बाजारपेठ हा जागतिकीकरणातला एक महत्त्वाचा उद्योग आहे. अमेरिकेसारखे भांडवलदार जर त्यात प्रबळ असतील तर त्यांच्याच देशातील फॅशनच्या कपड्यांचे 'होलसेल' उत्पादन होणार ते मोठ्या प्रमाणात असल्याने स्वस्तही असणार आणि त्याच पोषाखात सुंदर दिसणे कसे अपरिहार्य आहे हे तुमच्या मनावर ठसवून आधी तुमची मने आणि मग बाजारपेठ (खरे तर दोन्ही एकाचवेळी) काबीज करणार. त्यासाठी दूरदर्शन मालिका आणि चित्रपटातील लोकप्रिय नायिका त्याच कपड्यात सतत नाचवणार आम्ही मात्र म्हणत राहणार आजकालच्या बायका फारच फॅशनेबल झाल्यात. पण त्यांचा करविता धनी मात्र वेगळाच असतो. आधी यंत्रयुग आणि नंतरचे विज्ञानयुग यांचा पुढील अटळ टप्पा म्हणजे जागतिकीकरण आहे.

कपड्यांचे उदाहरण हे नेहमीचे साधे. परंतु मुक्त अर्थव्यवस्था आणि

जागतिकीकरण यांनी मानवी जीवनाचा पूर्ण ताबाच घेतला आहे.

पाश्चिमात्य कपड्यांपाठोपाठ पाश्चिमात्य खाद्यपदार्थही आता बाजारपेठांचा पर्यायाने दैनंदिन जीवनाचा ताबा घेत आहेत. अगदी घराच्या रचना, घरातील वस्तू, स्वयंपाकघराचेही संपूर्ण स्वरूप इतक्या झपाट्याने बदलत आले आहे की, हा नेमका कशाचा परिणाम आहे, हेही उमगू नये. कधी त्यात खरोखर सोय असते, कधी हीच खरी सोय आहे अशी मानसिकता निर्माण केली जाते. प्रथम कुरकुरत स्वीकारलेल्या वस्तू ही पुढच्या पिढीची अटळ गरज होते. गरज आणि चंगळ यातील सीमा मध्यमवर्गात तर पुसट होत चालल्या आहेत.

मात्र गृहरचनेपासून ते अन्नवस्त्रापर्यंतचे हे बदल नकळत लादले जात आहेत. दंतमंजनापासून ते शयनगृहापर्यंत आणि बाळाच्या खाद्यपदार्थांपासून ते मुलांच्या जडणघडणीसाठीच्या साबण, तेल, टॉनिक, खाऊपर्यंतच्या वस्तू आता बाहेरूनच लादल्या जात आहेत आणि तेही इतक्या सफाईदारपणे की आपण परवश होत आहोत हे लक्षातही येऊ नये.

जागतिकीकरणाची भुरळ घालणाऱ्या जाहिरातींच्या जादुई गारुडातून विवेकी समजल्या जाणाऱ्या मध्यमवर्गीय गृहिणीने तरी सारासार विचार करायला हवा.

# ओझे पुरुषपणाचे

सामान्यत: स्त्रियांविषयी लिहिण्याची किंवा बोलण्याची वेळ आली की, पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रियांची होणारी कोंडी किंवा अन्याय यांचा उल्लेख अपरिहार्यच असतो. ती वस्तुस्थितीही असते. कोणी ती नाकारू शकत नाही. क्वचित त्याही परिस्थितीचे समर्थन करणारेही भेटतात, हा भाग वेगळा!

एकदा एका महाविद्यालयात स्त्रियांसंदर्भातील एका चर्चासत्रानंतर दोन तीन विद्यार्थी आले आणि म्हणाले ''हल्ली सगळेजण स्त्रीमुक्ती (?) विषयीच बोलतात, पुरुष मुक्तीविषयी कोणीच बोलत नाही'' आसपास काही विद्यार्थिनी होत्या. त्या तत्परतेने म्हणाल्या, ''पुरुष तर मुक्त असतात की! त्यांच्याबद्दल काय बोलायचं?'' हसण्याच्या कल्लोळात तो विषय तिथेच राहिला.

स्त्रियांसंबंधी चर्चा करताना 'स्त्री मुक्ती' हा शब्द अलीकडे बहुचर्चित, बहुरूढ आहे. त्यासंदर्भात बोलताना ऐकणारांच्या आणि अनेकदा बोलणारांच्या मनात हे गृहित असते की, ''स्त्री मुक्त नाही, म्हणजे पुरुष मुक्त आहे.'' स्त्री अधिकारांबद्दल किंवा प्रगतीबद्दल बोलताना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार किंवा पुरुषांइतकी प्रगती असते शब्द सहजच वापरले जातात.

'स्त्री मुक्त नाही, म्हणजे पुरुष मुक्त आहे' हे गृहितकच फसवे आहे. स्त्री किंवा पुरुष मूलत: माणसे आहेत, मानव आहेत. पण समाजव्यवस्थेत त्यांना सरळ निखळ माणूस

म्हणून वाढूच दिले जात नाही. अगदी जन्माच्या आधीपासून 'स्त्री म्हणजे अशी' आणि 'पुरुष म्हणजे असा' हे गृहित धरूनच त्यांना वाढवले जाते. त्यामुळे मुलीवर 'बाईपणाचे' जसे ओझे लादले जाते, हे सहसा लक्षातच येत नाही. त्या पुरुषपणाच्या ओझ्याने त्याचेही माणूसपण कसे मारले जाते ते कळत नाही. 'बाई' आणि 'पुरुष' दोघेही घडवले जातात, ते जन्माला येत नाहीत सीमॉन द बोव्ह या स्त्रीविषयक विचारवंत स्त्रीच्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथातील वाक्याचा स्त्रीविचारक पुन: पुन्हा उल्लेख करतात 'स्त्री घडवली जाते ती जन्माला येत नाही' (वुमन इज कन्स्ट्रक्टेड, शी इज नॉट बॉर्न) खरे तर हे अर्धसत्य आहे. जगभरच्या मानवसमूहात स्त्री पुरुष दोघेही घडवलेच जातात.

स्त्री म्हणजे कमकुवत, नाजुक, परावलंबी, निसर्गानेच तिला अ–बला केले आहे, वगैरे उलट पुरुष म्हणजे बलवान, शूर, खंबीर, निर्भर, स्वावलंबी, कोणत्याही संकटावर मात करणारा, बुद्धिवान इत्यादी! पुन्हा त्यात धर्माच्या नावावर पाप पुण्याची भर घातली गेली असेल ती वेगळीच!

ही सगळी गृहिते खरी आहेत का? प्रत्यक्ष जगण्यातले अनुभव या गृहितांच्या बाजूने सहसा कौल देताना दिसत नाहीत. त्यामुळे पुरुषाची गृहित प्रतिमा ही इतकी गौरवास्पद मानली जाते की, त्यालाही ते खरेच वाटू लागते. संस्कृतीच्या नावावर स्त्रियांवरही पुत्रवती पतिव्रता, सतीत्त्व, त्यागीपणा यांचे ओझे लादून त्या गौरवास्पद प्रतिमेत अडकताना बाईही आपले स्वाभाविक माणूसपण विसरून जाते.

पुरुषाच्या पुरुषत्त्वाच्या 'अहं' चे ओझे खरे तर पुरुषालाही अनेकदा जाचक होते, पण ते आपल्या स्वत:शीही कबूल करण्याइतकी आपली तपासणी ते सहसा करू शकत नाही. हळवेपणा आणि संवेदनशीलता हा पुरुषाचा दोष ठरतो.

कुटुंबातील 'कर्ता' ही भूमिका पेलवताना पुरुष अनेकदा मेटाकुटीला येतो. स्त्री घटकांचे कार्यक्षेत्र घर आणि पुरुषाचे घराबाहेर जाऊन अर्थार्जन करणे! हे गृहित सिद्ध करताना अनेक पुरुषांची तारांबळ होते. कारण कुटुंबाच्या सर्व घटकांचे समाधान करण्याइतके अर्थार्जन करण्याइतकी त्याची कुवत असतेच असे नव्हे. मग तो प्रामाणिक पापभिरू असेल तर मनात कुढत राहतो. त्याचे व्यक्तिमत्त्व अगदीच

कचखाऊ होते. त्याच्याजवळ फारसा विवेक नसेल तर तो आक्रस्ताळा, आक्रमक, व्यसनाधीन होतो आणि आपल्या पुरुषपणाचा अहं तृप्त करण्याचा भ्रामक मार्ग स्वीकारतो. तो खरे तर पलायनवाद असतोच पण तेवढ्या प्रमाणात आपले माणूसपणही तो कलंकित करीत असतो. त्यात त्यालाही खरे समाधान मिळत नाहीच.

घरात कुचंबलेल्या बायका जशा अनेकदा 'अंगात देवी' आल्याने आपल्या अहंतृप्तीला वाट करून देतात, तसेच प्रपंचात कुचंबलेले, पराभूत झालेले पुरुष अनेकदा भ्रामक देवताळेपणात अडकून 'बुवा' बाजीत अडकतात. याचा फारसा विचार मानस वैज्ञानिकांनीही केलेला नाही. स्त्रियांबाबत तो केला जातो. पण ललित साहित्यात अनेकदा अशा पराभूत व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषांच्या बुवापणाची चित्रणे केलेली दिसतात. 'कोंडुरा' (चि.त्र्यं. खानोलकर) मधील 'तो' किंवा 'रथचक्र' (श्री. ना. पेंडसे)मधील 'ती'चा नवरा! पुरुषपणाचे ओझे न पेलवल्याने अशी माणूसपणापासून दूर गेलेली व्यक्तिमत्त्वे हे खरे तर विकृतीचेच नमुने असतात. कारण 'अध्यात्म' आणि 'देवताळेपणा' हे प्रतिष्ठाप्राप्तीचे समाजमान्य सोपे मार्ग आहेत. तथाकथित 'बुवा'बाजीचा मागोवा घेतला तर पराभूत व्यक्तिमत्त्वांतून निर्माण झालेल्या ह्या समाजविघातक बाबी आहेत, हे प्रामाणिकपणाने कबूल करावे लागेल.

पुरुष म्हणजे शूर आणि कर्तबगार! या गृहितकात तो इतका मश्गूल होतो की, आपले वास्तव तो कधी तपासून पहायला तयार होत नाही. मग आपली कर्तबगारी सिद्ध **करण्याचे अ**नेक कु–मार्ग तो चोखाळतो. 'कर्तबगार' (?) असल्याने नकार **पचवल्याने** त्याला जड जाते. घरात पुरुषपण घडवले जात असताना त्याला सहसा **नकाराला** सामोरे जावे लागत नाही. उलट मुलीला सतत नकार पचवल्याने न्यूनगंड येतो. पुरुषाला नकाराची सवय नसल्याने न्यूनगंड येतो. दोन्ही 'गंड'च! त्यात अडकल्याने प्रत्यक्षात जेव्हा नकाराला सामोरे जावेलागते, तेव्हा बहुधा तो मनातून खचतो, कोलमडतो. त्याची 'घडण' त्याला निरामयपणे 'मोकळे' होऊ देत नाही. परिणामत: अशा दुबळ्या क्षणी हा 'खंबीर, शूर, वीर' (?) दुबळ्याहून दुबळा होतो आणि व्यसनाधीन होतो.

पण ही 'समाजव्यवस्था' (आणि त्यातून घडलेली अर्थव्यवस्थाही) त्या

दुबळेपणालाच 'मर्दपणाचा' मुलामा देते. मग सिगरेट असो की उंची मद्य त्यांचा अवलंब करणारा 'हिरो' ठरतो. पुरुषांच्या दुबळ्या, व्यसनाधीन होऊ पाहणाऱ्या वृत्तीचेही हीव्यवस्था उदात्तीकरण आणि प्रतिष्ठीकरण करते. पण त्यात अंतीमत: त्याचेच नुकसान असते. त्यापेक्षा आपली स्वाभाविक माणूस म्हणून कुवत ओळखून जगणे अधिक सुखाचे! हे लक्षात येत नाही.

'मर्दपणाचे' महत्त्वाचे लक्षण म्हणजे स्त्रियांचा उपभोग घेणे! त्याचा प्रारंभ एखाद्या स्त्रीकडे आकर्षित होणे! नर मादी आकर्षण हा निसर्गक्रम असला तरी तेथे मादीची सहमती आवश्यक असते. पण स्त्रीच्या नकाराला सामोरे जाणे म्हणजे नामर्दपणा अशा भ्रामक गृहितकामध्ये अडकलेला 'तो' 'ती'चा नकार पचवू शकत नाही. मग त्याचा 'देवदास' तरी होतो किंवा एकतर्फी प्रेमातला 'खुनी प्रियकर'(?) तरी होतो. तो माणूस राहतच नाही. संस्कृतीचा मानदंड म्हणजे उदात्तीकरण! स्त्रीच्या नकाराचे, आपल्या तथाकथित प्रेमाचे उदात्तीकरण तो सहसा करू शकत नाही. तो अमानवी क्रूर कृती करून बसतो. स्वत:ही उद्ध्वस्त होतो. इतरांनाही उद्ध्वस्त करतो.

'पुरुषाने कसेही वागले तरी चालते' हेही गृहितक बालपणापासूनच्या घडणीतून त्याच्या मनात ठसते. ''तो मुलगा आहे. तो कसाही वागेल!'' हे वाक्य वारंवार तो ऐकतच लहानाचा मोठा होतो. मग कोणत्याही बाबतीतला संयम त्याच्यासाठी नसतोच. त्याच्या संयम न बाळगण्याच्या वृत्तीचेही ही व्यवस्था समर्थन करते. विशेषत: लैंगिक बाबतीत! सगळ्या वेश्या व्यवसायाचे जगभरचे जाळे, स्त्री देहाच्या बाजारातली समांतर अ(न)र्थ व्यवस्था हे गृहितच धरले जाते.

आदिवासींमध्ये 'वेश्या'ही नव्हत्या आणि 'बलात्कार'ही नव्हते. आजची माणसे ही मात्र माणसाने घडवलेल्या (कन्स्ट्रक्टेड) व्यवस्थेची अपत्ये आहेत. त्या घडणीत स्त्री पुरुषांचे 'घडवलेपण' महत्त्वाचे! आज जगाला विळखा घालणारा एडस् हे याच 'संस्कृती'चे अपत्य! कारण 'संयम' पुरुषांनी करायचा नसतो. त्यांनी कोठूनही उपभोग घ्यायचे आणि घरातील निष्पाप बायको मुलांना विषाणूंचा 'प्रसाद' वाटायचा! प्रचार यंत्रणांनी 'वेश्यां'ना केंद्र करायचे! 'संयमा'च्या विचारावर भर देण्यापेक्षाही प्रचार यंत्रणांचा भर 'कंडोम'वर आहे, हे ही या पुरुषी 'अहं' चेच अपत्य! काही झाले तरी

त्यांचा स्त्री उपभोगाचा हक्क अबाधित राहिला पाहिजे, असाच संदेश या प्रचार यंत्रणा देत आहेत की काय?

लैंगिक संबंधाखेरीज अन्य मार्गाने झालेल्या विषाणू बाधेमुळे ग्रस्त झालेल्या रोग्यांना खरी जास्त सहानुभूतीची आणि मदतीची गरज आहे आणि त्यात स्त्रिया आणि मुले मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र स्त्रियांना पतीपासून लागण झाली तर त्यांनाच बहिष्कृत केले जाते.

उलट एडस्ग्रस्त पुरुष, व्यसनाधीन पुरुष यांना सांभाळण्याची शिक्षा मात्र स्वत: निरपराध असलेल्या स्त्रियांनाच भोगावी लागते. याउलट परिस्थिती असेल तर किती घरातून स्त्रियांची सहानुभूतीने जपणूक होईल?

'पुरुषपणाच्या' विकृत, विपरीत धारणांचे ओझे माणसाला अ-मानुष करीत आहे. जीवनातल्या स्वाभाविक सात्त्विक समाधानापासून पारखे करीत आहेत. 'सह' सात्त्विक समाधानापासून पारखे करीत आहेत. 'सह' जीवनातल्या सहज आनंदापासून. दूर करीत आहेत. सहज हळुवार भावनांची अभिव्यक्ती करण्यातल्या आनंदाला ते मुक्त आहेत. विविध विकृतीचा बळी करीत आहेत.

आपल्या तरल संवेदना जतन करणारे स्वाभाविक निर्मळ झऱ्यासारखे माणूसपण हवे असेल तर 'घडणीची कृत्रिम ओझी' सर्वांनीच आता उतरवून ठेवायला हवीत आणि एका निरामय माणूसपणाच्या पर्वाचा प्रारंभ करायला हवा.

# आदरणीय ज्योतिबांना

आदरणीय जोतिबा–क्रांतीबा फुले,

एकविसाव्या शतकाच्या वा प्रारंभापर्वात तुमची फार मनापासून आठवण येत आहे. विसाव्या शतकाच्या सरत्या पावकीत जगाच्या पाठीवर महिलाविषयक बरेच विचारमंथन झाले. परिषदा, चर्चा, अभ्याससत्रे, त्याला अनुसरून अत्यंत गंभीरपणे ग्रंथलेखनही झाले आणि दुसरीकडे तुमच्या काळापासून चालत आलेली टिंगळ टवाळी, उपहास उपरोध ही परंपराही चालू आहेच. स्त्रीविषयक उदार विचारकांनी टीकेला तोंड द्यावे लागण्याची परंपरा आजही संपलेली नाही.

तुमच्या एकोणीसाव्या शतकाने उदारमतवादी दृष्टीतून आणि मानवतावादी भूमिकेतून विविध संस्थात्मक कामांचे आणि चळवळींचे एक चैतन्यमय वातावरण निर्माण केले होते. विशेषत: सर्व उपेक्षित घटक आणि त्यातही स्त्रिया हा तुमच्या चिंतनाचा आणि कार्याचा गाभा होता. एरव्ही तुम्ही वर्ण जातींच्या परिभाषेत बोलत असलात तरी सर्व स्त्रिया हा एकच एक गट तुमच्या तळमळीच्या कामाचा घटक होता. दलित आणि दलितेतर मुलींसाठी शाळा सुरु करणे असो की उच्चवर्णीयांपासून सर्वच स्त्रियांचे समाजाच्या दृष्टीने 'पाय घसरून' अडचणीत येणे असो, त्यांना त्या 'अडचणी'तून मुक्त करण्यासाठी तुम्ही महिलांच्या आधाराचे घर तुमच्याच घरात निर्माण केलेत आणि त्यांच्या अनाथ बालकांनाही सनाथ केलेत. स्वत:ला अपत्य होण्याची शक्यता नाही हे लक्षात आल्यानंतर तुमच्या काळात उपलब्ध असलेली

दुसऱ्या विवाहाची संधी साधण्याचा विचारही तुमच्या मनात आला नाही. उलट तसा आग्रह करणारांना तुम्ही कटाक्षाने दूर ठेवलेत. आपल्या अनक्षर सहधर्मचारिणीला नुसतेच साक्षर केले नाहीत तर समर्थही केलेत. तिच्यातील सुप्त गुण फुलवण्यासाठी सर्वतोपरीने सहाय्य केलेत. त्या काळातल्या आमच्या माय बहिणींना त्या तुमच्या सावित्रीने धुळाक्षरे गिरवायला शिकविली म्हणून आज आमच्यासारख्या काहीजणी आपलं मन कागदावर उतरवू शकतो आहोत.

तुमच्यामागे तुमची 'सत्यशोधनाची' मशाल सावित्रीबाईंनी इतक्या समर्थपणे पेलली की गेल्या शतकभरात आम्हा सावित्रीच्या लेकींनी महाराष्ट्र गजबजून गेला. मग काहीजणी आमचा उद्धार करण्याची क्षमता आमच्यात आहे? याचे भान सावित्रीने आमच्या मनात जागे केले आहे. मग जगभरच्या सुजाण बायकांनी ८ मार्च हा एक दिवस जगभर 'महिला दिन' म्हणून पाळण्याचे ठरवले. जगभर विविध क्षेत्रात स्त्रियांनी, मुलींनी सतत धडपड करून आपले अस्तित्व, स्वतंत्र सामर्थ्य सिद्ध केले आहे. आम्हा सावित्रीच्या लेकींचा वेलविस्तार वाढता राहिला.

आणि हेही कबूल करायला हवे की, आम्हा सावित्रीच्या लेकींना जोतिबा, तुमच्या वैचारिक वारशाने घडलेल्या लेकांनी आमच्या बंधूंनीही साथ दिली. नाही असे नाही. पण खरं सांगू का? ती साथ नंतर फारशी खंबीर दिली नव्हती. आणि आमच्या मात्र अपेक्षा, आकांक्षा आमच्या कामातून आलेल्या आत्मविश्वासातून वाढत गेल्या. तुमचे पुत्र नात्र बाहेरून पोषाखी बदलले. मनाने अजून एकोणीसाव्या शतकातले 'सनातनी'च राहिले. आम्हीही त्यांच्या त्याच 'नुल्यां'चा वारसा चालवावा म्हणून त्यांची अखंड धडपड चालू असते.मग वरकरणी आधुनिक झालेला हा वर्ग आम्हाला पुन्हा पोकळ पातिव्रत्य, पुत्रासाठी तळमळणारी आणि नवससायासांनी बुवाबाजीला बळी पडणारी हीच आदर्श स्त्री असल्याचा मारा दूरदर्शनसारख्या माध्यमांतून करतो आहे. जणू स्त्रीचे अस्तित्व म्हणजे 'पतीच्या वंशाचा दिवा असलेला पुत्र जन्माला घालणारा देह' एवढेच असल्याचा संदेश पुन्हा पुन्हा सर्वांगानी आदळत ठेवला जातो आहे.

आणि प्रत्यक्षात तर आता आम्हाला सर्वांगाने साथ देणारा 'सहचर मित्र' हवा आहे. 'पती परमेश्वर' भूमिकेतून त्यानेही बाहेर यावे आणि 'पायाची दासी' होणे तर आम्हाला आता नामंजूरच आहे. आपण सर्वांनी चांगले माणूस व्हावे असे आम्हाला मनापासून वाटते.

आमची दिवसेंदिवस घडणारी ही अबलत्त्व झटकणारी खंबीर भूमिका लक्षात आल्यामुळेच की काय 'आमच्या जातीच्या' जन्मावरच एकविसावे शतक घाव घालीत आहे. या अर्थकेंद्री बाजार मानसिकतेच्या पुरुष प्रधान व्यवस्थेतल्या मानसिकतेला कन्याजन्म ही नुसतीच आपत्ती वाटत नाही (तशी ती पूर्वापार वाटते आहेच) तर अत्यंत क्रूरपणे आम्हाला गर्भातूनच उपटून फेकण्याइतकी क्रूरता आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने ही मानसिकता जोपासते आहे. त्या प्रवृत्तीची निर्लज्ज समर्थने करीत आहे.

अशावेळी जोतिबा, खंत अशी वाटते की, तुमची 'जोतिबा प्रवृत्ती' पुढच्या शतकभरात दुबळी का ठरली? तुमचे वारस अधिक संख्येने का निर्माण नाही झाले? सावित्रीच्या लेकींनी ज्या प्रमाणात तिचा वारसा तेजस्वी केला त्या प्रमाणात तुमचे पुत्र का निर्माण झाले नाहीत? यात दोष नक्की कुणाचा?

जोतिबा, तुमच्या काळात केशवपन विरोधात तुम्ही नापितांना प्रबोधित करून त्यांची संघटना बांधण्याचे लोक विलक्षण काम केलेत, त्याची आज आठवण येते. आज गर्भजलपरिक्षा तंत्राच्या दुरुपयोगातून मुलींची गर्भातूनच क्रूर हत्या करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांची संघटना तुम्ही बांधू शकला असता? त्या बुद्धिमानांचे तुम्ही खरोखर 'प्रबोधन' करू शकला असता? की जागतिकीकरणाच्या, मुक्त अर्थव्यवस्थेच्या आणि माहिती तंत्रज्ञानाच्या महाजालातील या महाक्रूर सनातनी वृत्तीच्या यंत्रणेने तुम्हालाही पराभूत केले असते? आता या विरोधात सावित्रीच्या लेकींनाच उभे रहावे लागणार का?

जोतिबा ८ मार्च जवळ आला की तुमची फार आठवण येते आहे, हे खरे!



डॉ. तारा भवाळकर यांनी आजपर्यंत लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, ललित-साहित्य असे विविधांगी लेखन केले आहे.

स्त्री जीवन हा त्यांच्या आस्थेचा आणि चिंतनाचा विषय आहे. बाई अनेक परीने आपले मन जनात व्यक्त करण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून करीत आली आहे. समाजातील बदलही तिला उमगत आहेत. तरीही काही बाबी स्थलकालातीत राहतात... त्या संबंधीचा हा लेखसंग्रह!

अक्षता
प्रकाशन